पहूरनजिक धावती कार पेटल्याने विवाहितेचा होरपळून मृत्यू

वाचा पान २ वर



जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६

पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

जळगाव, मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५। युगाब्द ५१२७ ।वर्ष : ३१। अंक : ९५। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८ + ४= १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध


## विचारपुष्प



नित्य आपण आपल्या घरात आई स्वयंपाक करताना पाहतो. ती चुलीत लाकडे सरकवत असते. शिजविण्याच्या गरजेनुसार ती लाकडे पुढे मागे करते. काही वर असलेली लाकडे खाली जातात, मध्यभागी वा आत असतात, ती बाहेर काढते किंवा नवीन लाकडे घालते. आपणही सारे भारतमातेसाठी काम करीत आहोत. या यज्ञकुंडात गरजेनुसार आपली आहुती द्यायची आहे. काही वेळा आपल्याकडे पद असेल, काही वेळा नसेल. कधी आपण वर असू तर कधी खाली. आपले काम जळण्याचे आहे.

**- एकनाथ रानडे**

रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# लाल किल्ल्याजवळ स्फोट; दिल्ली हादरली

## कारमध्ये झाला स्फोट; १० ठार, २४ जखमी

### • कित्येक वाहनांना आग • मुंबई, उत्तरप्रदेशला अतिसतर्कतेचा इशारा



कारमध्ये भीषण स्फोट झाल्यानंतर आजूबाजूच्या अनेक वाहनांच्या चिंधड्या उडाल्या. अनेक वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली

◆ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

**दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी सायंकाळी पावणेसात वाजताच्या सुमारास एका वाहनात झालेल्या भीषण स्फोटात १० जण ठार तर २४ जखमी झाले आहेत. यापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असून जखमींना लोकनायक जयप्रकाश नारायण रुग्णालयात दाखल करण्यात आले. भीषण स्फोटानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.**

या स्फोटामुळे परिसरातील कित्येक वाहनांना आग लागली. या स्फोटानंतर मुंबईपासून ते उत्तरप्रदेशपर्यंत अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला. स्फोटात जखमी झालेल्या नागरिकांना रुग्णालयात नेणाऱ्या रुग्णवाहिकांसाठी वाहतूक व्यवस्थेत विशेष बदल करण्यात आले होते. स्फोटाची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सायंकाळची वेळ असल्याने चाकरमाने घराकडे जात असल्याने वाहनांची मोठी गर्दी होती. साडेसहाच्या सुमारास लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ कारमध्ये स्फोट झाला. अचानक झालेल्या स्फोटाच्या घटनेने एकच धावपळ उडाली. स्फोट होताच वाहनांमध्ये आग लागली. स्फोटके उच्च क्षमतेची असल्याने सात ते आठ वाहनांचे मोठे नुकसान झाले. काही जखमी रस्त्यावर विव्हळत होते. स्फोटाची माहिती मिळताच स्थानिक पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जवळच्या लोकनायक जयप्रकाश नारायण रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. स्फोटाच्या भीषणतेमुळे जवळपासच्या दुकानांच्या काचा फुटल्या. या स्फोटानंतर दिल्लीत अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला.

दरम्यान, अग्निशमन दलाचे सात बंब घटनास्थळी पाठवण्यात आले. घटनास्थळावरील लोकांनी जखमींना रूग्णालयात हलविले.

> लाल किल्ल्याजवळ एका आय-२० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटाची झळ काही वाहने आणि लोकांना बसली. काही लोकांचा या स्फोटात मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखा, विशेष शाखेचे अधिकारी, एनएसजी आणि एनआयएचे पथक माहिती तसेच पुरावे गोळा करीत आहे. आम्ही सर्वच शक्यतांची पडताळणी करीत आहोत. जो निष्कर्ष समोर येईल, तो लोकांसमोर ठेवला जाईल.
>
> **अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री

# देशात घातपाताचा मोठा कट

### • २९०० किलो स्फोटके जप्त • आठ अतिरेक्यांना अटक

◆ **श्रीनगर/फरिदाबाद, १० नोव्हेंबर**

काश्मीर, हरयाणा आणि उत्तरप्रदेशात पसरलेल्या जैश-ए-मोहम्मद आणि अन्सार गझावत-उल-हिंद या संघटनांशी संबंधित असलेल्या 'व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्युलचा पर्दाफाश करीत तीन डॉक्टरांसह आठ जणांना अटक तर २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले.

१५ दिवसांच्या कारवाईनंतर अटक करण्यात आलेल्यांमध्ये फरिदाबाद येथील काश्मीरचा डॉ. मुझम्मील गनी आणि लखनौची डॉ. शाहीनचा समावेश आहे. डॉ. शाहीनच्या वाहनात एके-४७ रायफल सापडली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

जम्मू-काश्मीर पोलिस, उत्तरप्रदेश आणि हरयाणा पोलिस दलासह केंद्रीय यंत्रणांनी केलेल्या संयुक्त कारवाईत हे यश मिळाले, असे अधिकाऱ्याने सांगितले. दहशतवाद्यांना नेमकी अटक कधी करण्यात आली, याची माहिती मात्र अधिकाऱ्यांनी दिली नाही. या कारवाईसह पोलिसांनी भारतातील इसिसची प्रतिबंधित शाखा अन्सार गझावत-उल-हिंद आणि जैश-ए-मोहम्मद या दोन्ही संघटनांचा विध्वंसक कट उधळला.

२९०० किलो स्फोटकांमध्ये अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट आणि सल्फरचा समावेश आहे. यापैकी ३६० किलो अत्यंत ज्वालाग्रही समजला जाणारा अमोनियम नायट्रेट असल्याचा संशय आहे. फरिदाबाद येथे मुझम्मील गनीने भाड्याने घेतलेल्या घरातून काही शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिली. विविध ठिकाणांहून जप्त केलेल्या वस्तूंमध्ये दारूगोळ्यासह एक चायनीज स्टार पिस्तूल व तिची काडतुसे, एके-५६ रायफल व काडतुसे, एके-क्रिन्कोव्ह रायफल आणि काडतुसे, स्फोटके, रसायने, अभिकर्मक, ज्वालाग्रही पदार्थ, इलेक्ट्रॉनिक सर्किट, बॅटरी, वायर, रिमोट कंट्रोल, टायमर्स आणि धातूचे पत्र्यांचा समावेश आहे. नवी दिल्लीजवळील हरयाणाच्या अल फलाह विद्यापीठात शिक्षक असलेल्या गनी जम्मू-काश्मिरात जैशचे समर्थन करणारे पोस्टर्स लावण्याच्या प्रकरणात पोलिसांना हवा होता.




अल्-फलाह विद्यापीठातील डॉ. मुझम्मिल शकिलला फरीदाबादमधील याच लॉजमधून ताब्यात घेऊन ३६० किलो स्फोटके जप्त केली. दहशतवादी डॉ. अदिलच्या वनपोरा येथील घरावर छापा टाकून शस्त्रसाठा जप्त केला.

### आठपैकी सात अतिरेकी काश्मिरातील

अटक केलेल्या आठपैकी सात अतिरेकी काश्मीरचे आहेत. यात श्रीनगरच्या नौगाम येथील आरिफ दार उर्फ साहिल, यासिर-उल-अश्रफ आणि मदसूद अहमद डार उर्फ शाहिद, शोपियाँतील मौलवी इरफान अहमद, गंदेरबालच्या वाकुरा भागातील जमीर अहमद अहंगर उर्फ मुतलाशा, पुलवामाच्या कोइल भागातील डॉ. मुझम्मील अहमद गनी उर्फ मुसैब आणि कुलगाममधील वानपोरा भागातील डॉ. आदीलचा समावेश आहे. यातील डॉ. शाहीन ही लखनौची रहिवासी आहे. गनी आणि आदिलच्या फोनवर अनेक पाकिस्तानी क्रमांक सापडले आहेत. ते त्यांच्या मॉड्युलच्या सूत्रधारांचे असू शकतात, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### तीन सत्रांनंतर बाजार वधारला

**मुंबई** : सलग तीन सत्रांतील तोट्यानंतर भारतीय शेअर बाजारात सोमवारी सकारात्मक वातावरण दिसून आले. जागतिक बाजारातील तेजीमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला. निर्देशांक आणि निफ्टी दोन्हींमध्ये वाढ नोंदविण्यात आली. निर्देशांक ३१९ अंकांनी वाढून ८३,५३५ वर बंद झाला तर निफ्टी ८२ अंकांच्या वाढीसह २५,५७४ वर स्थिरावला. दिवसभरात बहुतांश शेअर्स वधारले होते. आयटी क्षेत्राने सर्वाधिक वाढ नोंदवली. या क्षेत्रात पुन्हा एकदा खरेदीचा प्रवाह दिसून आला. याशिवाय ऊर्जा, धातू, औषध कंपन्या आणि बँक शेअर्सही तेजीत राहिले. माध्यम जगत, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील शेअर्समधील तोट्याने बाजारात मोठी वाढ झाली नाही.

### धर्मेंद्र यांची प्रकृती चिंताजनक

**मुंबई** : ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती सोमवारी अचानक बिघडली. त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, पुढील ७२ तास धर्मेंद्र यांच्यासाठी अत्यंत कठीण असतील. धर्मेंद्र यांचे कुटुंबीय रुग्णालयात उपस्थित आहेत तर त्यांच्या मुलींना अमेरिकेतून बोलाविण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी हेमा मालिनी या देखील ताबडतोब रुग्णालयात पोहोचल्या.

# अजितदादांचा रूपाली पाटील, अमोल मिटकरींना धक्का

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्ते पदावरून हकालपट्टी

◆ **मुंबई, १० नोव्हेंबर**

मागील काही दिवसांपासून वेगवेगळ्या मुद्यांवर बेधडक विधाने करून आपल्याच पक्षाची राजकीय कोंडी करणाऱ्या रूपाली पाटील व आमदार अमोल मिटकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्ते पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे.

रूपाली पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्यावर तिखट हल्ला चढवला होता. तर, मिटकरी यांच्या विधानांमुळे सत्ताधारी महायुतीत तणाव निर्माण होताना दिसून येत होता. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसने या दोघांनाही प्रवक्ते पदावरून दूर करून स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. मिटकरी एकनाथ शिंदे आणि शिवसेनेवर सातत्याने टीका करीत होते. तसेच कोकणातील भारतीय जनता पक्षाच्या बड्या नेत्यांवरही त्यांनी तोंडसुख घेतले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने सोमवारी पक्षाच्या १७ नव्या प्रवक्त्यांची यादी जाहीर केली. त्यात रूपाली पाटील व अमोल मिटकरी या दोन नेत्यांची नावे नाहीत. या यादीद्वारे राष्ट्रवादीने अनिल पाटील, चेतन तुपे, सना मलिक, हेमलता पाटील, राजीव साबळे, सायली दळवी, रूपाली चाकणकर, आनंद परांजपे, राजलक्ष्मी भोसले, प्रतिभा शिंदे, प्रशांत पवार, शशिकांत तरंगे, ब्रिजमोहन श्रीवास्तव, अविनाश आदिक, सुरज चव्हाण, विकास पासलकर व श्याम सनेर यांच्यावर प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपवली आहे. या नव्या नियुक्त्यांसह जुन्या प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.



# भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा-सुविधा तयार करा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्देश

◆ **मुंबई, १० नोव्हेंबर**

राज्यातील ज्योतिर्लिंगाना वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक भेट देतात हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरातील सुरू असलेली कामे गतीने करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचा निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.



वर्षा निवासस्थान येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व्ही. राधा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात

◆ **मुंबई, १० नोव्हेंबर**

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठी होणाऱ्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली आहे. १७ नोव्हेंबर अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असणार आहे.

या निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापायला सुरुवात झाली आहे. राज्यात सत्ताधारी महायुती भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस अजित आणि विरोधी मविआ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, शरद पवार गट आणि काँग्रेस या दोन्ही आघाड्यांमध्ये अद्याप युतीबाबत ठोस निर्णय झालेला नाही. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवारी अर्जांच्या छाननीची प्रक्रिया १८ नोव्हेंबरला होणार आहे, तर अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २० नोव्हेंबर असेल.


**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**

नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६

*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*

सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)

मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५

लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध

वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.

वरण, बट्टी ३० रु.

सँडविच भाकरी २० रू. नग

पोळी भाजी १५ रु. प्लेट

मेथी पराठा व चटणी १० रू.

मसाला पुरी २० रु.

पार्सल मिळेल.

सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे

ऑर्डर- एम.एम.पाटील

मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.

*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*

सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.


# विदर्भात गुलाबी थंडीचे आगमन

## गोंदियाचा पारा १०.४ अंशांवर



◆ **नागपूर, १० नोव्हेंबर**

दिवाळी लोटून २० दिवस लोटले. परंतु, ढगाळ वातावरण कायम राहिल्याने यंदा थंडीचे आगमन उशिरा झाले आहे. आता ढगाळ वातावरण निवळल्याने संपूर्ण विदर्भात गुलाबी थंडीचे आगमन झाले आहे. अशातच गोंदिया जिल्ह्यात शनिवारपासून शीतलहर दाखल झाल्याने गावोगावी शेकोट्या धगधगू लागल्या आहेत. सोमवारी गोंदिया जिल्ह्याचे तापमन १०.४ अंशांपर्यंत घसरल्याने हाडे गोठवणारी थंडी पडली होती. विदर्भातील अन्य जिल्ह्यांतही पारा घसरल्याने सायंकाळपासून बोचऱ्या थंडीचा सामना करावा लागत आहे.

सोमवारी सर्वांत कमी तापमान गोंदिया जिल्ह्यात नोंदविण्यात आले. शिवाय अकोला १३.२, अमरावती १२.५, भंडारा १२, बुलढाणा १२.६, चंद्रपूर १४.६, गडचिरोली १४, नागपूर १२.२, वर्धा १३, वाशीम १२.८ व यवतमाळ जिल्ह्याचा पारा १२ अंशांपर्यंत घसरला होता.

# युती अन् आघाडीसाठी स्पर्धा

## कोल्हापुरात दोन्ही राकाँ एकत्र, नाशकात मनसे आघाडीसोबत

**मुंबई, १० नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाल्यानंतर स्थानिक पातळीवर नव्याने युती आणि आघाड्या आकारास येत आहेत. एकमेकांचे कट्टर राजकीय शत्रू गळ्यात गळे घालत असून मित्र असलेले एकमेकांसमोवर उभे ठाकले आहेत.

सर्वांचे लक्ष मुंबई मनपा निवडणुकीकडे लागले आहे. सर्वांचे वेट अ‍ॅण्ड वॉच सुरू आहे. काँग्रेसने मुंबई मनपा स्वबळावर लढण्याची भाषा सुरू केली आहे तर अजूनही उबाठा आणि मनसेने पत्ते खोलले नाहीत. येथे मनसे-उबाठा एकत्र लढण्याची शक्यता आहे. मनसेला महाविकास आघाडीत घेण्यास काँग्रेसचा विरोध आहे. शरद पवार गटाने अद्याप तरी यावर भूमिका स्पष्ट केली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर राजकारणाने वेग धरला आहे. राजकीय समीकरणेही बदलत आहेत. आता कोल्हापुरातील चंदगड नगर पंचायत निवडणुकीसाठी अजित पवार आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आली आहे. याबाबतची घोषणा मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली. राज्याच्या राजकारणात राजकीय समीकरणे बदलल्यानंतर शरद पवारांच्या नेतृत्वातील राकाँने भाजपासोबत जाण्यास नकार दिला. मात्र, अजित पवारांनी काकांच्या विरोधात उभे राहून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आपला स्वतंत्र गट निर्माण केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा आपल्याकडे घेत महायुतीत सहभागी होऊन सत्तेत जाणे पसंत केले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले होते. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राकाँ एकत्र आली. काही दिवसांपूर्वी बीडमध्ये राकाँ एकत्र येणार असल्याचे वक्तव्य शरद पवार गटाच्या एका स्थानिक नेत्याने केले होते.

भाजपाला दूर ठेवत कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आल्याचे निश्चित झाले. हसन मुश्रीफ यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. चंदगड नगरपंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी राकाँच्या दोन्ही गटांत मनोमिलन झाले आहे. हसन मुश्रीफ यांनी चंदगडमधील कुपेकर गट आणि राजेश पाटील यांना एकत्र आणले. भाजपा स्थानिक निवडणुकीत राकाँला विचारातच घेत नसेल तर, जिल्ह्याचा राकाँचा नेता म्हणून एकाकी पाडणे शक्य नाही, काही निर्णय घेणं महत्त्वाचं आहे.

# तिरुपती लाडूप्रकरणी धक्कादायक खुलासे

### ५० लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचे उघड

◆ **हैदराबाद, १० नोव्हेंबर**

देशातील प्रसिद्ध तीर्थस्थळ असलेल्या तिरुपती मंदिरात भाविकांना लाडू प्रसाद म्हणून अर्पण केले जातात. गेल्या वर्षी या लाडूंच्या चौकशीत असे समोर आले की त्यात प्राण्यांच्या चरबीमध्ये मिसळलेले तूप वापरले गेले होते. हे प्रकरण इतके वेगाने वाढले की सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. आता, या प्रकरणाच्या चौकशीत ५० लाख रुपयांचा व्यवहार उघड झाला आहे.

तिरुपती देवस्थानमला तूप पुरवण्यात ही अनियमितता झाल्याचे तपास अहवालात म्हटले आहे. तपासात असे म्हटले आहे की ही रक्कम तिरुपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष वाय.व्ही. सुब्बा रेड्डी यांचे सहाय्यक के. चिन्नप्पण्णा यांना देण्यात आली होती. वाय.व्ही. सुब्बा रेड्डी हे त्यावेळी लोकसभा खासदार होते आणि आता राज्यसभा सदस्य आहेत.

### राज ठाकरे यांच्या सुरक्षेत वाढ

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या सुरक्षेत अचानक वाढ करण्यात आलीय. मुंबई येथील त्यांच्या शिवतीर्थ निवासस्थानाबाहेर पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आलाय. मात्र, सुरक्षेत वाढ का करण्यात आली, याचे नेमके कारण अजून समोर आले नाही. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या घराभोवती ड्रोन घिरट्या घालत आहेत, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला होता.

# थोडक्यात महत्त्वाचे...

## अमळनेर शहर विकास आघाडीसाठी १२९ उमेदवारांनी दिल्या मुलाखती

**अमळनेर :** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर विकास आघाडीसाठी इच्छुक उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया ८ रोजी आमदार अनिल भाईदास पाटील व माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील व कोअर कमिटी सदस्यांच्या उपस्थितीत पार पडल्या.एकूण १८ प्रभागात ३६ जागांसाठी एकूण १२९ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. अनेक प्रभागात इच्छुकांची संख्या अधिक असताना चुरस वाढली असल्याने सर्व उमेदवारांनी कोअर कमिटीला सर्वाधिकार देत कमिटी जो निर्णय घेईल तो मान्य राहील त्या उमेदवाराचा आम्ही सर्व मिळून प्रचार करू, अशी ग्वाही सर्वांनी दिली.खेळीमेळीच्या वातावरणात सर्वांच्या मुलाखती झाल्या. सकाळी १० वाजेपासून सायंकाळी उशिरापर्यंत मुलाखती सुरू होत्या. यावेळी अनेक माजी नगरसेवक व मातब्बर उमेदवारांनी आपल्याला आघाडी कडून उमेदवारी मिळावी अशी इच्छा व्यक्त केली. **आज नगराध्यक्ष पदासाठी मुलाखती-** लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी आघाडी कडून निवडणूक लढविण्यासाठी अनेक उमेदवार इच्छुक असून त्यांच्या मुलाखती मंगळवारी सकाळी १०.३० वाजेपासून आमदार अनिल पाटील यांच्या चोपडा रस्त्यावरील क्रेशर मशीनवर होणार आहेत.

## यावल नगरपालिकेत उमेदवारी अर्जाच्या पहिल्या दिवशी शांतता, अर्ज विक्री-दाखल नाही

**यावल :** येथील नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता उमेदवारी अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी सोमवारी एकही अर्ज विक्री झालेला नाही. नगराध्यक्ष तथा नगरसेवक पदाकरिता अर्ज विक्री तसेच ऑनलाईन अर्ज स्वीकृती सुरू होती. मात्र, नगरपालिका कार्यालयात पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज येथे विक्री झाला नाही. तसेच ऑनलाइन तसेच ऑफलाइनदेखील एकही उमेदवारी अर्ज येथे प्राप्त झाला नाही.
यावल नगर परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार मोहनमाला नाझीरकर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अतुल गांगुर्डे हे कामकाज पाहत आहेत. लोकनियुक्त नगराध्यक्षपद ओबीसी महिलेसाठी राखीव असून नगरसेवकांच्या ११ वार्डातील २३ जागेसाठी पहिल्या दिवशी विहित मुदतीत व वेळेत एकही अर्ज खरेदी कोणी केला नाही. तसेच ऑनलाईनदेखील अर्ज सादर केला नाही.

## किनगाव खुर्द येथे जुगार खेळणाऱ्यांवर १५ जणांना पकडले, यावल पोलिसात गुन्हा दाखल

**यावल :** तालुक्यातील किनगाव खुर्द या गावात पाण्याच्या टाकीच्या खाली सार्वजनिक ठिकाणी काही जण जुगार खेळत होते. याची माहिती यावलचे पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांना मिळाली. पोलिसांचे पथक त्या ठिकाणी गेले व त्यांनी येथून १५ जणांना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य रोख रक्कम असा एकूण ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला व याप्रकरणी १५ जणांविरुद्ध यावल पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किनगाव खुर्द या गावात पाण्याची टाकी आहे. या पाण्याच्या टाकीच्या खाली दीपक भोई, शांताराम पाटील, सलीम मुसलमान, शेख जाबीर, शिवाजी पाटील, नितीन वराडे, शशिकांत पाटील, भागवत पाटील, अंकुश कोळी, सुभाष महाजन, साहेबराव साळुंखे, वासुदेव वराडे, रवींद्र पाटील, दिलीप वंजारी, सुनील पाटील हे १५ जण जुगार खेळत होते. याची माहिती पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांना मिळाली. तेव्हा त्यांनी पोलिसांचे पथक त्या ठिकाणी पाठवले व या पथकाने या १५ जणांवर कारवाई करीत त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य असा ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार सचिन पाटील यांच्या फिर्यादीवरून १५ जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संदीप सूर्यवंशी करीत आहेत.

## लढाऊ कामगार संघटनांना संपविण्याचे वीज कंपन्यांचे षड्यंत्र : अरुण दामोदर यांचा आरोप

**भुसावळ :** राज्याच्या वीज कंपन्यांकडून लढाऊ आणि कामगारहितैषी संघटनांना बाजूला करण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोप 'पॉवर स्टेशन बचाव समिती'चे अध्यक्ष अरुण दामोदर यांनी केला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे प्रभावी कार्य असतानाही त्याचे विभाजन करून खासगीकरणाचा मार्ग स्वीकारण्यात आला आणि त्याचे दुष्परिणाम आता स्पष्टपणे दिसत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दामोदर यांनी सांगितले की, 'महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या काळात कामगारांचा सन्मान आणि स्थैर्य टिकून होते. मात्र विभाजनानंतर वीज कंपन्यांच्या धोरणांमध्ये कामगारविरोधी प्रवृत्ती वाढली आहे. सध्या कंपनी व कामगार या दोघांच्याही अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.' दामोदर यांनी शासनावरही टीका करताना म्हटले की, सरकारने वीज कंपन्यांतील विशिष्ट विचारसरणीच्या संघटनांना हाताशी धरले आहे. लढाऊ संघटनांना निष्प्रभ करण्यासाठी आणि कामगारांमधील ऐक्य मोडण्यासाठी हे नियोजित षड्यंत्र रचले गेले आहे. कामगारांच्या अस्तित्वाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. त्यामुळे वीज कंपन्यांमध्ये तत्काळ संघटना निवडणुका घेण्याची मागणी करून एकसंघ आंदोलन छेडावे, असे आवाहन अरुण दामोदर यांनी केले.



## साकळी येथे विद्यार्थी सुरक्षा, पोलीस जनजागृती कार्यक्रम

**यावल :** तालुक्यातील साकळी येथे १० नोव्हेंबर रोजी शारदा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस विभागाच्या वतीने विद्यार्थी सुरक्षा व जनजागृती कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. यात प्रवीण वसंत ढाके, राजेंद्र पवार आणि जीवन पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून पोलीस प्रशासनाबद्दल असलेली भीती दूर करणे, विद्यार्थी सुरक्षा, सायबर गुन्हे, वाहतूक शिस्त, मुलींची सुरक्षा तसेच पोलीस विभागाशी संपर्क साधण्यासाठी उपलब्ध असलेले टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांना त्यांनी पोलीस हे समाजाचे रक्षक असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असतात, असा विश्वास दिला. तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्याही अडचणीबाबत भीती न बाळगता पोलिसांशी थेट संपर्क साधावा, असा संदेश दिला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रश्न विचारून सहभाग नोंदविला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य आर. जे. महाजन होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक एस. जे. पवार, बी. ई. महाजन, आर. सी. जगताप, किरणकुमार चौधरी, व्ही. बी. चौधरी आणि एन. पी. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन एन. पी. पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन पर्यवेक्षक एस. जे. पवार यांनी केले.

# निधन वार्ता

## द्वारकाबाई पाटील; आज अंत्ययात्रा

**भडगाव :** येथील ओमकार विहार कॉलनीतील रहिवासी द्वारकाबाई शिवाजी पाटील (वय ८२) यांचे १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा ११ रोजी दुपारी १२ राहत्या घरून निघणार आहे. त्या संदीप विश्वासराव पाटील व राजेश विश्वासराव पाटील यांच्या आजी होत.

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कापडणेत विद्यार्थ्यांनी भरविली 'शाळा'!

## 'वाचवा वाचवा' म्हणत ग्रामसेवकांच्या खुर्चीला चिकटवले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १० नोव्हेंबर**

भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तालुक्यातील कापडणे येथील विद्यार्थ्यांनी 'वाचवा वाचवा' म्हणत ग्रामपंचायतीवर मोर्चा काढत तेथेच शाळा भरवून पाढे पाठांतराला सुरुवात केली. दोन तास प्रतीक्षा करून ग्रामपंचायतीचा एकही सदस्य वा अधिकारी न आल्याने विद्यार्थ्यांनी ग्रामसेवकांच्या खुर्चीला निवेदन चिकटवले.

कापडणे गावात गेल्या तीन महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात नागरिकांना त्रास होत आहे. तीन महिन्यांत जवळपास साठपेक्षा अधिक लोकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आकडेवारीनुसार दिसून आले आहे. कुत्र्यांच्या भीतीने आबालवृद्ध रात्री बाहेर जाण्यास घाबरत असतात. या समस्येवर गावातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



पुतळ्यापासून ग्रामपंचायतपर्यंत मोर्चा काढला. या वेळी 'वाचवा, वाचवा आम्हाला कुत्र्यांपासून वाचवा...' अशा घोषणा देण्यात आल्या.

मोर्चा ग्रामपंचायतीसमोर आल्यानंतर विद्यार्थी एक ते दीड तास बसून होते; पण सरपंच, उपसरपंचांसह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यापैकी कोणीही आले नाही. त्यामुळे मुलांनी तेथेच शाळा भरवून पाढे पाठांतराला सुरुवात केली. त्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत अधिकारी मेघना भामरे यांच्या खुर्चीला निवेदन लावून ग्रामपंचायतीचा निषेध केला. येत्या पंधरा दिवसांत निवेदनाचा विचार न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे कैफियत मांडू, असा इशारा विद्यार्थ्यांनी दिला.

याप्रसंगी गावातील माजी तंटामुक्ती अध्यक्ष नवल अण्णा पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य भटूआबा पाटील, योगिता पाटील, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर भामरे, जगन्नाथ पाटील, भूषण ब्राह्मणे, विकी बोरसे, आनंदा पारधी, सदानंद भामरे व विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# सावदा शहरात राजकीय घडामोडी

## अवघ्या एका दिवसात पक्ष बदला-बदली

**सावदा (ता. रावेर) :** सावदा येथे नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दररोज मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. अवघ्या एका दिवसात पक्ष बदला-बदली झाल्याने चर्चा होत आहे.

दररोज नवनवीन पक्ष प्रवेश होताना दिसत आहेत, तर काही जणांना तिकीट कोणाकडून मिळेल याची हमी हवी आहे, त्यामुळे आज इकडे तर उद्या तिकडे अशा कोलांट उड्या राजकारणात सुरू आहेत. कालच आमदार चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात गेलेले माजी नगरसेवक शेख अल्लाबक्ष यांनी आज १० रोजी राष्ट्रवादी अजित पवार गटात कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यामुळे शहरात चर्चेला उत आला. अजूनही शहरात अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. आता कोणते दिग्गज पुन्हा कोणत्या पक्षात जातात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. तर शहरात भाजप-शिवसेना युती होते की महायुती होते, याकडेदेखील अनेकांचे लक्ष लागून आहे.

## जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून धरणगावात नगरपालिका निवडणुकीसाठी पाहणी

**धरणगाव :** जिल्हाधिकारी रोहन घुगे व जिल्हा पोलीस अधीक्षक माहेश्वर रेड्डी यांनी सोमवारी सायंकाळी धरणगाव पालिकेचा चेकपोस्ट, स्ट्रॉगरूम, मतमोजणी ठिकाण व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सर्व कामकाजाच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व संबंधित विभागाकडून माहिती जाणून घेतली.

# पहूरनजिक धावती कार पेटल्याने विवाहितेचा होरपळून मृत्यू

**जळगाव :** टायर फुटल्यानंतर धावती कार पेटून आगीत विवाहितेचा होरपळून मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (१० नोव्हेबर) दुपारी जळगाव-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पहूरगावानजिक घडली. या भीषण घटनेत जान्हवी संग्राम मोरे (वय २१, रा. गुलखेडा, जि.बुलढाणा) या विवाहितेचा होरपळून अंत झाला.

प्राप्त माहितीनुसार, विवाहिता तिचे पती संग्रामसिंग जालीमसिंग मोरे चार चाकी वाहनातून छत्रपती संभाजीनगरकडे जात होते. पिंपळगाव फाटा (पहूरफाटा) जवळ ही कार आली असता तिचे टायर फुटले. त्यानंतर चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले व महामार्गावरील दुभाजकावर आदळली. त्यानंतर आग पेटली. प्रत्यक्षदर्शीसह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कारमध्ये अडकलेले संगाम मोरे यांना बाहेर काढण्यात आले. विवाहिता कारमध्ये असल्याचे कळाल्यानंतर वाहनाच्या काचा फोडून पाहिले असता विवाहितेचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याचे चित्र दिसले. वाकोद येथून टॅकरव्दारे पाणी मागवून कारची आग विझविण्यात आली. जामनेर नगरपरिषदेचा अग्नीबंबही घटनास्थळी दाखल झाला होता. या घटनेनंतर परिसरात सन्नाटा पसरला आणि हळहळ व्यक्त करण्यात आली. पहूर ग्रामस्थ, पोलीस, महामार्ग पोलीस, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी यांनी मदतकार्य केले. जखमी संग्राम मोरे यांना जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# अमित बघेलविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करा

## जिल्हा अग्रवाल संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

जोहार छत्तीसगढ़ पार्टीचे प्रदेश अध्यक्ष अमित बघेल यांनी सोशल मीडियावर अग्रवाल समाजाचे आराध्य दैवताविषयी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करावा अशा मागणीचे निवेदन जिल्हा अग्रवाल संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

जिल्हा अग्रवाल संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमित बघेल यांच्या विधानाने समस्त अग्रवाल समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून संपूर्ण समाजात रोष आणि असंतोष निर्माण झाला आहे. श्री महाराजा अग्रसेन हे अग्रवाल समाजाचे कुल संस्थापक आहेत. त्यांनी पाच हजार वर्षांपूर्वी अग्रोहा नगरची स्थापना केली.अग्रोहानगरमध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक व्यक्ती व परिवारास एक वीट व एक रुपया त्या नगरमध्ये असणाऱ्यांनी मदत देण्याची संकल्पना साकारली. कोणतीही जात पात न बघता आदर्श धर्मनिरपेक्ष समाज निर्माण केला. समाजातील कुप्रथा, बली प्रथा बंद करून अहिंसा वादी असल्याचे प्रमाणित केले. असे अहिंसावादी, धर्मनिरपेक्ष,



ऐतिहासिक महान व्यक्तीच्या विरोधात राजकीय हव्यासापोटी समाजात असंतोष निर्माण करून विघटन करणे ही विकृती आहे.

अग्रवाल समाजाचे व्यापार, उद्योग, शैक्षणिक, आरोग्य, राजकीय अशा अनेक क्षेत्रामध्ये नावलौकिक असून अग्रवाल समाज भारतीय अर्थव्यवस्थेचा पाठीचा कणा आहे. अशा सुसंस्कृत, धर्मनिरपेक्ष, अहिंसावादी समाजाचे दैवताचा अवमान करणाऱ्या अमित बघेलचा जळगाव जिल्हा अग्रवाल समाजातर्फे निषेध करण्यात आला आहे. तसेच छत्तीसगढ सरकारने रासुका कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर अध्यक्ष डॉ. सुरेश अग्रवाल, महामंत्री रोहीत अग्रवाल, अग्रश्री मित्तल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# यावल पोलिसांकडून गावठी दारूविरुद्ध वॉश आऊट मोहीम

**यावल :** येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी ऑपरेशन वॉश आऊट राबवले आहे. या अंतर्गत तीन गावांमध्ये धडक कारवाई करीत ५५ लीटर गावठी हातभट्टीची दारू पकडण्यात आली. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे गावठी हातभट्टी दारू विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. यावलचे पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात ऑपरेशन वॉश आऊट अंतर्गत गावठी हातभट्टी करणाऱ्यांवर कारवाईसाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. यामध्ये शिरसाड गावात अरुण जगन्नाथ भालेराव हे साकळीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका कॅनमध्ये १५ लीटर गावठी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बसले होते. त्यांना पकडण्यात आले. त्याचप्रमाणे डांभुर्णी या गावात डोणगाव जाणाऱ्या रस्त्यावर पिंपळाच्या झाडाखाली चेतन मनोहर धनगर हा ३० लीटर गावठी दारू एका कॅन मध्ये घेऊन विक्री करण्याच्या उद्देशातून बसला होता. त्याला देखील पोलिसांनी पकडले व सांगवी बुद्रूक गावातदेखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीच्या जवळ मरीमाता मंदिराच्या आडोशाला आनंद वसंत तायडे हा एका कॅनमध्ये १० लीटर गावठी दारू विक्री करण्याच्या उद्देशातून बसलेला होता. त्यालादेखील पकडण्यात आले व या तिघांविरुद्ध यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईकरिता पोलीस हवालदार सागर कोळी, उमेश सानप, योगेश खोंडे, किशोर परदेशी, जाकीर तडवी, रोहील गणेश या पथकाची नेमणूक करण्यात आली होती.

# निष्ठावंत कार्यकर्ते अन् नेत्यांशी चर्चा करूनच १५ रोजी उमेदवार जाहीर करणार- संतोष चौधरी

**भुसावळ :** महाविकास आघाडी मात्र पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते व नेत्यांशी चर्चा करूनच १५ रोजी आपला उमेदवार जाहीर करेल, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते व माजी आमदार संतोष चौधरी यांनी येथे केले. शनी मंदिर वॉर्डातील निवासस्थानी गेल्या दोन दिवसांपासून पक्षातील इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहेत. आमच्याकडे सहा उमेदवारांची नावे असून त्यातील एकाला आम्ही संधी देणार या निवडणुकीत आम्हाला नक्की यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या नऊ वर्षात शहराचा कशा पद्धतीने विकास झाला आहे, त्यामुळे या निवडणुकीत आम्ही तरुण कार्यकर्त्यांना संधी देणार आहोत. ठेकेदार असलेल्या नगरसेवकांना आमच्याकडे उमेदवारी दिली जाणार नाही, असे त्यांनी ठासून सांगितले.

माजी आमदार चौधरी यांनी सांगितले की, भाजपचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार आधीच ठरला असून आम्ही मात्र पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून १५ रोजी एका उमेदवाराचे नाव जाहीर करू. आमच्याकडे स्वाती कुणाल जंगले, शोभा रामदास सावकारे, ॲड. प्रगती पगारे, उषा मनोहर तायडे, गायत्री रूपचंद भंगाळे असून त्यातील एकाला संधी दिली जाईल, असेही संतोष चौधरी यांनी सांगितले.

महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या उबाठासह काँग्रेसने आमच्याकडे जागांची मागणी केली असून याबाबतही निवडून येणाऱ्या जागांवरच आम्ही वाटाघाटी करणार आहोत. १५ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी इच्छूक असलेल्यांची नावे आम्ही जाहीर करू. जे नागरिकांच्यासाठी रस्त्यावर उतरतील, अशांना आम्ही उमेदवारी देवू, असे यावेळी घोषित केले. यावेळी जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे , राजेंद्र चौधरी विशाल नारखेडे जयश चौधरी पदाधिकारी उपस्थित होते

# गाळ्यांच्या नव्या भाडे आकारणीचा चार दिवसात आदेश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

जळगाव महापालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळेधारकांचे गाळेभाडे समितीने निश्चीत केले आहेत. सेंट्रल फुले मार्केटसह चार संकुलाचे रेडीरेक्नर दरावर ५ टक्के तर भास्कर मार्केटसह इतर १९ संकुलांचे रेडीरेक्नर दरावर चार टक्के प्रमाणे आकारणी करण्याचा निर्णय भाडे आकारणी समितीने गुरूवारी ६ नोव्हेंबरला झालेल्या बैठकीत घेतला. आता याबाबतचा अधिकृत आदेश येत्या चार दिवसात निघणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जळगाव शहरातील महापालिकेच्या २३ व्यापारी संकुलाच्या गाळेभाडे कराराची मुदत संपलेली आहे. काही संकुलाची मुदत सन २०१२ पासून संपलेली आहे. मात्र महापालिकेतर्फे त्यांचा भाडेकरार अद्यापही निश्चीत करण्यात आलेला नव्हता. आता गाळेभाडे समितीने सेंट्रल फुले मार्केटसह चार संकुलाचे रेडीरेक्नर दरावर ५ टक्के तर भास्कर मार्केटसह इतर १९ संकुलांचे रेडीरेक्नर दरावर चार टक्के प्रमाणे आकारणी करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा आदेश येत्या तीन ते चार दिवसात निघणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**२०१२ ते २०१९ चे थकित भाडे कळीचा मुद्दा**

गाळे भाडे आकारणीत २०१२ ते २०१९ या कालावधीतील थकीत भाडे हा कळीचा मुद्दा ठरत आहे. कारण २०१२ ते २०१९ आणि २०१९ ते आजतागायत पर्यंतचे संपूर्ण भाडे भरल्याशिवाय गाळ्यांचे नूतनीकरण करता येणार नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना ही रक्कम भरावीच लागेल अन्यथा महापालिका आदेशानुसार पुढील कार्यवाही करेल असेही सूत्रांनी सांगितले.

## गतिरोधक फलक बसवा

**कासोदा (ता. एरंडोल) :** येथे गतिरोधक असल्याचे फलक बसवा अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा प्रहार अपंग क्रांतीचे योगेश लोटन चौधरी यांनी दिला आहे. वनकोठे ते बांभोरी शिवारात रस्ते अपघात वाढले. गतिरोधकाजवळ पिवळे पट्टे मारण्याची मागणी कासोदा गाव, वनकोठे गाव, वनकोठे नांदखुर्द वळण रस्ता, वनकोठे जिल्हा परिषद शाळा, बांभोरी गावात जाणारा वळण रस्ता, धान्य मार्केट, अर्जुन नगर, कासोदा नांदखुर्द वळण रस्ता, मंत्री शाळा या काही ठिकाणी गतिरोधक आहेत तर काही ठिकाणी नाहीत. ज्या ज्या ठिकाणी गतिरोधक आहेत त्यावर पिवळे पांढरे पट्टे मारून गतिरोधक असल्याचे सूचना फलक लावण्याची मागणी वाहन धारकांनी केली आहे. रस्ता अपघातात जीव गेल्यास त्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील, असेही प्रहार अपंग क्रांतीचे योगेश लोटन चौधरी यांनी म्हटले आहे.

**Change In Name**

I HAVE CHANGED MY NAME FROM "ASLAM ALI SAYYED ASHRAF ALI" (OLD NAME). TO "ASLAM ALI ASHRAF ALI" (NEW NAME). ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

**Change In Name**

I HAVE CHANGED MY NAME FROM "ALTAF BEGUM HATAM BEG" (OLD NAME). TO "ALTAF BEE ASHRAF ALI" (NEW NAME). ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

**टायटल व्हेरिफिकेशनची जाहिर नोटीस**

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निम सरकारी कार्यालय यांना मला माझे पक्षकार **श्री. नरेंद्र बारीकराव सोनवणे (पाटील)**, रा.चोपडा, ता. चोपडा, जि. जळगांव यांनी दिलेल्या हक्क व अधिकारान्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, [illegible]

जळगाव
दिनांक :- १०/११/२०२५
सही/-
ॲड. शैलेश रविकांत नागला
ऑफिस:- प्लॉट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (छाब्रा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव

**खरेदीखताचा दस्त हरविल्याबाबतची तमाम जाहीर नोटीस**

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना व को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना **मंगेश कुबेर वैद्य, वैशाली मंगेश वैद्य,** रा. चोपडा, ता. चोपडा जि. जळगांव, यांच्यावतीने या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
१) **मिळकतीचे वर्णनः-** तु.जि. जळगांव, पो.तु.ता. चोपडा पैकी मौजे चोपडा येथील नगर भूमापन क्र. ५९९०/१३७ यांसी क्षेत्र २९८.९० चौ.मी., या जागेवर असलेले बांधकाम त्याचे बांधकाम क्षेत्र २६८.०६ चौ. मी. यांसी [illegible]

जळगाव
दिनांक :- १०/११/२०२५
सही/-
ॲड. शैलेश रविकांत नागला
ऑफिस:- प्लॉट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (छाब्रा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव

CLASSIFIEDS

महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी
१५० वर्षाची परंपरा असलेले
श्रीभृगूज्योतिषकेंद्र
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरूपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथं "निराकरण" ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्न (खडे), मंत्रसिध्दकवच यंत्र (अनुभव सिध्द खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२७७४१५९,९८२०४७८११

तरुण भारत तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच
राष्ट्रीय विचारांच्या 'जळगाव तरुण भारत' तर्फे लवकरच 'ज्येष्ठ नागरिक मंच' ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

Kirloskar
जगप्रसिध्द किर्लोस्कर कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती, शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप, मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.
संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी'२६, नवीपेठ, जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत, जळगांव
☎ 2232641 To 2232645

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक संजय प्रभाकर नारखेडे यांनी पी.एम.उद्योग, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : चंद्रशेखर दिगंबर जोशी यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६९९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# अमेरिकेत तीन दिवसांत सहा हजार उड्डाणे रद्द

**• न्यू यॉर्कसह चार विमानतळे प्रभावित • शटडाऊनचा परिणाम**

**◆ वॉशिंग्टन, १० नोव्हेंबर**

अमेरिकेतील सरकारी शटडाऊनचा परिणाम सामान्य लोकांवर पडत आहे. मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द करण्यात आल्याने देशातील विमानतळावर प्रवाशांच्या अडचणी वाढल्या आहेत. एक तर उड्डाणे रद्द केली जात आहेत अथवा त्यांना विलंब होत आहे. शनिवारी अमेरिकी विमान कंपन्यांनी १५०० पेक्षा उड्डाणे रद्द केली. रविवारी ही संख्या वाढून २९०० झाली. तीन दिवसांत सहा हजार उड्डाणे रद्द झाली आहेत. हा निर्णय उड्डयन नियामक संस्था एफएएच्या आदेशानंतर घेण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे उड्डाणांची संख्या कमी करावी लागली आहे.



विमानांचे उड्डाण आणि ते धावपट्टीवर उतरवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडणारे विमान वाहतूक नियंत्रक (एटीसी) जवळपास एक महिन्यापासून बिनपगारी काम करीत आहेत. त्यामुळे कित्येकांनी कामावर येणे बंद केले. त्याचा फटका विमान उड्डाणांना बसत आहे. सोमवारी सकाळपर्यंत १६०० उड्डाणे रद्द करण्यात आली. मंगळवारी जवळपास हजार उड्डाणे रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले. मर्यादित कर्मचाऱ्यांसह सुरक्षितता निश्चित करण्यासाठी या आठवड्याच्या अखेरीपर्यंत उड्डाणांमध्ये१० टक्के कपात करावी लागणार आहे, असे एफएएने स्पष्ट केले. शनिवारी आणि रविवारी चार टक्के कपात करण्यात आली होती. मंगळवारी ती सहा टक्के होणार आहे.

**एटीसीकडे अपुरे कर्मचारी**

परिस्थितीत सुधारणा न झाल्यास २० टक्क्यांपर्यंत उड्डाणे रद्द करावी लगू शकतात, असा इशारा परिवहन मंत्री शॉन डफी यांनी दिला. पगार मिळत नसल्याने नियंत्रकांनी कामावर येणे बंद केले. एटीसीच्या अपुऱ्या मनुष्यबळाबाबत सरकार अगोदरच झुंजत आहे. त्यातच शटडाऊनमुळे परिस्थिती गंभीर झाली असल्याचे डफी यांनी सांगितले. कित्येक वरिष्ठ नियंत्रक सेवानिवृत्ती स्वीकारत असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यू यॉर्क, ऑरलँडो आणि डेट्रॉईटसारख्या मोठ्या विमानतळांवर उड्डाणांमध्ये एक तास किंवा त्यापेक्षा जास्त उशीर होते असल्याने स्थिती अतिशय गंभीर झाली आहे.

**‘थँक्सगिव्हिंग’पर्यंत परिस्थिती खराब**

येत्या काही दिवसांत काँग्रेसमध्ये सहमत होईल. पण, परिस्थिती सामान्य होण्यास वेळ लागेल, असे तज्ज्ञांनी सांगितले. शटडाऊन संपुष्टात न आल्यास ‘थँक्सगिव्हिंग’ सुट्यांपर्यंत विमान प्रवास अधिक प्रमाणात मर्यादित होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने तोडगा काढला नाही, तर येत्या काही दिवसांत अमेरिकेची हवाई वाहतूक जवळपास ठप्प होऊ शकते.

## आता चांदीवरही मिळणार कर्ज

**आरबीआयचा निर्णय**

**◆ नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

भारतीय रिझर्व्ह बँकेने एक महत्त्वाचा निर्णय घेत नागरिकांना नवीन पर्याय उपलब्ध करून दिला आहे. आता फक्त सोन्यावरच नव्हे तर घरात ठेवलेल्या चांदीवर देखील कर्ज घेता येणार आहे.

आरबीआयने यासाठी अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून ही नवी नियमावली रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया डायरेक्शन्स २०२५ अंतर्गत लागू होणार आहे. हे नियम १ एप्रिल २०२६ पासून देशभरात लागू होतील.

याअंतर्गत खाजगी, व्यावसायिक बँका ज्यात स्मॉल फायनान्स आणि प्रादेशिक बँकांचाही समावेश असेल, अर्बन आणि रूरल को-ऑपरेटिव्ह बँका, एनबीएफसी आणि हाऊसिंग फायनान्स कंपन्या आदींना सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंवर कर्ज देण्याची परवानगी असेल.

फक्त दागिन्यांच्या किंवा नाण्यांच्या स्वरूपातील सोने आणि चांदी यावरच कर्ज दिले जाईल. मात्र, गोल्ड ईटीएफ, म्युच्युअल फंड युनिट्स यावर कर्ज मिळणार नाही, असेही आरबीआयने स्पष्ट केले आहे. यात सोन्याचे दागिने एक किलोपर्यंत, चांदीचे दागिने दहा किलोपर्यंत गहाण ठेवता येतील.



ईशान्य भारतात तिन्ही सेनादलांचा युद्धाभ्यास सुरू आहे. अत्याधुनिक विमाने आणि लढाऊ जहाजे यात सहभागी झाली आहेत. अरुणाचलच्या कठीण पर्वतांवर युद्धाभ्यास करताना लष्कराच्या स्पीअर कॉर्पस्‌चे जवान

# लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही : शिंदे

**◆ ठाणे, १० नोव्हेंबर**

महायुती सरकारची लाडकी बहीण योजना सुरूच राहील, ही योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यांनी ही योजना बंद पडल्याच्या अफवा फेटाळून लावल्या आहे. त्यांनी निवडणुकीतील महायुतीच्या यशाचे श्रेय या योजनेच्या लाभार्थींना दिले आहे.

कल्याण-डोंबिवलीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात १०० हून अधिक कार्यकर्ते, पदाधिकारी व माजी नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला, यात उबाठा गटाच्या सदस्यांचाही समावेश आहे. उपमुख्यमंत्र्यांनी त्यांना पक्षाचा भगवा दुपट्टा भेट दिला. पुढील महिन्यात राज्यात होणाऱ्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी ही घटना घडली आहे.



महाराष्ट्रात शिवसेनेचा वाढता पाठिंबा सेनेचे संस्थापक दिवंगत बाळासाहेब ठाकरे आणि शिंदे यांचे मार्गदर्शक आनंद दिघे यांच्या आदर्शांचे पालन करण्याला कारणीभूत असल्याचे सांगितले. शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना (२०२२ ते २०२४ पर्यंत) केलेल्या त्यांच्या कामावर प्रकाश टाकला व महिलांना मासिक आर्थिक मदत देणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सर्वांत लोकप्रिय योजना आहे. ही योजना कधीही बंद होणार नाही, असे सांगितले.

गत वर्षी भाजपा, शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश असलेल्या महायुतीला राज्यात पुन्हा सत्तेत आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान केल्याबद्दल लाभार्थींना श्रेय दिले. संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेत इतके प्रवेश का? कारण ही शिवसेना बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांनी पुढे जाते व शिवसेना आपला शब्द पाळते, हा आत्मविश्वास प्रत्येकाच्या मनात आहे. आणि म्हणूनच लोक आमच्यासोबत येतात, असे शिंदे म्हणाले.

स्थानिक विकासाबाबत बोलताना त्यांनी आपले पुत्र आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण-डोंबिवलीतील कामाचे कौतुक केले. हजारो कोटींच्या प्रकल्पांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, हा प्रदेश आमूलाग्र बदलला आहे.

# महिला आरक्षणाची प्रक्रिया नेमकी अडली कुठे?

**सुप्रीम कोर्टाने केंद्राला बजावली नोटीस**

**◆ नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या मुद्यावर बऱ्याच काळापासून मंथन सुरू आहे. ही मागणी न्यायालयातही प्रलंबित आहे. यासंदर्भातील प्रक्रिया नेमकी कुठे अडली आहे, अशी विचारणा करत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले, परंतु त्याची अंमलबजावणी एका अशा प्रक्रियेशी जोडली गेली आहे जी अद्याप सुरू झालेलीच नाही. जनगणना सुरू झालेली नाही आणि मर्यादा निर्धारण त्यानंतरच होणार आहे. कायदा मंजूर झाला आहे, तर तो लागू करण्यासाठी अनिश्चित अट का घातली जातेय? त्यासाठी कोणताही तर्कसंगत आधार सांगितलेला नाही किंवा कायमर्यादाही दिलेली नाही.



यावर न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या, कोणता कायदा कधी लागू करायचा हे कार्यकारी (सरकार) विभागाचे काम आहे. न्यायालय एवढेच विचारू शकते की सरकार याबाबत काय प्रस्ताव ठेवत आहे. त्यांनी हेही नमूद केले की, सरकार कदाचित हे वैज्ञानिक आकडेवारीच्या आधारे लागू करू इच्छित असेल.

वकिलांनी प्रत्युत्तरात म्हटले की, जेव्हा सरकारने ३३ टक्के महिला आरक्षणाचा निर्णय घेतला आहे तेव्हा त्यांच्याकडे आधीपासूनच वैज्ञानिक डेटा असला पाहिजे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली असून पुढील सुनावणीत सरकारला महिला आरक्षण कायदा लागू करण्याची निश्चित वेळापत्रकाबाबतची भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे.

## चित्रपट वार्ता

### तमाशा साम्राज्ञीची भूमिका साकारणार श्रद्धा

**मुंबई :** ‘छावा’ सारखा तुफान यशस्वी चित्रपट देणारे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर सध्या नव्या प्रोजेक्टची तयारी करत आहेत. हा चित्रपट तमाशा साम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित असेल. विशेष म्हणजे, श्रद्धा कपूर यात विठाबाईच्या भूमिकेत दिसणार आहे. या प्रोजेक्टसाठी गेल्या काही दिवसांपासून श्रद्धा लावणीचेही प्रशिक्षण घेत आहे. आता यात मुख्य अभिनेत्याचेही नाव निश्चित झाले आहे. यात रणदीप हुड्डाची वर्णी लागली आहे. या निमित्ताने श्रद्धा आणि रणदीप हुड्डा ही जोडी पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. विठाबाई नारायणगावकर यांना लावणी आणि तमाशा कलाकारांप्रती असलेले अतुलनीय योगदान लक्षात घेता दोन वेळा राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. श्रद्धाचे वडील शक्ती कपूर पंजाबी असले तरी आई मराठी कुटुंबातील आहे. त्यामुळे श्रद्धाला मराठी बाज आत्मसात करणे फारसे कठीण जाणार नाही.




### आधी परीक्षा देणार मग चित्रपट करणार अनीत

**मुंबई :** काही महिन्यांपूर्वी युवा पिढील वेड लावणाऱ्या ‘सैंयारा’ या चित्रपटातील अभिनेत्री अनीत पड्डा हिच्याकडे नव्या चित्रपटांची नुसती रांग लागली आहे. त्यातच तिला यशराज फिल्म्सचा नवा चित्रपटही मिळाला आहे. मात्र, सध्या तिने चित्रपटाशी संबंधित सर्व काम थांबवून अभ्यास पूर्ण करण्याचे ठरवले आहे. चित्रीकरणाला सुरुवात करण्यापूर्वी ती महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहे. सध्या ती अभ्यासात व्यस्त आहे. ती राज्यशास्त्रात बी.ए. करते आहे. अभ्यास आणि काम यात ताळमेळ साधण्याच्या प्रयत्नात तिने अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे. डिसेंबर-जानेवारीमध्ये तिची अंतिम वर्षाची परीक्षा होणार आहे. त्यानंतर ती ‘शक्ती शालिनी’ या चित्रपटाचे चित्रीकरण करणार आहे.



### प्रथमच डॉक्टरच्या भूमिकेत उमेश कामत

**मुंबई :** न्यूरोस्पाईन शल्यचिकित्सक डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या जीवनावर आधारित ‘ताठ कणा’ हा चित्रपट येतो आहे. यात डॉ. रामाणी यांच्या भूमिकेत उमेश कामत दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच समोर आला. या प्रसंगी उमेश म्हणाला की, डॉक्टरांची भूमिका करायला मिळणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. या चित्रपटात त्याच्या पत्नीच्या भूमिकेत अभिनेत्री दिप्ती दवे झळकणार आहे. या दोघांसह चित्रपटात सायली संजीव, सुयोग गोऱ्हे, अजित भुरे, शैलेश दातार, रवी गोसाई आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. येत्या २८ नोव्हेंबरला हा चित्रपट प्रदर्शित होत आहे.





जगात शांतता नांदावी म्हणून बौधगया येथील महाबोधी मंदिरात पारंपरिक वाद्ये वाजवीत प्रार्थना करताना तिबेटीयन लामा

# बंगळुरू विमानतळावर सामूहिक नमाज

**भाजपाची सिद्धरामय्या यांच्यावर टीका**

**◆ बंगळुरू, १० नोव्हेंबर**

बंगळुरू विमानतळावर सामूहिक नमाजावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ वर काही लोक नमाज अदा करतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. भाजपाचे म्हणणे आहे की सिद्धरामय्या यांचे सरकार राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याबद्दल बोलत असले तरी सार्वजनिक ठिकाणी अशा धार्मिक कार्यक्रमांना ते पाठिंबा देते. यातून सिद्धरामय्या यांचा दुटप्पीपणा स्पष्ट झाला आहे.

वृत्तानुसार, मक्का येथे जाणारे प्रवासी टर्मिनल २ वर नमाज अदा करत होते. नमाजासाठी टर्मिनलमध्ये एक स्वतंत्र हॉल तयार करण्यात आला आहे. व्हायरल व्हिडीओमध्ये नमाजाच्या वेळी सुरक्षा कर्मचारी आणि विमानतळ कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून येते. तथापि, कोणीही त्यांना आत जाण्यास सांगितले नाही.

सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करताना भाजपा नेते विजय प्रसाद यांनी विचारले, बंगळुरू विमानतळाच्या टर्मिनल २ वर हे कोणी घडू दिले? आदरणीय मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि मंत्री प्रियांक खडगे, तुम्ही याला मान्यता दिली का? या लोकांनी उच्च सुरक्षा विमानतळ झोनमध्ये नमाज अदा करण्यासाठी पूर्वपरवानगी घेतली होती का? त्यांनी विचारले, काँग्रेसला रा. स्व. संघाचे कार्यक्रम, पथसंचलन आणि शाखांबद्दल काय अडचण आहे? काँग्रेस सरकार अशा गोष्टींकडे डोळेझाक करते, जी एक गंभीर समस्या आहे. कर्नाटक सरकारने विमानतळांवर कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय कार्यक्रमांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये संघाच्या उपक्रमांचा समावेश आहे. अलिकडेच, कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खडगे यांनी सिद्धरामय्या यांना पत्र लिहून सार्वजनिक ठिकाणी संघाच्या कार्यक्रमांवर बंदी घालण्याची मागणी केली.



## बनावट पावत्यांद्वारे इस्कॉनची २ कोटींची फसवणूक

**◆ कोलकाता, १० नोव्हेंबर**

येथील इस्कॉनला २ कोटी रुपयांच्या बनावट पावत्या सादर करून फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी एका पुस्तक पुरवठादाराला अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. इस्कॉनने एका पुस्तक पुरवठादाराकडून धार्मिक पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आदेश दिले होते.

पुरवठादाराने ऑर्डरपेक्षा कमी पुस्तके वितरित केल्याचा आरोप आहे आणि २ कोटी रुपयांचे पूर्ण पैसे मागण्यासाठी बनावट पावत्या सादर केल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून देवराज भट्टाचार्य असे त्याचे नाव आहे. देवराजला न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला १८ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. काही वर्षांपूर्वी इस्कॉनने भट्टाचार्य यांना धार्मिक पुस्तकांसाठी मोठी ऑर्डर दिली होती असे प्रारंभिक चौकशीत असे दिसून आले आहे. इस्कॉनच्या अधिकाऱ्यांनी २०१९ मध्ये भट्टाचार्य आणि सहकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली, असे ते म्हणाले.

# आसाममध्ये मुस्लिम अधिक समृद्ध होताहेत्

**◆ गुवाहाटी, १० नोव्हेंबर**

आसाममध्ये लोकसंख्याशास्त्रीय बदलाशिवाय ‘आर्थिक बदल’ सुद्धा होत आहेत, यात मुस्लिम अधिक समृद्ध होत आहेत, याचा अर्थ आसामी लोकांचे आत्मसमर्पण सुरू झाले आहे, असा दावा आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केला आहे.

राज्यात हिंदूंची संख्या कमी होत आहे, तर मुस्लिमांची संख्या वाढत आहे. सरकारकडे २००१ ते २०११ दरम्यान हिंदू व मुस्लिम लोकसंख्येच्या वाढीचा डेटा आहे. लोकसंख्याशास्त्रीय बदल वेगाने झाला आहे. आसामी लोकांच्या आत्मसमर्पणाचा एक अध्याय सुरू झाला आहे, असे ते म्हणाले.



गत वर्षी जारी केलेल्या नवीन निर्देशानुसार, हिंदू व मुस्लिमांमधील जमीन विक्रीच्या परवानग्यांची सरकार छाननी करत आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परवानग्यांमध्ये आसामी व स्थानिक मुस्लिमांची संख्या जास्त आहे आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारला त्यात कोणतीही अडचण नाही. हिंदूंकडून मुस्लिमांना जमिनीची विक्री खूप जास्त आहे, तर मुस्लिमांकडून हिंदूंना जमिनीची विक्री खूप कमी आहे असे आम्हाला दिसत आहे. लोकसंख्यात्मक बदलाशिवाय संपत्ती निर्मितीमध्येही बदल झाला आहे, असे ते म्हणाले.

# उत्तरप्रदेशात शाळांमध्ये ‘वंदे मातरम्’ अनिवार्य

**मुख्यमंत्री योगी यांची घोषणा**

**◆ गोरखपूर, १० नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ‘वंदे मातरम्’ गाणे अनिवार्य असेल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी गोरखपूर येथून याची घोषणा केली.

गोरखपूरमध्ये एकता यात्रेला सुरुवात होण्यापूर्वी एका सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री योगी म्हणाले, राष्ट्रीय गीत वंदे मातरम्‌बद्दल आदराची भावना असली पाहिजे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सन्मानासोबतच, आम्ही उत्तरप्रदेशातील प्रत्येक शाळा आणि शैक्षणिक संस्थेत राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम्’ गाणे देखील अनिवार्य करू. त्यामुळे उत्तरप्रदेशातील प्रत्येक नागरिक आपली मातृभूमी भारतमातेबद्दल आदर आणि आदराची भावना निर्माण करू शकेल.

एकता यात्रेच्या प्रारंभी, मुख्यमंत्री योगी यांनी काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर जोरदार निशाणा साधला. त्यांनी देशाच्या फाळणीसाठी काँग्रेसच्या तुष्टीकरण धोरणाला जबाबदार धरले. मुख्यमंत्री योगी म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ हे स्वातंत्र्यलढ्यादरम्यान स्वातंत्र्याचे घोषवाक्य बनले. १८९६ ते १९२२ पर्यंतच्या सर्व काँग्रेस अधिवेशनांमध्ये ते गायले जात होते. तथापि, १९२३ मध्ये जेव्हा मोहम्मद अली जौहर काँग्रेस अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी त्याला विरोध केला आणि ‘वंदे मातरम्’ गाण्यास नकार दिला. जर काँग्रेसने त्यावेळी मोहम्मद अली जौहर यांना हटवले असते आणि ‘वंदे मातरम्’चा अपमान सहन केला नसता तर देशाचे विभाजन झाले नसते. ते म्हणाले की, एका सपा खासदाराने त्याला विरोध केला आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, जर आपण आपल्या महापुरुषांचा आदर केला नाही तर देश कुठे जाईल? देशातील राष्ट्रीय एकता आणि अखंडतेला आव्हान देणाऱ्यांना सहन केले जाऊ शकत नाही.



**तुष्टीकरणामुळेच देशाचे विभाजन**

मुख्यमंत्री योगी म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ला विरोध करणाऱ्या मोहम्मद अली जौहर यांना हटवण्याऐवजी काँग्रेसने ‘वंदे मातरम्’मध्ये सुधारणा करण्याबद्दल बोलले. अशा तुष्टीकरण धोरणांमुळेच १९४७ मध्ये देशाचे विभाजन झाले. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आता, जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले जात आहेत, तेव्हा ‘वंदे मातरम्’ला पुन्हा एकदा विरोध केला जात आहे.

## अग्रलेख...

# सौहार्दासह सावधगिरीही हवीच

गुजरात एटीएसने रविवारी धडाकेबाज कामगिरी करीत तीन दहशतवाद्यांना अटक केली. दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाया भारताला नवीन नाहीत. भारतासोबत समोरासमोर युद्ध करून जिंकू शकत नाही, याची जाणीव असलेल्या पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाच्या स्वरूपात छद्मयुद्ध धगधगत ठेवण्याचा प्रयत्न चालविला हा इतिहास आहे. पाकिस्तानचा दिवंगत हुकूमशहा जनरल झिया उल हकने 'ऑपरेशन टोपॅक'च्या माध्यमातून दहशतवादी हल्ले करीत भारताला किती तरी वेळा रक्तबंबाळ केले. काँग्रेस काळात दहशतवादाच्या विरोधातले धोरण गुळमुळीत होते. २०१४ पासून दहशतवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यात आली. सुरक्षा यंत्रणांना कारवायांसाठी मुक्तहस्त देण्यात आला. त्यानंतर अलिकडेच पहलगाम येथील हल्ल्याला प्रत्युत्तर देताना 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला धडा शिकवला. मात्र, कट्टरवादी कधीही आणि कोणत्याही स्वरूपात दहशतवादी हल्ले घडवू शकतात आणि त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरूच असल्याचे गुजरात एटीएसने रविवारी केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले. दहशतवाद्यांनी अत्यंत जहाल अशा रिसिन विषाच्या माध्यमातून नरसंहार घडवण्याचा कट रचल्याचे या कारवाईत समोर आले. आतापर्यंत स्फोट घडवणे, गोळीबार करणे, लोन वुल्फ अटॅक, आत्मघाती हल्ले या स्वरूपातील दहशतवाद लोकांनी पाहिला आहे. मात्र, घातक स्वरूपाच्या विषाचा वापर सामूहिक नरसंहारासाठी करण्याचा कट शिजत असल्याचे देशाला प्रथमच कळले. देशासमोर या माध्यमातून जैविक आणि रासायनिक दहशतवादाचे नवीन विक्राळ स्वरूप समोर आले.

रिसिन हे अत्यंत विषारी नैसर्गिक प्रथिनजन्य विष आहे. ते एरंडीच्या बियांपासून तयार केले जाते. पेशीतील प्रथिने तयार करणाऱ्या घटकाला निष्क्रिय करणारे हे विष. ते पेशीतील प्रथिन संश्लेषण रोखते आणि विषाला पेशीत प्रवेश करण्यासाठी मदत करते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. रिसिन शरीरात गेल्यावर पेशींचा नाश होणे सुरू होते आणि अवयव निकामी होऊ लागतात. रिसिनचे काही मायक्रोग्रॅम प्रमाणही मानवासाठी घातक ठरू शकते. हे जहाल विष श्वसनाद्वारे गेल्यास फुफ्फुसांचा गंभीर दाह आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. ते आहाराद्वारे शरीरात गेल्यास उलटी, जुलाब, पोटदुखी आणि मूत्रपिंड निकामी होण्यासारख्या गुंतागुंती उद्‌भवू शकतात. महत्त्वाचे म्हणजे रिसिनसाठी कोणतेही प्रतिऔषध उपलब्ध नाही. त्यावर केवळ लक्षणांवर आधारित उपचार आहेत. रिसिन अल्प प्रमाणातही प्राणघातक ठरते. हत्यांसाठी रिसिनचा वापर झाल्याची उदाहरणे असली तरी, मोठ्या प्रमाणात प्राणहानी करण्यासाठी त्याचा आजवर वापर झालेला नाही. १९७८ मध्ये सर्वप्रथम रिसिनचा वापर हत्येसाठी करण्यात आला होता. हा प्रकार लंडनमध्ये घडला. तिथे जॉर्जी मार्कोव्ह नावाच्या राजकीय अभ्यासकाला धारदार पॅलेटद्वारे रिसिन टोचून त्याची हत्या करण्यात आली होती. शवविच्छेदन अहवालात त्याच्या शरीरात रिसिन आढळले होते. या घटनेनंतर रिसिनच्या घातकतेकडे जगाचे लक्ष वेधले गेले होते. अनेक देशांनी या घटकाच्या वापरावर आणि वाहतुकीवर नजर ठेवण्यास सुरू केली. २०१३ मध्ये अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि काही सिनेटर्सना रिसिनचा वापर केलेली पत्रे पाठवण्यात आली होती. वेळेवर कारवाई होऊन ती पत्रे जप्त करण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. यातील अनेक प्रकरणे स्थानिक गुन्हेगारीशी संबंधित होती. त्याला दहशतवादाचा आयाम नव्हता. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जागतिक पातळीवर रिसिनवर कडक नियंत्रण आहेत. यासंबंधीच्या संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानला धडा शिकवला. त्यानंतर जम्मू-काश्मिरात तुरळक प्रमाणात दहशतवादी कारवाया झाल्या. मात्र, अत्यंत घातक स्वरूपाचा दहशतवादी कट हा प्रथमच समोर आला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवादी संघटनांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. अशा काळात दहशतवादी संघटना काही काळ शांत बसतात आणि नंतर दबाव झुगारण्यासाठी मोठा हल्ला घडवतात. त्यानुसारच हल्ल्याचा कट रचण्यात आल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. यावेळेस हल्ल्याची पद्धत बदलण्याचा प्रयत्न दहशतवाद्यांनी केला. हा कट उधळून सुरक्षा यंत्रणांनी मोठा घातपात टाळला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आजपर्यंत दहशतवादाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. हा बदल केवळ हल्ल्यांच्या तंत्रात नाही, तर त्यामागील विचारसरणी, तंत्रज्ञानातही दिसून येतो. पूर्वी दहशतवादी संघटना म्हणजे ठरावीक भूभागात केंद्रिकृत लष्करी शिस्तीत चालणारे गट असायचे. आयरिश लिबरेशन आर्मी, लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम किंवा अल-कायदा ही त्याची उदाहरणे आहेत. या गटांकडे स्पष्ट नेतृत्व, प्रशिक्षण केंद्र आणि निधीचे स्थिर स्रोत असत. आता मात्र विकेंद्रित पद्धतीने दहशतवादी संघटना काम करतात. त्या 'सेल' आधारित रचना निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्यांना शोधणे, नियंत्रणात ठेवणे किंवा पूर्णतः नष्ट करणे अधिक अवघड झाले आहे. इंटरनेट आणि समाज माध्यमांनी दहशतवादाला नवीन परिणाम दिले आहेत. दहशतवादी संघटना मोठ्या प्रमाणावर प्रचार, निधी संकलन, भरती आणि संवादासाठी इंटरनेटचा वापर करतात. सायबर दहशतवाद म्हणजे संगणक प्रणाली, सरकारी डेटाबेस, वीज, परिवहन, बँकिंग आदी संरचनांवर सायबर हल्ले करून भीती आणि गोंधळ निर्माण करतात. काही संघटनांनी 'डार्क वेब' आणि 'क्रिप्टोकरन्सी'द्वारे आपले आर्थिक व्यवहार गुप्त ठेवण्याचे तंत्र विकसित केले आहे. दहशतवाद नेहमी संघटित स्वरूपात असतोच असे नाही. अनेक वेळा समाज माध्यमांवरून कट्टर विचारांनी प्रभावित होऊन एखादी व्यक्ती स्वतःच दहशतवादी हल्ल्याची योजना आखते आणि अंमलबजावणी करते. या प्रकाराला लोन वुल्फ अटॅक म्हटले जाते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे 'बायोटेररिझम' आणि 'केमिकल टेररिझम' हे नवे धोके निर्माण झाले आहेत. अल्प साधनांतही विषारी घटक, जैविक संसर्गजन्य घटक किंवा रासायनिक शस्त्रे तयार करून नरसंहार घडवणे शक्य झाले आहे. अशा प्रकारचे प्रयत्न अनेक वेळा अपयशी ठरले असले, तरी मानसिक परिणाम आणि सार्वजनिक भय निर्माण करण्याची त्यांची क्षमता मोठी आहे. त्यामुळेच अशा प्रयोगांवर कठोर नियंत्रण ठेवले जाते. अशा प्रकारच्या हल्ल्याचा प्रयत्न देशात झाला आहे.

दहशतवादाच्या मुळाशी अनेकदा असमानता, धार्मिक द्वेष, आर्थिक अन्याय, राजकीय उपेक्षा आणि परस्पर अविश्वास देखील असतो. या सर्व गोष्टींचा मुकाबला करण्यासाठी सामाजिक सौहार्द म्हणजेच सामाजातील परस्पर प्रेम, सहिष्णुता आणि एकात्मता अत्यंत आवश्यक ठरते. सामाजिक सौहार्द हे फक्त एक नैतिक मूल्य नसून, ते दहशतवाद रोखण्याचे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. सामाजिक सौहार्द म्हणजे विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृती असलेल्या लोकांमध्ये परस्पर आदर, सहअस्तित्व आणि समतेची भावना वाढवणे. जिथे परस्परांच्या श्रद्धा, परंपरा आणि विचारांचा सन्मान करतात, तिथे समाजात एकोपा निर्माण होतो. भारतासारख्या बहुविविधतेने नटलेल्या देशात हे मूल्य अधिक महत्त्वाचे ठरते. समाजात सौहार्दता टिकते, तेव्हा लोक दहशतवाद्यांच्या प्रचाराला बळी पडत नाहीत. म्हणूनच सामाजिक सौहार्द हा दहशतवादाविरुद्धचा पहिला मुद्दा ठरतो. या लढाईत सामाजिक सौहार्द सर्वांत शक्तिशाली शस्त्र ठरते. जेव्हा प्रत्येक नागरिक समाजातील एकोपा टिकवण्याचे काम करतो, तेव्हा दहशतवादाला पाय रोवण्याची जागाच राहत नाही. सौहार्द म्हणजे केवळ शांततेचे प्रतीक नसते. तो राष्ट्रीय सुरक्षेचा पाया असतो. त्यामुळे समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन एकतेचा दीप कायम तेवत ठेवला पाहिजे. दुसरी आणि त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे सौहार्द राखतानाच सावधगिरी पण बाळगायला शिकले पाहिजे. अत्र-तत्र सर्वत्र सावध असले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने सजग असले पाहिजे. भारतासारखा खंडप्राय देश दहशतवादमुक्त आणि सुरक्षित राहायचा असेल तर सौहार्दाच्या सुदृढीकरणासह सावधगिरीला पर्याय नाही.


## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# बगराम एअरबेससाठी आटापिटा

भारताने अद्याप तालिबानशासित अफगाणिस्तानला अधिकृतपणे मान्यता दिली नसली, तरी तो मानवतावादी आणि विकासात्मक मदत देत आहे. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वैदिक काळापासून आहेत. कारण गांधार हा एकेकाळी भारताचा भाग मानला जात होता. अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीत भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने तालिबानला मान्यता दिली नसली, तरी नेहमीच मानवतावादी मदत दिली आहे. भारताने तेथे रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन बांधले आहे. तालिबानची राजवट असूनही भारताने अन्नधान्य, औषधे, भूकंप मदत, कोविड लस आणि इतर आवश्यक साहित्य पाठवून अफगाणिस्तानशी चांगला शेजारधर्म निभावला आहे. तालिबानला हेदेखील समजले आहे की भारतापासून अंतर राखणे व्यावहारिक नाही आणि भारत आपल्या हितांचे रक्षण करण्यासाठी तालिबानशी संबंध राखण्यास उत्सुक आहे. विश्वासाचे संबंध असताना भारत आणि अफगाणिस्तानमध्ये जाणीवपूर्व गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. भारताने तालिबान राजवटीकडे कधीही बगराम एअरबेसची मागणी केली नाही, ना अफगाणिस्तानने ते भारताच्या ताब्यात देण्याचे सूतोवाच केले; परंतु अफगाणिस्तान अमेरिकेला बगराम एअरबेस द्यायला विरोध करत असताना भारताला देण्यास मात्र तयार असल्याचे वातावरण तयार करण्यात आले. त्याचा अफगाणिस्तानने लगेच इन्कार केला. याबाबत तालिबान अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, भारताने अफगाणिस्तानमधील बगराम एअरबेसवर देण्याची विनंती केलेली नाही किंवा ऑफरही दिलेली नाही. अफगाण अधिकाऱ्यांनी असे दावे बनावट असल्याचे सांगत फेटाळून लावले.

वस्तुतः भारताच्या सध्याच्या अफगाण प्रशासनाशी असलेल्या भागीदारीवर काही विशिष्ट गटांकडून शंका उपस्थित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले. बगराम एअरबेस अमेरिकेने विकसित केला होता आणि अफगाणिस्तानमधील वीस वर्षांच्या लष्करी मोहिमेदरम्यान एक प्रमुख एअरबेस म्हणून काम केले होते. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी उघडपणे तशी इच्छा व्यक्त केली आहे. तथापि, अफगाण तालिबानने ट्रम्पची मागणी स्पष्टपणे नाकारली आहे. अफगाण लोक धमक्यांना घाबरत नाहीत; उलट आम्ही आणखी २० वर्षे लढण्यास तयार आहोत, असे खणखणीत प्रत्युत्तर दिले आहे. जंग जंग पछाडूनही अमेरिकेला अफगाणिस्तान जिंकण्यात कधीही यश आले नाही. उलट, अमेरिकन सैन्याच्या नाराजीमुळे तर ज्यो बायडेन यांच्या काळात अमेरिकेला तिथून आपले सैन्य मागे घ्यावे लागले होते.



अमेरिका, चीन आणि पाकिस्तान या सर्वांचे लक्ष बगराम एअरबेसवर आहे. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवू इच्छित आहे, मात्र ते चीनच्या अणु प्रयोगशाळेपासून अगदी जवळ आहे. ते व्याप्त काश्मीर (पीओके) आणि बलुचिस्तानपासूनही जवळ आहे. शिवाय, ते संपूर्ण मध्य आशियामध्ये प्रवेश प्रदान करते. अलिकडेच अफगाण तालिबानने हा एअरबेस भारताला सोपवल्याची बातमी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरली. तथापि, अफगाण सरकारी अधिकाऱ्यांनी हे वृत्त निराधार असल्याचे सांगत फेटाळून लावले.

चीनची सर्वांत जवळची अणु प्रयोगशाळा बगराम एअरबेसपासून २००० किलोमीटर अंतरावर, वायव्य चीनमधील लोप नूर नावाच्या परिसरात आहे. हे अंतर रस्त्याने किंवा इतर मार्गांनी अनेक तासांचे असू शकते. तथापि, लॉकहीड एसआर-७१ ब्लॅकबर्डसारखी आधुनिक लष्करी विमाने ते सुमारे एका तासात पार करू शकतात. पाकिस्तान, तुर्कस्तानसह अन्य काही देशांनी विरोध केल्यानंतर भारताला अलिकडेच आपला देशाबाहेरचा जगातला एकमेव असा ताजिकिस्तानमधील आयनी एअरबेस सोडावा लागला. ताजिकिस्तानमधील हवाई तळ भारतासाठी महत्त्वाचा होता; परंतु तो गमवावा लागल्यानंतर भारताला दुसऱ्या हवाई तळाची गरज आहे. असे असले, तरी भारत कोणावर दबाव आणून पदरात काही पाडून घेईल, असे नाही. दोन्ही राष्ट्रांना तशी गरज वाटली आणि त्यात दोघांचा फायदा आहे, याची खात्री पटली, तरच बगराम एअरबेसबाबत निर्णय होईल. बगराम एअरबेस भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने मध्य आशियातील आपला ताबा कायम ठेवला पाहिजे. मुख्यतः इराणच्या चाबहार बंदरात भारताने पन्नास अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. व्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमध्ये अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानच्या कोणत्याही नापाक कृतींना त्वरित प्रत्युत्तर देण्यात भारताला या तळाची मदत होणार आहे. तथापि, पाकिस्तानला नेहमीच भीती राहील की अफगाणिस्तानच्या माध्यमातून भारताकडून धोका होऊ शकतो. भारताने बगराम एअरबेस ताब्यात मिळण्यासाठी व्यूहात्मक पावले टाकताना मित्रराष्ट्र दुखावणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे.

येथे नमूद करण्याजोगी बाब म्हणजे बगराम एअरबेस दुसऱ्या देशाच्या ताब्यात जाता कामा नये. तसा तो गेला, तर भारतासाठी आणि संपूर्ण प्रदेशासाठी डोकेदुखी ठरेल. अफगाणिस्तानमधील पुनर्बांधणीच्या प्रयत्नांमध्ये भारत सहभागी आहे, म्हणून सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे बगराम ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भारताने हा हवाई तळ तालिबानकडून मिळवावा. भारताचे अफगाण तालिबानशी उत्तम संबंध आहेत. अलिकडेच अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी भारताला भेट दिली आणि तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंधांना एक नवी झळाळी मिळाली आहे. अफगाणिस्तानने अलिकडेच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अफगाणिस्तानमधील तालिबान राजवट लवकरच भारतात एका राजदूताची नियुक्ती करणार आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी दृढ होतील, असे मानले जाते. गेल्या महिन्यात अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आठ दिवस भारतात होते, तेव्हा पाकिस्तानने अफगाणिस्तानचे निर्णय दिल्लीतून होतात, अशी टीका केली होती. याचा अर्थ अफगाणिस्तान भारत सरकारच्या सांगण्यानुसार कारभार करते आहे, असा होतो. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध सुधारत असताना तालिबान आणि भारतात कटुता निर्माण व्हावी, असा काहींचा प्रयत्न आहे.

गेल्या काही दिवसांपासून 'सोशल मीडिया' आणि काही आंतरराष्ट्रीय पोर्टलवर अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस भारताला सोपवल्याच्या बातम्या वेगाने पसरत होत्या. या बातमीने दक्षिण आशियातील राजकीय घडामोडींबद्दलच्या अटकळींना उधाण आले होते; पण आता अफगाण तालिबान प्रशासनाने या सर्व अटकळींना पूर्णविराम दिला आहे. अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस हा देशातील सर्वांत मोठा आणि सर्वांत आधुनिक लष्करी हवाईतळ आहे. राजधानी काबुलच्या उत्तरेला सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेले हे शहर १९८० च्या दशकापासून अफगाण लष्करी कारवायांचे केंद्र आहे. ते मूळतः सोव्हिएत सैन्याने विकसित केले होते आणि नंतर २००१ मध्ये अमेरिकेने त्याचे नियंत्रण आपल्याकडे घेतले आणि ते आधुनिक हवाई तळात रूपांतरित केले. अमेरिकन सैन्याने सुमारे वीस वर्षे एक प्रमुख तळ म्हणून बगराम आपल्याकडे ठेवले. ते केवळ अफगाणिस्तानच नव्हे, तर पाकिस्तानच्या सीमेवरही लक्ष ठेवत होते. बगराम हा अमेरिकेचा सर्वांत मोठा हवाई तळ होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडील ब्रिटन भेटीदरम्यान सांगितले होते की, बगराम जगातील सर्वांत मोठ्या हवाई तळांपैकी एक आहे आणि आम्ही ते परत दिले. आता आम्हाला हा तळ परत मिळवायचा आहे. कारण चीन जिथे आपली अण्वस्त्रे बनवतो, तिथून ते फक्त एक तासाच्या अंतरावर आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर वाद निर्माण झाला. परिणामी बगराम आशियाच्याच नव्हे, तर अवघ्या जगाच्या नजरेमध्ये आला.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# आम्ही अस्तित्वही गहाण ठेवले

पाश्चिमात्य संस्कृतीच्या नादी लागून आम्ही आमची संस्कृती व परंपरांना तिलांजली दिली. पाश्चिमात्य भोगवादी संस्कृतीचे चटके आता समाजाला बसू लागले आहेत. त्यामध्ये कधी आम्ही स्वतः अडकलो, तर कधी पद्धतशीरपणे त्यांनी आमच्या डोक्याचा वापर करून घेतला. पाश्चिमात्य शक्तीने आमच्या परिवाराला तोडले आणि आम्ही आधुनिक बनण्याच्या नादामध्ये आमचे अस्तित्व त्यांच्याकडे गहाण ठेवले. या शक्तीने भारतामधील एकत्र कुटुंब पद्धतीवर घाला घालून त्यांनी भारताला बाजाराचे रूप दिले आहे. त्यांना आमच्या संस्कार, परंपरा आणि चालीरीतींशी काहीएक देणे घेणे नाही. त्यांचे दैवत म्हणजे निव्वळ पैसा. एकत्र परिवार तुटला की, बाजार फुलतो. हे त्यांच्या हिताचे असते. विदेशी कंपनीच्या मायाजालामध्ये आम्ही अलगद अडकलो. परिवाराचे विभाजन झाले की, वस्तूंची विक्री वाढते एवढे साधे त्यांचे गणित. कुटुंबाची संख्या वाढली की, बाजारामध्ये रेलचेल सहज वाढते आणि वस्तूंची विक्री सहज करता येते. त्यामुळे विदेशी कंपन्यांनी नेमका भारतीय संस्कृतीच्या मुळावर घाव घालून भारतीय कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. आजमितीस बहुतांश कुटुंबाचा आकार कमी होत गेला आहे. तीन चार पिढ्यांची एकत्र कुटुंबे आता दुर्मिळ होताना दिसत आहेत. शहरी भागामध्ये तर आता 'हम दो हमारे दो'ने 'हमारा एक'ची जागा घेतली आहे. हे अतिशय घातक विष पेरले जात आहे.

पूर्वी सिनेमा आणि नंतर दूरदर्शनने पद्धतशीरपणे या मोहिमेस हातभार लावला. नैतिकतेचे सर्व मापदंड बाजूला ठेवून या मालिका प्रत्येकाच्या डोक्याचा ताबा घेऊ लागल्या. सासू आणि सुनेचे भांडण दाखविणाऱ्या मालिकेने अक्षरशः धमाकूळ घालून आपल्या संस्कृतीवर घाला घातला. अशा मालिका आई-वडिलांसह मुलं बघत असतील तर त्या कोवळ्या मनावर काय परिणाम होतील याचा पालकांनी कधीच विचार केला नाही. मुलगा आणि सुनेला आपले सासू-सासरे नकोसे झालेत. नातू आणि पणतू निराश्रित झालेत. महागड्या शाळांमध्ये नाव टाकले की, पाल्यांची जबाबदारी संपली ही प्रथा आता रूढ झाली आहे. मुलांना सर्व प्रकारच्या सुखसोई दिल्या की, आपण मोकळे ही विदेशी भावना दिवसेंदिवस रुजताना दिसून येत आहे. आपल्या आई-वडिलांशी सहज संवाद व्हावा, आपल्या भावनांना त्यांनीही महत्त्व द्यावे, अशी त्यांची या वयामध्ये अपेक्षा असते. नेमकी येथेच आजी-आजोबांची गरज असते. परंतु, बदलत्या सामाजिक रचनेमुळे पूर्वीच्या संकल्पना आता धुळीस मिळू लागल्या आहेत. त्यामुळे संवाद कमी झाला अन् अनिर्बंधता वाढीस लागली. या अनिर्बंधेतला आज आवर घातला नाही तर भविष्यही आम्हाला कधीच माफ करणार नाही. भारतीय संस्कृतीचा आधारच कुटुंब राहिला आहे. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे प्रमुख केंद्र आहे. कुटुंब प्रत्येकाच्या आयुष्याला आकार देऊन समाजाला जोडते. राष्ट्र निर्माणाच्या कार्यामध्येही कुटुंबाचे एक आगळेवेगळे महत्त्व आहे. पिढ्यान्‌पिढ्या संस्काराचे संक्रमण करणारी कुटुंब नावाची ही संस्था आम्हीच मोडकळीस काढली आणि आधुनिकतेची कुऱ्हाड पायावर मारून घेतली. भौतिक सुखाच्या नादामध्ये आम्ही आमची भावी पिढी नैराश्याच्या गर्द काळोखामध्ये लोटली. त्यामुळे ती वेगवेगळ्या गॅझेट्समध्ये भविष्य शोधू लागली. आधुनिकता ही जरी काळाची गरज असली तरी ती कितपत आत्मसात करावी, यालाही काही मर्यादा असायला हव्यात. त्यासाठीब आपले परंपरागत संस्कार आणि परंपरांना तिलांजली देऊन वाटचाल करणे म्हणजे एक प्रकारे आत्मघात करणेच ठरेल. कुटुंब हे संस्काराची शाळा व घरातील प्रत्येकाला आकार देणारी संस्था आहे. कुटुंब ज्याप्रमाणे घरामधील प्रत्येक व्यक्तीचा आधार असते, त्याचप्रमाणे ते समाजाच्याही आधाराचं आणि आदराचं स्थान असते. 'हे विश्वची माझे घर' अशा संस्कृतीमध्ये आम्ही जन्म घेतला असला तरी आम्हीच आमच्या घराचे चार तुकडे करण्यात अग्रेसर आहोत. परंपरांना अव्हेरून असेच आम्ही मार्गक्रमण करीत राहलो तर येणारे भविष्य आम्हाला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# आठव्या वेतन आयोगाच्या निमित्ताने...

केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी, आठव्या वेतन आयोगांतर्गत त्रिस्तरीय समितीची घोषणा केली व अपेक्षेनुरूप त्यावर विविध प्रकारच्या प्रतिक्रियाही आल्या. यामध्ये निवडणुकीच्या राजकरणापासून, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना वाढीव पगाराची खरंच गरज आहे का? यांसारखे प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्याचबरोबर खाजगी-सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यांच्या कामातील जोखीम, कायमस्वरूपी नोकरीची शाश्वती, वेतनाव्यतिरिक्त मिळणारे विविध फायदे या साऱ्यांची तुलनात्मक चर्चा होणे अपरिहार्यच होते. यातूनच केंद्र सरकारने घोषित केलेल्या प्रस्तावित वेतन आयोगाच्या प्रस्तावावरही, स्वाभाविकपणेच साधकबाधक चर्चा सुरू झाली आहे.

वेतन-व्यवस्थापन क्षेत्रातील अभ्यासकांच्या मतानुसार, सद्यःस्थितीत खाजगी क्षेत्रातील सर्वोच्च वा संचालकसदृश पदांवरील व्यक्ती व कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांसारख्या मोठ्या व जबाबदारीच्या वरिष्ठ पदांवरील व्यक्तींना आणि शासकीय अधिकाऱ्यांना मिळणारे वेतन व मिळणारे फायदे यांमध्ये फारशी तफावत आढळणार नाही. तरीही खाजगी कंपन्यांमधील अधिकारी व त्यांच्यासारखे पद व जबाबदारीचे काम करणाऱ्यांच्या मिळकतीमध्ये मात्र सहजच मोठी तफावत आढळून येते. मुख्य म्हणजे, वर्षानुवर्षे असणारी ही वेतनविषयक तफावत, गेली काही वर्षे झपाट्याने वाढती आहे.

पगारदारांच्या वेतनमानाच्या संदर्भातील सध्याची सत्यस्थिती म्हणजे, आज सर्वसाधारण पात्रताधारक कर्मचाऱ्यांना सरकारी नोकरीत मिळणारे पगार हे सर्वांत मोठे आकर्षण ठरताना दिसते. त्यात जर अशी नोकरी ही कार्यालयीन कामकाजाशी संबंधित असेल, तर पाच दिवसांचा आठवडा स्वरूपातील या नोकरीसाठी विशेषतः सहायक वा कर्मचारी म्हणून, अशी नोकरी व त्यातील मर्यादित जोखीम-जबाबदारीसह मिळणारा पगार हे अशा बहुसंख्य कर्मचाऱ्यांसाठी जीवनाचे इतिकर्तव्यच ठरते. सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रस्थापित व वार्षिक एकत्रित पगार व इतर सोयी-फायदे यांचा विचार करून, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उदाहरण विचारात घेता येण्यासारखे आहे. सरकारी क्षेत्रातील बँक असणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांना बँकेतर्फे मिळणारे वेतन व त्याशिवाय प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात मिळणारे फायदे व सवलती लक्षात घेता, त्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक एकत्रित वेतन व फायदे मिळून त्यांना दरवर्षी सुमारे सरासरी २६ लाख रुपये मिळतात. त्याचवेळी खाजगी क्षेत्रातील आयसीआयसीआय वा एचडीएफसी बँक येथील त्याच स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे वार्षिक एकत्रित वेतन व सर्व फायदे मिळून मिळणारी राशी, स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या तुलनेत निम्मी आहे. हीच बाब कॉर्पोरेट वा खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या आणि समान शैक्षणिक पात्रता, पद आणि जोखीम असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातपण लागू होते.



वर नमूद केल्याप्रमाणे केवळ नमुनेदाखल स्वरूपात कर्मचारी स्तरावरील व तुलनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा आकडेवारीचा परिणाम, व्यक्तिगत स्वरूपात कर्मचाऱ्यांपासून कंपनी-व्यवस्थापन स्तरापर्यंत नेहमीच होतात. यातून विशेषतः कर्मचारी-कामगारांच्या मानसिकतेवर व त्यातून त्यांचे कामकाज आणि कार्यक्षमतेवरही परिणाम दिसून येतो. यासंदर्भात उल्लेखनीय व नेहमीच चर्चेत राहणारा मुद्दा म्हणजे, परंपरागतरीत्या केंद्र सरकारच्या संपूर्ण अखत्यारीत असणाऱ्या टपाल खात्यांतर्गत ग्रामीण स्तरापर्यंत टपाल-बँकिंग विभागाचे काम करणारे कर्मचारी समान स्वरूपाचे काम करत असूनही, त्यांना भिन्न वेतनेश्रेणी व फायदे का नाहीत?

या आणि अशाप्रकारे कामकाज, कामाची जबाबदारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यामधील वाढ हे मुद्दे नेहमीच चर्चेत येतात. मात्र, त्यावर गांभीर्याने विचार होऊन तोडगा काढण्याचे मात्र फारसे प्रयत्न होत नाहीत. सातव्या वेतन आयोगाची घोषणा, स्थापना, आयोगाचा अहवाल आणि त्याची अंमलबजावणी या विविध टप्प्यांवर हे मुद्दे चर्चिले गेल्याचे जाणकारांच्या स्मरणात असेलच. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, थेट केंद्र सरकारच्या सेवेत व रेल्वे-टपाल यांसारख्या मोठी कर्मचारी संख्या असणाऱ्या खात्यांना वगळून २०१४च्या कर्मचारी गणनेनुसार, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे १८ लाख होती. सातव्या वेतन आयोगाच्या वेळी तुलनात्मकदृष्ट्या असे नमूद केले होते की, त्यावेळी अमेरिकेतील सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या २१ लाख होती. आज हीच तुलना करताना लक्षात येते की, सद्यःस्थितीत भारतात एक लाख लोकसंख्येसाठी १३९ केंद्र सरकारी कर्मचारी आहेत, तर अमेरिकेत तुलनात्मकदृष्ट्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ६६८ आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि विदेश सेवा विभागात आहे. तर त्याचवेळी विविध दूतावासांमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या, जेमतेम एक हजाराच्या घरात होती; तर भारताशी तुलनात्मक महाशक्तीसदृश अशा चीन, अमेरिका व युरोपीय देशांच्या विदेश सेवा विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कैकपटींनी अधिक आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा पगार, पगारवाढ व त्यांना मिळणारे फायदे यांचा विचार करताना, देशातील केंद्र सरकारच्याच अखत्यारीत असणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन उद्योग व आर्थिक-सार्वजनिक सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतनमान व फायदे यांची तुलना होणेही अपरिहार्य आहे. या मुद्यावर देश-विदेश पातळीवरील शिक्षकांचे वेतन-फायदे व इतर सेवाशर्ती इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास संशोधन स्वरूपात कोलंबिया विद्यापीठाचे कार्तिक मुरलीधरन् यांनी केला आहे. या अभ्यासातून लक्षात आलेली प्रमुख व महत्त्वाची बाब म्हणजे, सरकारी अनुदान व समर्थनाच्या आधारे काही संख्यांमध्ये शिक्षक-अध्यापकांचे पगार दुपटीने वाढवूनही त्यांच्या शैक्षणिक संस्थेचे काम, कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत फारसा बदल झालेला नाही. या साऱ्या आर्थिक-व्यावहारिक पृष्ठभूमी, उपलब्ध संशोधन आणि अनुभवाला यावेळी जोड मिळाली आहे, ती भारताच्या सद्यःस्थितीतील आर्थिक प्रगतीची. त्यामुळे आर्थिक प्रगतीमध्ये आणखी वाढ साधण्यासाठी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीशी त्याची सांगड कशी घालता येईल, हा यावेळी कळीचा मुद्दा ठरला नाही, तरच नवल!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-३९

मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५

### तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली।
उठा या हिंदुबंधूंनो स्वदेशाच्या ध्वजाखाली ॥धृ.॥

अभागी पारतंत्र्याची निशा संपे निराशेची।
झळाळे प्राचिदिक्प्रांती प्रभा स्वातंत्र्यसूर्याची ॥१॥

दऱ्या खोऱ्यांतुनी साऱ्या, पुकारा घालुनी साद्।
स्वराज्याचा महामंत्र घुमू दे अंबरी नाद ॥२॥

हराया दैन्य देशाचे करू या प्रबळ संघटना।
नव्या मन्वन्तराची ही असे संजीवनी जाणा ॥३॥

युगी या संघशक्तीच्या स्वदेशा उद्धरायाला।
नसे एकीविणा जाणा दुजा सन्मार्ग राष्ट्राला ॥४॥

प्रभावी संघशाखांनी बलाने घालवू दैन्य।
उठू द्या हिंदुजातीचे पुन्हा ते सुप्त चैतन्य ॥५॥

घडाया भारतामाजी पुन्हा सामर्थ्य हिंदूंचे।
विणा चोहिकडे जाळे प्रभावी संघशाखांचे ॥६॥

## वाचक पत्रे

### दिवाळीव्यतिरिक्त फटाके फोडण्यावर बंदी हवी

आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके फोडले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके फोडले जातात. मग तो सण, उत्सव असो की आनंदाचा प्रसंग. फटाके फोडूनच सण, उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतके फटाके फोडले जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके फोडले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके फोडतात. वाढदिवस साजरा करताना फटाके फोडण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आवाहन करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके फोडूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**श्याम ठाणेदार**

●● ●●

### भाजपाने सावध असावे

विद्यमान महाराष्ट्र सरकार भाजप नेतृत्वाखाली सोबत घेतलेल्या सवगंड्यांसोबत सत्तेवर आल्यापासून राजकीय आघाड्यांवर सतत काही ना काही घटना घडताना दिसतात. राजकारणात सत्तेसाठी समविचारी नसलेल्या पक्षांशीही काही तडजोड करावी लागणे यात काहीही गैर नाही. तरीही सध्या सोबत घेतलेल्या दोन पक्षांतील काही नेत्यांची बेताल वक्तव्ये, आर्थिक व्यवहारांतील भानगडी जनतेसमोर येतच आहेत. नुकतेच पार्थ पवार यांचे जमीन व्यवहार प्रकरण समोर आल्यानंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. राजकीय आघाडी सांभाळण्यास मुख्यमंत्री सक्षम असले तरीही जनमानसात भाजपावरही त्याचे शिंतोडे निश्चितच उडतात. त्यामुळे भाजप समर्थक सामान्य नागरिकांना अशा राजकीय युतीने काय साध्य झाले हा प्रश्न पडतोच. त्यामुळे भाजपने सावध असावे आणि पक्षाच्या प्रतिमेस जपावे ही सामान्यांची इच्छा असेल.

**राम राजे**

●● ●●

### सर्व प्रकारचे खेळ व खेळाडूंकडे लक्ष द्यावे

शहरात व ग्रामीण भागात अनेक मैदानी खेळ शालेय जीवनापासून शिकवले जातात. परंतु आज क्रिकेट या खेळावर जितका पैसा खर्च केला जातो तेवढा खर्च इतर खेळांवर व स्पर्धांवर करताना कुठेही दिसत नाही.

त्यामुळे इतर मैदानी खेळ शालेय जीवनातून बाद होणार तर नाही ना अशी मनात शंका येते. तेव्हा क्रिकेटप्रमाणे इतर खेळ, खेळाडू व त्यांच्या बक्षिसाच्या रकमेत वाढ होणे आवश्यक आहे. तेव्हा याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

**मुकुंद काकीरवार**

## महत्त्वाचे

### न्यूझीलंड-वेस्ट इंडीज चौथा टी-२० सामना पावसामुळे रद्द

**नेल्सन :** सोमवारी पावसाच्या व्यत्ययामुळे न्यूझीलंड आणि वेस्ट इंडीजदरम्यानचा चौथा टी-२० क्रिकेट सामना रद्द करण्यात आला, त्यामुळे यजमान संघाला मालिकेत २-१ अशी आघाडी मिळाली आणि एक सामना शिल्लक राहिला. वेस्ट इंडीजने पहिला सामना सात धावांनी, तर न्यूझीलंडने दुसरा सामना तीन धावांनी व तिसरा सामना रविवारी नऊ धावांनी जिंकला. न्यूझीलंडने सोमवारी सॅक्सटन ओव्हल येथे नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. वेस्ट इंडीजने १ बाद ३८ काढल्या असताना पावसाने हजेरी लावली. त्यामुळे खेळ थांबविण्यात आला. तेव्हा केवळ ६.३ षटके टाकण्यात आली होती. मालिकेचा शेवटचा टी-२० सामना गुरुवारी ड्युनेडिन येथील युनिव्हर्सिटी ओव्हल येथे खेळवला जाईल.

### मुंबईचा हिमाचल प्रदेशवर एक डाव व १२० धावांनी विजय

**मुंबई :** डावखुरा फिरकी गोलंदाज शम्स मुलानीने टिपलेल्या पाच बळींच्या बळावर मुंबईने सोमवारी येथे झालेल्या रणजी करंडक क्रिकेट एलिट गट ड मधील सामन्यात हिमाचल प्रदेशवर एक डाव आणि १२० धावांनीविजय मिळवला. पहिल्या डावात ४४६ धावांची भर घालल्यानंतर, मुंबईने धुळीने भरलेल्या बीकेसीच्या खेळपट्टीवर इतक्या दिवसांत दोनदा हिमाचल प्रदेशच्या कमकुवत फलंदाजीतून विजय मिळवला आणि हंगामातील आपला दुसरा विजय नोंदवला. तिसऱ्या दिवशी शांत विकेटवर पहिल्या डावात खराब कामगिरी करताना १८७ धावांवर आटोपलेल्या हिमाचलने दुसऱ्या डावात कोणतीही लक्षणीय सुधारणा दाखवली नाही आणि १३९ धावा केल्या. केवळ पुखराज मानने (१०९ चेंडूत ६५, ९ चौकार) थोडाफार प्रतिकार केला.

### डोपिंग चाचणीचे पालन करणे आवश्यक

**नवी दिल्ली :** ट्रॅक अँड फील्डच्या अँटी-डोपिंग वॉचडॉग ॲथ्लेटिक्स इंटिग्रिटी युनिटने (एआययू) सोमवारी भारतीय लांब पल्ल्याच्या धावपटू वर्षा टेकाम हिच्या तीन वर्षांच्या डोपिंग बंदी प्रकरणाचा आढावा घेतला आणि एकदा एखाद्या खेळाडूला डोपिंग चाचणीसाठी सूचित केले, तेव्हा त्याने किंवा तिने त्याचे पालन करणे आवश्यक आहे हा मुद्दा स्पष्ट केला. ५ जून रोजी, गत वर्षी पुणे अर्ध मॅराथॉनमध्ये दुसरे स्थान पटकावणाऱ्या वर्षा हिला एआययूने डोप चाचणी चुकवल्याबद्दल तीन वर्षांचे निलंबन सुनावले होते. २६ मे रोजी तिला तात्पुरते निलंबित करण्यात आले होते. गत वर्षी १५ डिसेंबर रोजी झालेल्या अर्ध मॅराथॉनमध्ये तिसरे स्थान पटकावल्यानंतर वर्षा हिला स्पर्धेत चाचणीसाठी संपर्क साधण्यात आला होता, पण ती गायब झाली आणि परत आली नाही, असे एआययूने म्हटले आहे.

### अजिंक्य नाईक यांचे एमसीए अध्यक्षपद कायम

**मुंबई :** निवडणूक रिंगणात असलेल्या इतर सात उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यानंतर अजिंक्य नाईक यांनी सोमवारी मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्षपद कायम ठेवले. गत वर्षी नाईक वयाच्या ३७ व्या वर्षी संजय नाईक यांना १०७ मतांनी हरवून एमसीएचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. कार्यकारिणी मंडळातील इतर पदांसाठी एमसीएच्या निवडणुका बुधवारी होणार आहेत. नामांकन मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. बीसीसीआय आणि त्याच्या सदस्य संघटनांसाठी सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या लोढा समितीने आणलेल्या सुधारणांनुसार एमसीए एपेक्स कौन्सिलमध्ये सलग सहा वर्षे पूर्ण केल्यानंतर नाईक यांनी तीन वर्षांचा अनिवार्य कूल-ऑफ कालावधी पूर्ण केला असला तरी त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये भाजपाचे आमदार प्रसाद लाड, शिवसेना (उबाठा), आमदार मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचा समावेश होता. आव्हाड आणि नार्वेकर दोघेही एमसीएच्या माघारी जाणाऱ्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य होते आणि त्यांनी इतर पदांसाठीही अर्ज दाखल केले आहेत.

# ध्रुव शोरी, अमन मोखाडेचे शतक

### रणजी करंडक क्रिकेट
### विदर्भाचे ओडिशासमोर ३४५ धावांचे आव्हान

◆ **नागपूर, १० नोव्हेंबर**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत व्हीसीए जामठा स्टेडियमवर सुरु असलेल्या एलिट अ गटाच्या ओडिशाविरुद्धच्या साखळी सामन्यात तिसऱ्या दिवशी अमन मोखाडे व ध्रुव शोरीच्या दमदार शतकांच्या बळावर विदर्भाने ५९ षटकांत २ बाद २१८ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला आणि ओडिशासमोर विजयासाठी ३४५ धावांचे लक्ष्य ठेवले. दिवस अखेर ओडिशाने दुसऱ्या डावात १२ षटकांत बिनबाद ४४ धावा केल्या. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून विजयासाठी ओडिशाला आणखी ३०१ धावा काढण्याची गरज आहे, तर विदर्भाला लक्ष्य गाठण्याआधी ओडिशाच्या संपूर्ण संघाला बाद करणे आवश्यक आहे.


शतकवीर अमन मोखाडे


शतकवीर ध्रुव शोरीचे दुसरे शतक

विदर्भाने पहिल्या डावात २८६ धावा नोंदविल्यानंतर ओडिशाला १६० धावांत गुंडाळून १२६ धावांची आघाडी मिळविली. आज ५९ षटकांत २ बाद २१८ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला.

ओडिशाने ६ बाद १२२ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली आणि त्यांचा पहिला डाव ७३.३ षटकांत १६० धावांतच आटोपला. विदर्भाकडून गौरव फार्डेने २८ धावांत ४ बळी, तर पार्थ रेखडेने ३१ धावांत ३ बळी टिपले. नचिकेत भुते, प्रफुल्ल हिंगे व यश कदमने प्रत्येकी एक ब ळी टिपला. विदर्भाच्या दुसऱ्या डावाच्या प्रारंभी पहिला धक्का ब सला. सलामीवीर अथर्व तायडेला (१२) बादल बिस्वालने पायचित केले. परंतु त्यानंतर अमन मोखाडे व ध्रुव शोरीने शतकी खेळी करत विदर्भाची स्थिती बळकट केली. मोखाडे व ध्रुवने दुसऱ्या गड्यासाठी १९९ धावांची भागीदारी केली. बादल बिस्वालच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी ध्रुव शोरीने १६१ चेंडूंत ८ चौकारांसह १०१ धावांची आकर्षक शतकी खेळी केली. ध्रुवचे हे सामन्यातील दुसरे शतक ठरले असून त्याने पहिल्या डावातही १४४ धावांची शतकी खेळी केली होती. पुढे अमन मोखाडे व नचिकेत भुतेने नाबाद खेळी करत विदर्भाला ५९ षटकांत २ बाद २१८ धावा उभारून दिल्या, त्याचवेळी विदर्भाने आपला दुसरा डाव घोषित केला. मोखाडेने १५२ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने नाबाद १०१ धावांची खेळी केली. नचिकेत शून्यावर नाबाद राहिला.

विजयासाठी ३४५ धावांचा पाठलाग करताना ओडिशाच्या स्वस्तिक सामल (नाबाद २५) व गौरव चौधरीने (नाबाद १७) दिवस अखेर आपल्या संघाला बिनबाद ४४ धावा काढून दिल्या.

# बावुमा दक्षिण आफ्रिका संघात दाखल

◆ **कोलकाता, १० नोव्हेंबर**

बंगळुरू येथे अ संघाच्या अनधिकृत कसोटी मालिकेचा भाग असलेला दक्षिण आफ्रिका संघाचा कर्णधार टेम्बा बावुमा सोमवारी सकाळी आपल्या वरिष्ठ संघात दाखल होणारा शेवटचा खेळाडू ठरला. शुक्रवारी ईडन गार्डन्सवर सुरू होणाऱ्या भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पाहुणा संघ पूर्ण ताकदीने जमला.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाची पहिली तुकडी, ज्यामध्ये मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड, कॅगिसो रबाडा आणि मार्को जॅन्सेन हे वेगवान गोलंदाज आणि पाकिस्तानमधील मालिकेत सहभागी झालेले खेळाडू रविवारी सकाळी पोहोचले होते.

बावुमा, आणखी एक खेळाडू आणि काही अधिकाऱ्यांसह, सोमवारी सकाळी बंगळुरूहून पोहोचले. मुख्य प्रशिक्षकासह बहुतेक संघ रविवारीच दाखल झाला होता, असे दक्षिण आफ्रिका संघाच्या स्थानिक व्यवस्थापकाने वृत्तसंस्थेला सांगितले.

भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना, दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा कोलकात्यात पोहोचला आणि तो दक्षिण आफ्रिकेच्या संघातील इतर खेळाडूंसोबत सामील झाला.


कोलकात्यात दाखल होताना दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा

कसोटी मालिकेची सुरुवात शुक्रवार, १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे सुरू होणाऱ्या कसोटी सामन्यांनी होईल.

मालिकेतील दुसरा कसोटी सामना शनिवार, २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. कसोटी मालिकेच्या समाप्तीनंतर, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळले जातील.

# कनिष्ठ महिला हॉकी विश्वचषकात ज्योती सिंग करणार भारतीय संघाचे नेतृत्व

◆ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

आगामी २५ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर दरम्यान चिलीतील सॅण्टियागो येथे होणाऱ्या आगामी एफआयएच कनिष्ठ महिला हॉकी विश्वचषकासाठी हॉकी इंडियाने २० सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. या संघाचे नेतृत्व ज्योती सिंग करणार आहे.


विश्वचषकासाठी भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ सज्ज

भारताचे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू तुषार खांडकर यांच्या मार्गदर्शनाखालील तयार झालेल्या २० सदस्यीय संघात १८ खेळाडू व २ पर्यायी खेळाडू आहेत.

मी संघ आणि सध्या ते ज्या पद्धतीने खेळत आहेत त्यावर खूप खूश आहे. माझे मुख्य तत्व शिस्त आहे व हा संघ तयार करताना मी तेच केंद्रस्थानी ठेवले आहे, असे मुख्य प्रशिक्षक खांडकर यांनी म्हटले आहे. आम्ही कठोर प्रशिक्षण टप्प्यातून गेलो आहोत आणि आमच्या बचावात्मक रचनेवर आणि प्रतिस्पर्ध्याच्या स्कोअरिंग क्षेत्रात अंतिम फेरीत कठोर परिश्रम केले आहेत.


कर्णधार ज्योती सिंग

भारताला क गटात स्थान देण्यात आले असून भारतीय संघाची मोहीम १ डिसेंबर रोजी नामिबियाविरुद्ध सुरू होईल, त्यानंतर ३ डिसेंबर रोजी जर्मनीविरुद्ध आणि ५ डिसेंबर रोजी आयर्लंडविरुद्ध सामने होतील. प्रत्येक गटातील अव्वल संघ बाद फेरीत प्रवेश करतील, बाद फेरी ७ ते १३ डिसेंबर दरम्यान खेळवले जातील.

गोलरक्षणाची जबाबदारी निधी, एंजिल हर्षा राणी मिंझ यांच्यात विभागली जाईल, तर बचावाची जबाबदारी मनीषा, लालथनलुआलंगी, साक्षी शुक्ला, पूजा साहू आणि नंदिनी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. मध्य फळीमध्ये भारत साक्षी राणा, इशिका, सुनीलिता टोप्पो, कर्णधार ज्योती सिंग, खैदेम शिलेमा चानू आणि बिनिमा धन यांच्यावर अवलंबून असेल. आक्रमक फळीमध्ये सोनम, पूर्णिमा यादव, कनिका सिवाच, हिना बानो आणि सुखवीर कौर यांचा समावेश आहे. स्पर्धेसाठी प्रियंका यादव आणि पार्वती टोप्नो यांना पर्यायी खेळाडू म्हणून निवडण्यात आले आहे. आम्ही सर्वजण चिलीला जाण्यासाठी तयार आहोत आणि खूप उत्सुक आहोत. विश्वचषकात सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी मुली पूर्णपणे प्रेरित आहेत, असे खांडकर म्हणाले.

### महिला संघाला मिळणार विदेशी स्ट्रेंथ-कंडिशनिंग प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** महिला एकदिवसीय विश्वचषकातील ऐतिहासिक विजयानंतर, भारतीय संघाच्या प्रशिक्षक चमूमध्ये पहिल्यांदाच परदेशी स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक असण्याची शक्यता आहे. या वर्षी एप्रिलमध्ये, बीसीसीआयने मुख्य फिजिओथेरपिस्ट आणि स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षकासाठी अर्ज मागवले होते.

# लक्ष्य, प्रणॉयकडून जेतेपदाची अपेक्षा

### जपान ओपन बॅडमिंटन

◆ **कुमामोटो, १० नोव्हेंबर**

मंगळवारपासून येथे ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या कुमामोटो मास्टर्स जपान सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. भारतीय खेळाडू लक्ष्य सेन आणि एच. एस. प्रणॉयकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा आहे, तर उदयोन्मुख खेळाडू आपल्या कामगिरीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करतील.

हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेतेपद मिळवून व त्यानंतर डेन्मार्क आणि हायलो ओपनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवून आपला प्रभाव पुन्हा मिळविणारा लक्ष्य त्या गतीचा फायदा घेण्यास उत्सुक असेल.

सातव्या मानांकित, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या अल्मोराच्या २४ वर्षीय लक्ष्य सेनला सुरुवातीच्या फेरीत जपानच्या जागतिक क्रमवारीत २५ व्या क्रमांकावर असलेल्या कोकी वतानाबेशी सामना करावा लागेल.


लक्ष्य सेन


एच. एस. प्रणॉय

२०२३ च्या जागतिक कांस्यपदक विजेता प्रणॉयला ऑलिम्पिकपूर्वी चिकनगुनिया झाला होता. त्यामुळे पॅरिससाठी त्याच्या तयारीत अडथळा निर्माण झाला होता व संघर्ष करत आहे. पॅरिसमध्ये तो वेदना सहन करून खेळला पण लवकर बाहेर पडला. केरळचा ३३ वर्षीय प्रणॉय याने २०२३ मध्ये मलेशिया मास्टर्स जेतेपद व ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये उपविजेतेपद मिळविले होते.

अमेरिकन ओपन विजेता आयुष शेट्टीने हायलो ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लोह कीन यूला पराभूत केले होते. आता या स्पर्धेत त्याचा पहिल्या फेरीचा सामना थायलंडच्या कुनलावुत विटिडसारनशी होईल.

मकाऊ ओपन सुपर ३०० मधील उपांत्य फेरीत पोहोचलेला थरुन मन्नेपल्ली कोरियाच्या जिओन ह्योक जिनशी लढेल, तर हायलो ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचताना फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हला हरवणारा किरण जॉर्ज पात्रता फेरीत दाखल होईल. मिश्र दुहेरीत, रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे हे प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई या अमेरिकन जोडीशी लढतील.

# भारत जपानसह कठीण गटात

### एएफसी २० वर्षांखालील महिला आशिया चषक फुटबॉलचा ड्रॉ जाहीर

◆ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

पुढील वर्षी थायलंडमध्ये होणाऱ्या एएफसी २० वर्षांखालील महिला आशियाई चषक फायनल स्पर्धेचा ड्रॉ समारंभ बँकॉकमध्ये पार पडला. भारताचा कठीण गट क मध्ये जपान, ऑस्ट्रेलिया व चीन तैपेईसोबत समावेश करण्यात आला आहे.

हा २० वर्षांनंतर खंडीय २० वर्षांखालील महिला आशिया चषकासाठी पात्र ठरल्यानंतर भारतीय महिला संघ जपानविरुद्ध आपला मोहीम सुरू करतील, त्यानंतर ऑस्ट्रेलिया आणि चीन तैपेई विरुद्ध खेळणार आहे.

२०२४ मध्ये उपविजेता असलेला जपान या स्पर्धेचा विक्रमी सहा वेळा विजेता आहे आणि २०१८ मध्ये फिफा २० वर्षांखालील महिला विश्वचषक विजेता आणि २०२४ मध्ये उपविजेता आहे.

ऑस्ट्रेलियाने २०२४ ची आवृत्ती तिसऱ्या स्थानावर संपवली, तर चीन तैपेई गट टप्प्यात बाहेर पडला. तीन गटांपैकी प्रत्येकी दोन अव्वल संघ, तिसऱ्या स्थानावर असलेल्या दोन सर्वोत्तम संघांसह उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील.

चार उपांत्य फेरीतील संघ पोलंडमध्ये होणाऱ्या २०२६ च्या फिफा २० वर्षांखालील महिला विश्वचषकासाठी पात्र ठरतील. गट अ मध्ये यजमान थायलंडचा चीन, व्हिएतनाम आणि बांगलादेशसोबत समावेश आहे. गट ब मध्ये सध्याचे अंडर२० विश्वविजेते उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, उझबेकिस्तान आणि जॉर्डन यांचा समावेश आहे. ही स्पर्धा तीन ठिकाणी खेळवली जाईल. बँकॉकमधील राजमंगला राष्ट्रीय स्टेडियम, पथुम थानीमधील थम्मासात स्टेडियम आणि पथुम थानी स्टेडियममध्ये सामने खेळविले जातील.

### जम्मू-काश्मीर ऐतिहासिक विजयाच्या उंबरठ्यावर

**नवी दिल्ली :** रणजी करंडक स्पर्धेत जम्मू-काश्मीर संघ दिल्लीवर ऐतिहासिक विजयाच्या उंबरठ्यावर आहे. त्यांना शेवटच्या दिवशी ११४ धावांची आवश्यकता आहे. फिरोजशाह कोटलाच्या कोसळलेल्या खेळपट्टीवर फिरकीपटूंचे वर्चस्व आहे.

# ‘साई‘मध्ये ३२० सहायक प्रशिक्षकांची नियुक्ती होणार

### भरती होणाऱ्यांमध्ये ५० टक्के महिला

◆ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) केंद्रात २५ क्रीडा प्रकारात ३२० सहायक प्रशिक्षकांची नियुक्ती होणार आहे.

ऑलिम्पिक व आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या ‘पदक रणनीती‘ चा भाग म्हणून क्रीडा मंत्रालयाने साई केंद्रांमध्ये २५ क्रीडा प्रकारांमध्ये ३२० सहायक प्रशिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे.

जलचर, सायकलिंग आणि टेनिस सारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या खेळात भारतीय खेळाडूंनी विशेष चांगली कामगिरी केलेली नाही, परंतु त्यांच्यात ‘प्रचंड पदक क्षमता‘ आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी सांगितले.

यामध्ये साई केंद्रांमधील प्रमुख विषयांचा समावेश असेल. निवड प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित व पारदर्शक असेल आणि त्यात केवळ त्यांच्या संबंधित विषयांमध्ये प्रमाणित किंवा परवानाधारकांचा समावेश असेल, असे मांडविया यांनी सांगितले.




आम्ही अशा खेळांना महत्त्व देण्याचा प्रयत्न करत आहोत, जे देशातील एकूण क्रीडा संस्कृती सुधारतील. टेनिस, कायाकिंग आणि कॅनोइंग सारखे खेळ कधीकधी तितके लक्ष वेधून घेऊ शकत नाहीत, परंतु त्यांच्यात प्रचंड क्षमता आहे, असेही ते म्हणाले.

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्याने दिलेल्या वचनानुसार ‘सुरक्षित क्रीडा वातावरण’ निर्माण करण्यासाठी आणि ‘लिंग गुणवत्तेला’ प्रोत्साहन देण्यासाठी भरती होणाऱ्यांमध्ये ५० टक्के महिला असतील.

ही या भरती मोहिमेचा केवळ पहिला टप्पा आहे आणि हा उपक्रम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी ३२० जणांची भरती केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

### भारतीय खेळाडू परिस्थितीनुसार खेळतात : गंभीर

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघ सरासरी आणि स्ट्राईक रेटबद्दल विचार करून खेळत नाही तर दिलेल्या परिस्थितीत खेळाडू काय परिणाम निर्माण करू शकतो यावर लक्ष केंद्रित करतो, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले. ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताने अलिकडेच २-१ ने जिंकलेल्या टी-२० मालिका विजयानंतर ते बोलत होते. सोमवारी बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हिडीओ मुलाखतीत गंभीरने टी-२० मध्ये टीम इंडियाच्या गतिमान आणि लवचिक फलंदाजी क्रमावर आणि खेळाडूंनी स्वीकारलेल्या धाडसी दृष्टिकोनावर भाष्य केले.

# रॉबर्ट लेवांडोव्स्कीची हॅट्ट्रिक

### स्पॅनिश लीग फुटबॉल
### बार्सिलोना आघाडीवीर रिअल माद्रिदच्या समीप

◆ **माद्रिद, १० नोव्हेंबर**

रॉबर्ट लेवांडोव्स्कीने नोंदविलेल्या हॅट्ट्रिकच्या बळावर बार्सिलोनाने स्पॅनिश लीग फुटबॉल स्पर्धेत रियल माद्रिदवर मात केली.

रायो व्हॅलेकानोने माद्रिदला ०-० अशा बरोबरीत रोखल्यानंतर - लिव्हरपूलविरुद्ध चॅम्पियन्स लीगमधील पराभवानंतर रियल माद्रिदचा हा सलग दुसरा पराभव ठरला. लेवांडोव्स्की आणि लॅमिन यामालने बार्सिलोनाला सेल्टा विगोवर ४-२ असा विजय मिळवून दिला. याबरोबरच बार्सिलोना क्लब आघाडीवीर रिअल माद्रिदच्या समीप पोहोचला आहे. बार्सिलोना माद्रिदपेक्षा तीन गुणांनी मागे आहे.


रॉबर्ट लेवांडोव्स्की

शनिवारी एस्पॅनियोलवर २-० असा विजय मिळवून सलग तिसरा लीग विजय मिळवणारा व्हिलारियल तिसऱ्या स्थानावर राहिला व ते माद्रिदपेक्षा पाच गुणांनी मागे आहे. शनिवारी घरच्या मैदानावर लेवांटेवर ३-१ असा विजय मिळवणारा ॲटलेटिको माद्रिद चौथ्या स्थानावर असून ते आघाडीपासून सहा गुणांनी मागे आहे.

# हॉकी प्रो- लीग हंगाम ९ डिसेंबरपासून

◆ **लॉसाने, १० नोव्हेंबर**

लॉस एंजेलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या पुरुष आणि महिला हॉकी स्पर्धांमध्ये ऑनलाइन स्थान मिळवून एफआयएच प्रो- लीगच्या पुढील आवृत्तीसाठी उलटी गिनती सुरू झाली आहे. या हंगामाची सुरुवात ९ डिसेंबर रोजी आयर्लंड आणि अर्जेंटिना येथे होणाऱ्या सुरुवातीच्या टप्प्यांसह होईल. हॉकी प्रो-लीगमध्ये पुरुष आणि महिला दोन्ही स्पर्धांमध्ये नऊ अव्वल हॉकी देशांचा समावेश आहे, यात १० देशांमधील १३ टप्प्यांमध्ये जगभरातील चाहत्यांना थेट सामना पाहण्याची संधी मिळेल.

२०२५-२६ हंगामाचे विशेष महत्त्व आहे. पहिल्यांदाच हॉकी प्रो-लीगचे पुरुष आणि महिला विजेते २८ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी थेट पात्रता मिळवतील.

प्रत्येक सामना, प्रत्येक गुण आणि प्रत्येक गोल हे खूप महत्त्वाचे असणार आहे, कारण संघ केवळ गौरवासाठीच नव्हे तर आपल्या ऑलिम्पिक स्वप्नांकडे एक पाऊल पुढे टाकण्यासाठी देखील लढतील.

जागतिक दर्जाच्या खेळाडूंचे खरे प्रदर्शन असलेल्या एफआयएच हॉकी प्रो- लीग २०२५-२६ च्या सुरुवातीची आपण मूल्यांकन करत असताना, जागतिक हॉकी समुदायात उत्साह निर्माण होत आहे. यावेळी, दावे पूर्वीपेक्षा जास्त असतील, कारण प्रो लीग आगामी २०२८ ऑलिम्पिकसाठी एक मार्ग बनत आहे, ज्यामध्ये पुरुष आणि महिला विजेते ऑलिम्पिक पात्रता मिळवतील, असे एफआयएच अध्यक्ष अध्यक्ष तय्यब इकराम म्हणाले

एक महिना शिल्लक असताना, लीग ऑफ द बेस्ट ला हॉकीमधील उत्कृष्टतेचे प्रतीक बनवणाऱ्या खेळाडू, संघ आणि चाहत्यांचा आनंद साजरा करण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे ते म्हणाले.

# रिकर्व्ह पुरुष, कम्पाऊंड महिला संघ अंतिम फेरीत दाखल

### आशियाई तिरंदाजी

◆ **ढाका, १० नोव्हेंबर**

भारतीय पुरुष रिकर्व्ह आणि महिला कम्पाऊंड तिरंदाजी संघांनी सोमवारी येथे आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

यशदीप संजय भोगे, अतनु दास आणि राहुलचा समावेश असलेल्या दुसऱ्या मानांकित पुरुष रिकर्व्ह संघाने कझाकिस्तानचा ५-३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दक्षिण कोरियाने उपांत्य फेरीत उझबेकिस्तानचा ६-२ असा पराभव केला.

पुरुष त्रिकुटाने तुर्कमेनिस्तानवर ६-२ असा विजय मिळवून मोहिमेची सुरुवात केली, त्यानंतर उपांत्य फेरीत मलेशियाचा ६-० असा पराभव केला.

ज्योती सुरेखा वेन्नम, प्रीतिका प्रदीप आणि दीपशिखा यांचा समावेश असलेल्या महिला संघाने उपांत्य फेरीत यजमान बांगलादेशचा २३४-२२७ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दक्षिण कोरियाने इराणचा २३७-२२७ असा पराभव केला.

अव्वल मानांकित महिला संघाने उपांत्यपूर्व फेरीत व्हिएतनामवर २३५-२२५ असा विजय मिळवून सुरुवात केली आणि नंतर उपांत्य फेरीत यजमान बांगलादेशविरुद्ध विजय मिळवला.


लक्ष्य साधताना अतनु दास

पुरुषांच्या पात्रता फेरीत भोगेने कारकिर्दीतील सर्वोत्तम पात्रता गुण मिळवत ६८७ गुण मिळवले, ज्यामध्ये नऊ १० गुणांचा समावेश आहे. २५ वर्षीय खेळाडूचे मागील एकमेव आंतरराष्ट्रीय पदक बँकॉकमध्ये २०१९ च्या आशिया चषकातील मिश्र सांघिक स्पर्धेत होते. अनुभवी तिरंदाज अतानु ६६८ गुणांसह सातव्या स्थानावर राहिली, तर राहुल ६६६ गुणांसह ११ व्या स्थानावर राहिली.

पात्रता फेरीत, दीपशिखा ७०५ गुणांसह चार्टमध्ये अव्वल स्थानावर होती, त्यानंतर जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ज्योती सुरेखा वेन्नम ७०३ गुणांसह आणि आशादायक स्टार प्रितिका प्रदीप ७०२ गुणांसह आणि चिकिथा तनिपार्थी ७०१ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर होत्या.

# धुळे महापालिकेसाठी आज आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १० नोव्हेंबर**

येथील महापालिका निवडणुकीच्या तयारीला वेग आला असून, यासाठी मंगळवारी (११ नोव्हेंबर) आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. ही सोडत सकाळी अकराला शहरातील शाहू महाराज नाट्यगृहात काढण्यात येणार आहे.




धुळे शहरात चार लाख ३५ हजारांहून अधिक मतदार नोंदणीकृत आहेत. यातील सुमारे ३७ हजार २२८ मतदार अनुसूचित जाती प्रवर्गातील, तर २७ हजार ६८९ मतदार अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत. या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. आरक्षण समितीची तयारी पूर्णत्वास आली असून, पारदर्शकपणे निवडणूक कार्यक्रम पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासन सज्ज झाले आहे.

नागरिकांनी व इच्छुकांनी आरक्षण सोडत कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे.

### सोडतीनंतर ठरणार इच्छुकांचे भवितव्य

आरक्षण निश्चित झाल्यानंतर राजकीय पक्षांच्या उमेदवारी प्रक्रियेला वेग येणार आहे. आरक्षण काढल्यानंतर संभाव्य उमेदवारांची निश्चिती होऊ शकेल. मागास वर्ग आणि महिला प्रवर्गासाठी किती प्रभाग राखीव राहतात, यावर अनेकांचे राजकीय भवितव्य अवलंबून राहणार आहे. त्यामुळे आरक्षण सोडतीकडे शहरातील लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुकांसह धुळेकरांचेही लक्ष लागले आहे.

# छाटणीच्या नावाखाली झाडांची कत्तल!

## शहादा वनविभागाची ठेकेदाराला 'मूकसंमती'

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, १० नोव्हेंबर**

वनविभागांतर्गत रस्त्यालगत असलेल्या डेरेदार दाट झाडांची छाटणी केली जात आहे; परंतु या छाटणीच्या नावाखाली वनविभागाने परवानगी दिलेल्या ठेकेदाराकडून अडचणीच्या असलेल्या फांद्याची छाटणी न करता मोठ्या चिंचेच्या झाडांची तोडच केली जात असून, यामुळे वनविभागाची ठेकेदाराला 'मूकसंमती' असल्याचे दिसून येत आहे.

शहादा वनपरिक्षेत्रांतर्गत तऱ्हाडी गावाच्या हद्दीत, शिरपूर तालुक्यातून जाणाऱ्या अंकलेश्वर- बऱ्हाणपूर राष्ट्रीय महामार्गालगत अडथळा असलेल्या झाडांच्या फांद्या छाटणीचे काम एका ठेकेदाराला देण्यात आले आहे. यात महामार्गालगतची झाडे शहादा वनविभागाच्या हद्दीत असून, वनविभागाच्या छाटणी करारानुसार केवळ छाटणीचीच परवानगी आहे. असे असताना शिरपूर-तऱ्हाडी परिसरातील शेतकरी अरुण दगा सोनवणे यांची महामार्गालगत शेतजमीन आहे. या रस्त्यालगत दाट सावली असलेल्या मोठी चिंचेची दोन झाडे संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता आणि कोणतीही लिखित अथवा तोंडी पूर्वपरवानगी न घेता बुंध्यासकट कापण्यात आली आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.





### अडचणीच्या फांद्या छाटणीचीच मर्यादा

विशेष म्हणजे, शिरपूर तालुक्यातून जाणाऱ्या अंकलेश्वर- बऱ्हाणपूर राष्ट्रीय महामार्गावर तऱ्हाडी गाव हद्दीत, झाडांची छाटणी करण्याचे काम सुरू आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या अधिग्रहित क्षेत्रात शिरपूर-बऱ्हाणपूर महामार्गाचे काम असून, वृक्ष छाटणीचा ठेका वनविभागाकडून देण्यात आला आहे. यात संबंधित ठेकेदाराला वृक्षतोड परवानगी नसून, केवळ अडचणीच्या असलेल्या व लहान वृक्षांच्या फांद्या छाटणीचीच मर्यादा आहे.

मात्र, प्रत्यक्षात महामार्गालगत शेतजमीन बांधालगत झाडे मालकी असलेल्या शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शेकडो मोठी झाडे यंत्राच्या सहाय्याने अर्ध्यातून कापली आहेत. अरुण सोनवणे या शेतकऱ्यांच्या शेत हद्दीतील २५ वर्षे जुनी मोठी चिंचेची दोन झाडे बुंध्यासकट कापण्यात आली आहेत. यानुसार या ठेकदाराने अशा अनेक झाडांची कत्तल केल्याची शक्यता आहे.

### पंचनाम्यासह नुकसानभरपाई व ठेकदारावर कारवाई करा

वनविभागाच्या ठेकदाराने नियमबाह्यपणे ही झाडे बुंध्यासकट नष्ट केल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवताना अडचणी येऊ शकतात. शिवाय, जैवविविधता आणि पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीनेही हा प्रकार गंभीर आहे. न्यायनिर्णय व कारवाईची मागणी शेतकऱ्यांच्या तक्रारीवर आधारित चौकशी करणे, वन विभागाकडून सविस्तर पंचनामा व अहवाल तयार करून गुन्हा दाखल करणे, पंचनाम्यात कत्तल झालेल्या वृक्षांची व मर्यादेपेक्षा अधिक वृंदीच्या फांद्यांची झालेली तोड देखील पंचनाम्यात नमूद करण्यात यावी. तसेच संबंधित ठेकेदारावर शिक्षात्मक आणि दंडात्मक कार्यवाही करणे व सदर शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. या घटनेमुळे भविष्यात असे प्रकार होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने आणि वनविभागाने कडक नियमावलीची अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे.

### महामार्ग प्राधिकरणाची परवानगी आवश्यक

महाराष्ट्र वृक्ष संरक्षण अधिनियम, त्यातील दंड तरतुदीनुसार, शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवरील वृक्षतोडीसाठी संबंधित शेतकऱ्यांसह महसूल विभागाची लिखित परवानगी, तसेच संबंधित विभागाची अधिकृत अधिग्रहण पूर्वमंजुरी आवश्यक आहे, तसेच विनापरवानगी झाडे तोडली गेली तर दोषींवर दंडात्मक कारवाईसह, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे. परंतु, महामार्गावर लहान तसेच अडचणीच्या असलेल्या फांद्यांची छाटणीची परवानगी असताना झाडांवर कुऱ्हाड चालवण्यास कोणतीही कायदेशीर मुभा नाही.

> ही घटना केवळ शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान नाही, तर शेतकऱ्यांशी चर्चा न करताच छाटणीच्या ठराविक मर्यादेचे उल्लंघन करीत चिंचेची झाडे बुंध्यासकट तोडली गेली आहेत. महामार्ग प्राधिकरणांतर्गत झाडांच्या अधिग्रहणामुळे भविष्यात नुकसानभरपाई, सरकारी लाभाचा अधिकार होता; परंतु वनविभागाच्या मूकसंमतीमुळेच शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून, या वृक्षतोडीचा त्वरित पंचनामा करावा, दोषींवर कारवाई करून शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे.
>
> **- भूषण माधव बागूल**
> **(अभ्यासक व पर्यावरण प्रेमी)**

### नियमबाह्य वृक्षतोडीने शेतकऱ्यांचा मोबदला हक्क डावलला

वनविभागाच्या ठेकदाराकडून वृक्षतोडीमुळे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले असून या चिंचेच्या झाडांची सरकारी नोंद राष्ट्रीय महामार्गाच्या अधिग्रहित क्षेत्रात आहे. त्यामुळे तोड करण्यात आलेली झाडे भविष्यात शासनाकडून मिळणाऱ्या नुकसान भरपाईच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होती.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### तळोद्यात परिवहन दिनानिमित्त चालकांचा सन्मान

**तळोदा** : महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघाची तळोदा तालुका शाखा व ग्राहक पंचायत महाराष्ट्रतर्फे परिवहन दिनानिमित्त रिक्षा, टॅक्सी व घंटागाडी चालकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. संजयकुमार शर्मा, जिल्हा सचिव अशोक सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष कीर्तीकुमार शहा, प्रवासी महासंघाचे तालुकाध्यक्ष अॅड. अल्पेश जैन, सचिव प्रा. राजाराम राणे, ग्राहक पंचायतीचे तालुकाध्यक्ष रमेशकुमार भाट, सचिव शरद सूर्यवंशी, चेतन धनका, मनीष सुगंधी, पंकज तांबोळी, भूषण येवले, महिला प्रतिनिधी रशिलाबेन देसाई, अमीबेन तुरखिया, टॅक्सीचालक युनियनचे अध्यक्ष जहिरोद्दीन शेख, रिक्षाचालक युनियनचे अध्यक्ष पंकज मगरे आदी उपस्थित होते. ग्राहक पंचायतीचे जिल्हा सचिव अशोक सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात लोकांमध्ये वाहतूक नियमांची जागरूकता आणणे तसेच वाहनांमुळे होणारे दुष्परिणाम दूर करणे हा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश असल्याचे सांगितले. पंडित भामरे, प्रा. राजाराम राणे यांनी टॅक्सी, रिक्षाचालकांनी प्रवाशांशी सौजन्याने वागून त्यांना चांगली सेवा द्यावी, असे सांगितले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते खंडू कोळी जहिरोद्दीन शेख अमानुद्दीन शेख, संजय तांबोळी, प्रकाश कलाल, लालसिंग वळवी, भूपेंद्र तिजबीज, सुनील माळी, मोहन वाघ, मजुरोद्दीन शेख, प्रकाश तिजवी, सुनील गोजरे, आनंद मंगळे, शंकर साळुंखे, संदीप गोजरे, संजीव गोजरे, संजय कलाल आदी चालकांचा प्रमाणपत्र, गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. रमेशकुमार भाट यांनी आभार मानले.

### धुळ्यात निवडणूक उमेदवारी अर्ज भरणे सुरू

**धुळे** : जिल्ह्यातील शिरपूर, दोंडाईचा, शिंदखेडा आणि पिंपळनेर या चार ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सोमवारपासून (१० नोव्हेंबर) प्रारंभ झाला. जिल्ह्यात पिंपळनेर, शिरपूर, दोंडाईचा या नगरपरिषदांसह शिंदखेडा नगरपंचायतीसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे चारही ठिकाणी इच्छुकांकडून मोर्चेबांधणीने वेग घेतला आहे. राजकीय पक्षांतर्फे निवडणूकप्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून, इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या जात आहेत. जिल्हा व तालुका प्रशासनातर्फे निवडणुकीसाठी तयारी करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्याने प्रशासनाकडून राजकीय पक्षांचे फलक, झेंडे काढण्यात आले आहेत. पिंपळनेर येथे नगराध्यक्षपद एसटी महिलेसाठी राखीव, शिरपूरमध्ये ओबीसी राखीव, दोंडाईचा येथे ओबीसी महिलेसाठी राखीव, तर शिंदखेडा येथे सर्वसाधारण राखीव आहे. पिंपळनेर नगरपरिषदेसाठी २० सदस्य २० हजार ८०० मतदार, शिरपूर नगरपरिषदेसाठी ३२ सदस्य ६५ हजार ७८९ मतदार, दोंडाईचा नगरपरिषदेसाठी २६ सदस्य ४८ हजार ७८६ मतदार आणि शिंदखेडा नगरपंचायतीसाठी १७ सदस्य २२ हजार ७१७ मतदार निवडून देतील. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सोमवारपासून (१० नोव्हेंबर) प्रारंभ झाला आहे.



### पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'वंदे मातरम्'चे गायन

**शिरपूर** : ज्येष्ठ साहित्यिक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सामूहिक गायनाचा कार्यक्रम उत्साहात झाला. 'वंदे मातरम्' गीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणेचा स्त्रोत ठरले. या गीताने देशवासीयांच्या अंतःकरणात राष्ट्रीय अभिमान, देशभक्ती आणि एकात्मतेची ज्योत प्रज्वलित केली. आजही या गीताचा नाद प्रत्येक भारतीयाच्या हृदयात उत्साह व श्रद्धा निर्माण करतो. प्राचार्य डॉ. दीपक बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम जाला. सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. गजानन खेकाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी ईश्वर बोरसे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### पटेल कन्या शाळेत व्यावसायिक प्रशिक्षण

**शिरपूर** : शहरातील एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळेत विद्यार्थिनींना सोमवारी (१० नोव्हेंबर) आपल्या परिसरातील विविध व्यवसायांची माहिती होण्यासाठी शनिवार कृती उपक्रमांतर्गत व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. विद्यार्थिनींना सुतार कामाची ओळख करून देण्यासाठी शालेय परिसरातील सुतार हेमचंद्र रमेश पवार यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलाविण्यात आले होते. मुख्याध्यापक मनोज पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. हेमचंद्र रमेश पवार यांनी सुतार कामासाठी लागणाऱ्या विविध अवजारांची विद्यार्थिनींना माहिती दिली. कोणत्या अवजाराचा कसा वापर करावा, हेदेखील शिकविले. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक ज्ञानासोबतच व्यावसायिक ज्ञानात भर पाडण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आला. मुख्याध्यापक मनोज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक अविनाश पाटील यांनी प्रास्ताविक केले.



# धुळ्यात सात कोटी खर्चाच्या कॉंक्रीट रस्त्याची चाळण!

## शिवसेना ठाकरे गटातर्फे रांगोळी काढत अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १० नोव्हेंबर**

शहरात विकासाच्या नावाखाली सुरू असलेला गैरव्यवहार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पुन्हा एकदा समोर आणला. सुमारे सात कोटींचा खर्च केलेल्या रस्त्याची अवघ्या दोन ते चार महिन्यांतच चाळण झाली. त्यामुळे अशा निकृष्ट विकासकामातून धुळेकरांच्या पैशांची लूट सुरूच असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाने करीत या रस्त्यावर रांगोळी काढत भ्रष्टाचाराकडे धुळेकरांचे लक्ष वेधत आगळेवेगळे आंदोलन केले.

शहरातील राजवाडे बँक ते श्रीराम पेट्रोल पंपादरम्यान सुमारे ५०० ते ६०० मीटर अंतराचा रस्ता कॉंक्रिटीकरणासाठी निवडण्यात आला. या रस्त्याची दुरुस्तीची गरज नसतानाही बेकायदेशीर ठराव आणि मंजुरी देऊन हे काम करण्यात आले. या कामासाठी तयार केलेले अंदाजपत्रक बोगस असल्याचा आरोप आहे. केवळ एक कोटीच्या कामावर तब्बल सात कोटींचा खर्च दाखविण्यात आला. महापालिकेच्या नियमित निधीत तरतूद नसतानाही विकास शुल्काच्या रकमेतून हा खर्च करण्यात आला. लेखापाल आणि नगररचना विभागाच्या नकारात्मक टिपणीकडे दुर्लक्ष करून महापालिका अधिनियमाचे उल्लंघन करत काम सुरू करण्यात आले. शासनाच्या नियमानुसार कॉंक्रीट रस्त्याचे आयुष्य २५ वर्षे असते. मात्र, या रस्त्याची २५ आठवड्यांमध्येच चाळण झाली. रस्त्याच्या कामात वाळूऐवजी डस्ट आणि निकृष्ट खडी वापरल्याने काही महिन्यांतच रस्त्याची खडी उखडली गेली. महापालिकेत आलेले नवीन आयुक्त सत्ताधारी भाजपचे घरगडी असल्याचा आरोप करीत या तक्रारीवर कोणतीही कारवाई होण्याची शक्यता नसल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे यांनी म्हटले असून, धुळेकरांनाच आता जागरूक होण्याची गरज आहे. या प्रकरणाची चौकशी होऊन जबाबदारांवर कठोर कारवाई व्हावी, तसेच भविष्यात अशा प्रकारचा भ्रष्टाचार होऊ नये यासाठी शिवसेनेने आंदोलनाची भूमिका घेतली असल्याचेही जिल्हाप्रमुख सोनवणे यांनी म्हटले आहे.

या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे यांच्यासह नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, भरत मोरे, प्रशांत भामरे, आनंद जावडेकर, पंकज भारस्कर, कपिल लिंगायत, दिनेश पाटील, अनिल चौधरी, सलीम लंबू, अजय चौधरी, सागर निकम, नीलेश कांजरेकर, अनिल शिरसाठ, विष्णू जावडेकर, इस्तियाक अंसारी आणि संजय पाटील आदी उपस्थित होते.

### पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिकांनी निवास प्रकाराची नोंदणी करा : जाधव

**धुळे** : शासनाच्या पर्यटन संचालनालयाकडून राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पर्यटकांना सुरक्षित, अधिकृत आणि दर्जेदार निवास सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी व्हॅकेशन होम, पर्यटन अपार्टमेंट, पर्यटन व्हिला व होम स्टे यांसारख्या निवास प्रकारांची अधिकृत नोंदणी करणे पर्यटन संचालनालयाने अनिवार्य केले आहे. यासाठी पर्यटन व्यवसायाशी संबंधित व्यावसायिकांनी आपल्या निवास प्रकाराची नोंदणी करावी, असे आवाहन पर्यटन संचालनालयाचे नाशिक येथील उपसंचालक विजय जाधव यांनी केले आहे. पर्यटकांचे आदरातिथ्य समृद्ध करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. होम स्टे, टुरिस्ट व्हिला, टुरिस्ट अपार्टमेंट या नव्या निवासी पर्यायांची सुविधा देण्यासाठी इच्छुक असलेल्यांना पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयात नोंदणी करता येत आहे. अधिक माहितीसाठी ०२५३-२९९५४६४ दूरध्वनी क्रमांकावर तसेच ८३९०७३१७३७ या भ्रमणध्वनीवर, ddtourism.nashik-mh@gov.in या ईमेलवर आणि www.maharashtratourism.gov.in या संकेस्थळास भेट द्यावी, असेही उपसंचालक जाधव यांनी कळविले आहे.

# 'त्या' शालेय बसची फिटनेस मुदत दोन महिन्यांपूर्वीच संपल्याचे उघड

## प्रकरण दाबण्याचा प्रयत्न; अपघाताची सखोल चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, १० नोव्हेंबर**

अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा पर्वत पायथ्याशी असलेल्या आमलीबारी गावाजवळील देवगोई घाटात रविवारी (९ नोव्हेंबर) झालेल्या अपघातातील शालेय बसची फिटनेस मुदत दोन महिन्यांपूर्वीच संपली असल्याचे समोर आले आहे. अपघातात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू होऊनही फक्त बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे सोपस्कार पूर्ण करण्यात आले असून, चाळीसगावातील (जि. जळगाव) एका राजकीय पक्षाच्या नेत्याची संस्था असल्याने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी आणि आसपासच्या परिसरातून आदिवासी विद्यार्थ्यांना घेऊन अक्कलकुव्याकडे जाणारी शालेय बस आमलीबारी गावाजवळील देवगोई घाटातील १०० ते १५० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. अपघातात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू, तर ५६ विद्यार्थी जखमी झाले. अपघातात जगदीश बहादूरसिंग तडवी (इयत्ता २ री, रा. निबीपाडा) व कपिला जाहागीर राऊत (इयत्ता ७ वी, काठी) या विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथील आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेत या विद्यार्थ्यांना नेण्यात येत होते. अपघातग्रस्त बसची (एमच-१५, एके-१४५९) हिची फिटनेस २२ सप्टेंबर २०२५ मध्येच संपल्याचे समोर आले आहे.

बसची फिटनेस संपली होती, तर ती रस्त्यावर धावलीच कशी, असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे. त्यामुळेच बसची फिटनेस न करताच या विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करण्याचा आरोप आता करण्यात येत आहे. अपघातानंतर पोलिसांनी फरार बसचालकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, या बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याचेही उघड झाले आहे. बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक, एक कामाठी, असे एकूण ५६ जण होते, असे सांगितले जात आहे. याबाबत अद्याप कुठलाही गुन्हा दाखल का झाला नाही, हा प्रश्न आहे. पोलिसांनी या बसची सर्व कागदपत्रे जमा करण्याचे संबंधितांना आदेशित केले आहे.

संस्थाचालकाने विद्यार्थ्यांना आणण्यासाठी दोन बस आणि एक मालवाहतूक करणारा टेम्पो पाठविल्याचे उघड झाले आहे. विद्यार्थ्यांना नियमबाह्य पद्धतीने कोंबड्यांसारखे कोंबून वाहतूक सुरू होती. मात्र, अपघातानंतर संबंधित टेम्पो घाटात अडवून त्यातील विद्यार्थ्यांना पालकांनी उतरवून घरी नेल्याचे समजते.



### घाटातील दयनीय रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर

दरम्यान, सातपुडा पर्वतरांगांमुळे अनेक ठिकाणी अरुंद आणि वळणदार रस्ते आहेत. ग्रामीण आणि डोंगराळ भागातील रस्ते अरुंद असून, दोन वाहने समोरासमोर आल्यास, ती काढण्यास धोकादायक ठरते. यामुळे अनेकदा अपघात होतात. तीव्र वळण, अरुंद पूल, डोंगराळ उतार, वेगवान गाड्या यांसारखी अनेक कारणे अपघात होण्यास कारणीभूत ठरतात. स्थानिक नागरिकांच्या मते, देवगोई घाटातील रस्ता गेल्या अनेक महिन्यांपासून खड्डेमय आणि धोकादायक स्थितीत आहे. घाटातील वाकडे-तिकडे वळण, सुरक्षित रेलिंगचा अभाव आणि सातपुड्यातील पावसामुळे झालेली निसरडी जमीन यांमुळे येथे अपघात होत असतात. यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा चर्चेत आली आहे.

# आदिवासी बांधवांसोबत भेटवस्तू देऊन स्नेहमेळावा

## तोरणमाळमध्ये नुरानी परिवाराचा अनोखा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १० नोव्हेंबर**

तोरणमाळ (ता. धडगाव) येथे हरियाली ट्रस्टचे संस्थापक (स्व.) हैदर अली नुरानी यांच्या स्मरणार्थ आणि नुरानी परिवाराच्या रौप्यमहोत्सवी उपक्रमांतर्गत यंदाही स्नेहमेळावा आदिवासी बांधवांसोबत उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी आदिवासी बांधवांना विविध संसारोपयोगी वस्तू, ब्लँकेटचे वाटप करण्यात आले, तसेच सामुदायिक स्नेहभोजन कार्यक्रम पार पडला.

या सामाजिक उपक्रमासाठी पालकमंत्री अॅड. माणिकराव कोकाटे, माजी मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित, आमदार राजेश पाडवी, भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी, साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन दीपक पाटील, ज्येष्ठ नेते डॉ. कांतिलाल टाटिया, माजी सभापती हेमलता शितोळे-पाटील, प्रतिभा शिंदे, माजी नगराध्यक्ष शेख जहीर मुशीर, अग्रसेन पतसंस्थेचे चेअरमन नूहभाई नुरानी, तय्यबभाई नुरानी, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सीमा सोनगिरे, तसेच इतर ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार डॉ. विजयकुमार गावित यांनी नुरानी परिवाराचे कार्य सातत्यपूर्ण असल्याचे सांगत, परिवाराने अनेक आदिवासी विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य केले असल्याचे नमूद केले.

आमदार राजेश पाडवी म्हणाले की, (स्व.) हैदरअली नुरानी यांनी आपल्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी न करता आदिवासी बांधवांसोबत साजरी करण्याचा संकल्प केला होता. त्यांचा हा वारसा अखंडपणे सुरू आहे आणि त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे.

भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी हरियाली ट्रस्ट व नुरानी परिवाराकडून सुरू असलेले लोककल्याणचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. त्यांनी जाती-धर्मभेद न मानता सातपुडा परिसरातील वंचितांना मदत करून मानवतेचे उदाहरण ठेवले असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाला नूहभाई नुरानी यांच्या वाढदिवसानिमित्त पालकमंत्री व मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. विष्णू जोंधळे यांनी सूत्रसंचालन केले.




### पालकमंत्र्यांकडून नुरानी परिवाराच्या कार्याचे कौतुक

या वेळी पालकमंत्री अॅड. कोकाटे यांनी नुरानी परिवाराच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, ''राजकारणात टिकून राहणे अवघड आहे; पण माणुसकीची सेवा महत्त्वाची आहे. ज्या माणसाची संस्कृती व प्रवृत्ती चांगली असते, ते नेहमी माणुसकी जपत असतात. गरिबांविषयी सहवेदना असलेले नुरानी कुटुंब खऱ्या अर्थाने समाजकार्य करीत आहे. दिवाळीसारखा सण आदिवासी भागात जाऊन साजरा करण्याची ही अनोखी परंपरा आहे. या कार्यक्रमाला विविध पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित राहतात, यावरूनच कार्यक्रमाचे महत्त्व सिद्ध होते.'' त्यांनी तोरणमाळ परिसरात वृक्ष लागवड, संगोपन यांसोबतच सीताफळ व आवळा प्रक्रिया उद्योग उभारण्याचे आश्वासन दिले. सातपुड्यात पर्यटन व रोजगारसंधी वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### सोयगाव येथे प्रथमेश मिसाळ याचा सत्कार

**सोयगाव** : जिल्हा क्रीडा अधिकारी छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली, विभागीय अँथलेटिक्स स्पर्धेमध्ये १४ वर्षांखालील १०० मीटर अंतर १२.८३ सेकंदात पार करुन मराठवाडा विभागातून दुसरा क्रमांक कै. बाबूरावजी काळे स्कूलचा विद्यार्थी प्रथमेश विजय मिसाळ (सोयगाव) याने पटकावला. त्याचा सोहणी सी.एस.सी. सेंटर या ठिकाणी सत्कार करण्यात आला. त्याच्या या यशाने सोयगावकरांचे नाव राज्यभर झळकले आहे. सोयगाव शहरातील सोहणी सी.एस.सी सेंटर येथे ह.भ.प.जितेद्र पंडित महाराज, भाजपा जिल्हा सरचिटणिस सुनील गव्हाडे, प्रा.कमलेश काळे, कृषीभूषण अरूण सोहणी, खरेदी-विक्री संघाचे संचालक मंगेश सोहणी, संदीप सुरडकर, महेश मानकर, विजय गव्हाड आदींसह मान्यवरांकडून सत्कार करण्यात आला.



### भक्तीला चैतन्याची जोड दिल्यास जीवनाचे सार्थक -हभप स्वप्नील महाराज गिरडकर

**धरणगाव** : सामाजिक व्यवस्थेत चिंतन, भजन व भगवंताचे नामस्मरण केल्यास तुमचा परिवार कधीही दु:खी रहाणार नाही. जीवनात परोपकाराची जाणीव ठेवून सहकार्याची भावना जोपासावी, भक्तीला विचाराची जोड दिल्यास जीवनात सुख समृद्धी प्राप्त होईल, असे प्रतिपादन हभप स्वप्नील महाराज गिरडकर यांनी व्यक्त केले. नुकताच येथील लहान माळीवाड्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जालंधर पाटील, बाळू पाटील, महेंद्र पाटील व गणेश पाटील यांना नात रत्न प्राप्त झाल्याबद्दल व उमेश बाळू पाटील यांस कन्या डिंपल उर्फ मनू कन्यारत्न प्राप्त झाल्याने तिच्ता बारशाच्या अनुषंगाने समाज प्रबोधनपर कीर्तन झाल. याप्रसंगी हभप स्वप्नील महाराज गिरडकर बोलत होते. अडीच तासांच्या कीर्तनात हभप स्वप्नील यांनी अतिशय भावनिक व आजच्या समाज व्यवस्थेतील व कुटूंब व्यवस्थेतील सासू, सुना, आई, वडील, मुलगा, मुलगी यांच्या आपसातील मतभेदामुळे समाजाचे प्रामुख्याने आपल्या कुटुंबात किती त्रास सहन करावा लागतो याचे तंतोतंत उदाहरणं सादर केले व ज्यांच्याकडे मुलगी जन्माला येते तो खरा भाग्यशाली असतो, असे सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कुणबी पाटील समाज पंच मंडळ व पारोळा तालुक्यातील नाथभक्त परिवार व सोनवणे परिवार यांनी परिश्रम घेतले.



### राष्ट्र गौरव पुरस्काराने डॉ. रोहिदास गवारे सन्मानित

**शेंदुर्णी (ता. जामनेर)** : आंतरराष्ट्रीय नामांकन (आयएसओ २०१५) प्राप्त डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडियाद्वारा आयोजित 'राष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' हा राज्यस्तरीय पुरस्कार शेंदुर्णी येथील र. भा. गरुड महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख डॉ. रोहिदास गवारे यांना शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी 'राष्ट्र गौरव पुरस्काराचे' आयोजन करण्यात येते. यामध्ये डॉ. रोहिदास गवारे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. तसेच एक काव्यसंग्रह आणि एक संदर्भग्रंथदेखील प्रकाशित झाला आहे. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील अध्ययन, अध्यापन, संशोधन, समाज सेवा, विभिन्न उपक्रम आयोजन याबाबतच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते डॉ. रोहिदास गवारे यांना प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल धी शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन संजय गरुड, व्हाइस चेअरमन भीमराव शेळके, सचिव सागरमल जैन, सहसचिव यू. यू. पाटील, कार्यालयीन सचिव दीपक गरुड, प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.संजय भोळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतरांनी अभिनंदन केले आहे.



### राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी चोपडा येथील उपशिक्षिका एस. एस. पाटील यांची निवड

**चोपडा** : महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित चोपडा येथील डॉ. सुरेश जी. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील उपशिक्षिका एस. एस. पाटील यांची शाळा मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठी अपेक्षित असलेल्या गरजा व बदल यांबाबत आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी निवड झाली. जिल्ह्यातील २० तज्ज्ञ शिक्षकांमध्ये निवड झाल्याबद्दल महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील व संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. के. एन. सोनवणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. एस. पाडवी, पर्यवेक्षक ए. एन. बोरसे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



### पारोळा कुटीर रुग्णालयात पाण्याची टाकी भेट; रुग्णांना दिलासा; भूषण टिपरे यांचे औदार्य

**पारोळा** : येथील कुटीर रुग्णालयाला सामाजिक कार्यकर्ते तथा लाडशाखीय वाणी समाजाचे संचालक भूषण टिपरे यांच्याकडून दोन हजार लीटर क्षमतेची पिण्याच्या पाण्याची टाकी देण्यात आली. यामुळे रुग्णांना दिलासा मिळाला आहे. रुग्णालयामध्ये रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाइकांना पिण्याच्या पाण्याची दीर्घकाळापासून भासणारी गैरसोय लक्षात घेता रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जिनेंद्र पाटील यांनी दूरध्वनीद्वारे ही समस्या भूषण टिपरे यांच्या निदर्शनास आणून दिली. कोणताही विलंब न करता टिपरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत पाण्याची टाकी रुग्णालयाला सुपूर्द केली. त्यांच्या या औदार्याबद्दल अधीक्षक डॉ. जिनेंद्र पाटील यांनी रुग्णालय प्रशासनाच्या वतीने आभार मानले. यावेळी डॉ. राजेश वाल्डे, दीपक सोनार, राजू वानखेडे, ज्ञानेश्वर मराठे, रोहन लोहरे, आशुतोष शेलार आदी उपस्थित होते.

## आदिवासी जनजाती समाज हिंदू संस्कृती अन् परंपरेचा पुरातन काळापासून वारसदार

### जनजाती चेतना परिषदेत प्रकाश गेडाम यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १० नोव्हेंबर**

जनजाती समाजाचा इतिहास प्रेरणादायी व गौरवशाली असून वैविध्यपूर्ण संस्कृतीने नटलेला आहे. परंतु आपल्या समाजात देश विघातक लोकांकडून कृत्रिमरित्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आव्हाने निर्माण करण्यात येत आहेत. या आव्हानांचे स्वरूप जाणून घेऊन त्यासंबंधी वैचारिक लढ्याची दिशा ठरविण्यासाठी जनजाती समाजातील विचारवंत बांधवानी एकत्र येऊन वैचारीक मंथन करण्याची गरज आहे. आदिवासी बांधव हिंदू संस्कृती व परंपरेचे पुरातन काळापासूनचे वारसदार आहेत. ही संस्कृती टिकली पाहिते, असे प्रतिपादन चेतना



परिषदेचे प्रांत संयोजक प्रकाश गेडाम यांनी केले.

ते भगवान बिरसा मुंडा सार्धशती निमित्त चेतना परिषदेत बोलत होते.

चोपडा शहराजवळील खेतेश्वर हॉलमध्ये चेतना परिषद पार पडली. त्यात ते बोलत होते. प्रारंभी भगिनी मंडळ संचलित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक गीत सादर केले. तसेच भगवान बिरसा मुंडासे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन अतिथींचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक दत्ता पावरा यांनी केले. परिचय दिनेश बारेला यांनी करुन दिला.

प्रथम सत्र जनजाती गौरवशाली इतिहास, परंपरा व विकार याविषयी प्रकाश गेडाम यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात धर्ती के आबा भगवान बिरसा मुंडा यांचे चरित्र देवगिरी प्रांत सहसचिव काशिराम बारेला यांनी मांडले.

तिसऱ्या सत्रात- जनजाती अस्मिता व अस्तित्व याविषयी सह हितरक्षाप्रमुख पश्चिम क्षेत्र यांनी काशिराम बारेला यांनी मनोगत व्यक्त केले.

या चेतना परिषदेला जळगाव जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर आदिवासी बंधू भगिनी उपस्थित होते. आभार प्रवीण पाटील यांनी मानले.

### महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्तेपदी आमदार अनिल पाटील यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १० नोव्हेंबर**



राज्याचे माजी मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री, नंदुरबार जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि अमळनेर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अनिल भाईदास पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते म्हणून नियुक्ती झाली आहे.

अनिल पाटील यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाला एक अनुभवी, संयमी, शांत स्वभावाचे आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे आणि लोकांशी असलेल्या निकट संबंधांमुळे पक्षाच्या संघटनात्मक बळकटीला नवी दिशा व ऊर्जा मिळणार असल्याचा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला आहे.

आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत आमदार पाटील यांनी ग्रामीण भागातील विकास, शेती, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि रोजगार निर्मिती यावर भर दिला आहे. नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी आदिवासी भागाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या. मंत्रीपदाच्या काळात त्यांनी आपत्तीग्रस्तांना मदत, पुनर्वसन आणि जनहिताच्या धोरणात्मक निर्णयांमधून कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण घालून दिले. त्यांच्या प्रामाणिक, लोकाभिमुख कार्यपद्धतीची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांना ही राज्यस्तरीय जबाबदारी दिली आहे. या नियुक्तीबद्दल अमळनेरसह जळगाव,धुळे आणि नंदुरबार जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी ही नियुक्ती अमळनेरचा आणि उत्तर महाराष्ट्राचा सन्मान असल्याचे म्हटले आहे.



### मसाप चाळीसगाव शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**चाळीसगाव** : महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चाळीसगाव शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा ९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ कर्मचारी पतपेढी सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप होते. मंचावर शाखेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ.सुनील राजपूत, शाखेचे कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे, उपाध्यक्ष गणेश आढाव, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी, प्रमुख कार्यवाह -नितीन खंडाळे हे मंचावर प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे यांनी सभासदांचे स्वागत करत स्वलिखित मसाप गौरव गीत सादर केले. प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे यांनी मागील वर्षाच्या सभेचे इतिवृत्त वाचन केले. कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ चा जमाखर्च ताळेबंद सभासदांसमोर मांडला. शाखेचे सभासद तथा कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर यांनी व्याख्यानमालेस लाभलेल्या रकमेचासुद्धा ताळेबंदात समावेश करावा ही सूचना केली.

योगाचार्य वसंतराव चंद्रात्रे यांचे पंचामृत हे पुस्तक प्रकाशित झाल्याप्रित्यर्थ सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त कलाशिक्षक देविदास बाविस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त शाखेतर्फे शुभेच्छा दिल्या.

कार्यकारिणी सदस्य विजय कदम यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. सूत्रसंचालन पर्यावरण मित्र शालिग्राम निकम यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य जगताप यांनी सभासदांना धन्यवाद देत मसाप शाखेस आर्थिक मदत करण्याचे आवाहन करीत येऊ घातलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे बहुसंख्येने उपस्थित राहण्याची विनंती केली. लवकरच प्राचार्य जगताप यांच्या 'कृतार्थ' या जीवनदर्शन ग्रंथाचे प्रकाशन समारंभ होणार असल्याचे सुतोवाचही केले.

सभेस शाखेचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर विश्वस्त उत्तमराव काळे, सुधीर पाटील, वर्धमान धाडिवाल, माजी विश्वस्त जयसिंग बागुल, सभासद बाळासाहेब वाबळे, बी.के.निकम, एस.आय.राजपूत, एस.टी.पाटील, डी.एस.मराठे, ए.एल. पाटील, राकेश बोरसे, भय्यासाहेब वाघ, संदीप पाटील यांसह दत्तभक्त मंडळ व मसाप सभासद उपस्थित होते. सभा यशस्वीतेसाठी मसाप कार्यकारिणी सदस्य अशोक ब्राम्हणकार, अशोकराव वाबळे, गोरख ढगे, वंदना रोकडे, ॲड. सुषमा पाटील, प्रतिभा बागुल, भाऊसाहेब वाघ व सुधीर देवरे यांनी परिश्रम घेतले.

## भातखंडे गावी जुगारावर धाड; दीड लाखावर

### मुद्देमालासह ६ जणांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १० नोव्हेंबर**

तालुक्यातील भातखंडे गावी झन्नामन्ना नावाच्या जुगारावर पाचोरा पोलिसांनी अचानक धाड टाकून पाच मोटर सायकलींसह सहा जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत १३ हजार ५०० रुपये रोख रकमेसह १ लाख ६३ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पाचोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांना गोपनीय बातमी मिळाल्यानुसार, पोलीस पथकाने ९ नोव्हेंबर सायंकाळी पाचला भातखंडे खुर्द गावी अचानक धाड टाकली. निशीकांत राजेंद्र पाटील हा त्याच्या घराच्या बाजुला, नवे गांव, भातखंडे खुर्द (ता. पाचोरा) येथे संशयित आरोपी पंकज सुरेश कुमावत (वय ३२), योगेश जगन्नाथ भिल, (वय ५०), निंबा जालम मोरे (वय २५), निशीकांत राजेंद्र पाटील, (वय ३२) (सर्व रा. भातखंडे खुर्द, ता. पाचोरा), रमेश मोहन भिल (वय ३४) ( रा. दुसखेडा, ता. पाचोरा), सुभाष भास्कर पाटील, (वय ४८)( रा. गिरड, ता. भडगाव) यांनी संगनमत करुन स्वतःच्या फायद्यासाठी झन्ना मन्ना पत्ता जुगारावर पैसे लावित खेळ खेळतांा व खेळवितांना रोख १३ हजार ५०० रुपये, ५ मोटारसायकली व ५२ पत्त्याचा कॅट असा एकूण १ लाख ६३ हजार ५०० रुपयांच्या पत्ता जुगाराच्या साहित्यासह मिळुन आले. म्हणून पाचोरा पोलीस स्टेशन येथे कार्यरत पोलीस कर्मचारी योगेश पाटील यांनी संशयित आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली असून सर्व आरोपींना नोटीस देऊन सोडून देण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संजय निकुंभ, पोलीस हेड कॉन्स्टेबल राहुल शिंपी, गजानन देशमुख, वसीम शेख, महेंद्र पाटील, श्रीराम शिंपी, शरद पाटील, गणेश कुंवर या पथकाने कारवाई केली.

दरम्यान, पाचोरा शहरातही बऱ्याच ठिकाणी झन्ना मन्ना नावाचा जुगार सुरू असून याकडे मात्र पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष दिसून येत असल्याचे सुज्ञ नागरिकांतून बोलले जात आहे.



## नाशिक विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत जळगाव जिल्ह्याचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १० नोव्हेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा अम्युचर डॉजबॉल असोसिएशन, राष्ट्रीय विद्यालय व ज्युनियर कॉलेज चाळीसगाव व चाळीसगाव तालुका क्रीडा समिती यांच्यातर्फे आयोजित नाशिक विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धा चाळीसगाव येथील राष्ट्रीय विद्यालय व ज्युनियर कॉलेजच्या मैदानावर उत्साहात संपन्न झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे चेअरमन प्रा.एम.वाय.चव्हाण यांनी मैदान पूजन करीत श्रीफळ वाढवून केले. प्रमुख अतिथी म्हणून य.ना.चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य जे. बी. शेळके, राष्ट्रीय विद्यालय व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य वाय. आर. सोनवणे, चाळीसगाव तालुका क्रीडा समन्वयक तथा ग. स. सोसायटीचे संचालक अजय देशमुख, महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश जाधव, मुख्याध्यापक सचिन महाजन, रोटरी क्लबचे उपाध्यक्ष संजय सोनवणे, जळगाव जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे सचिव योगेश सोनवणे, सहसचिव नीलेश पाटील, चाळीसगाव तालुका डॉजबॉल असोसिएशनचे सचिव राहुल साळुंखे, प्रा.रामनाथ जाधव, हिरामण शिंदे व पिरन खैरनार (नाशिक), नीलेश गावंडे (नंदुरबार) यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन योगेश साळुंखे यांनी केले. स्पर्धेचे तांत्रिक समिती प्रमुख म्हणून जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे कार्याध्यक्ष गिरीश पाटील तर स्पर्धा प्रमुख म्हणून राहुल साळुंखे यांनी काम पाहिले.

स्पर्धेत पंच म्हणून प्रा.समीर घोडेस्वार, नीलेश पाटील, सचिन सूर्यवंशी, आंतरराष्ट्रीय खेळाडू विनायक सपकाळे, राष्ट्रीय खेळाडू सुष्मीत पाटील, संकल्प राजपूत, सुमित चिंचोले, धीरज बारी, धीरज वंजारी, पियूष थोरात, तन्मय पाटील, उदय पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश साळुंखे, शरद सूर्यवंशी, विजय शितोळे, प्रशांत पाटील, धनंजय चव्हाण, योगेश पांडे, दशरथ राठोड, बलवीर राठोड यांचे सहकार्य लाभले.

#### स्पर्धेचा निकाल

१७ वयोगट मुले- विजयी- जळगाव - इंदिराबाई ललवाणी विद्यालय जामनेर. उपविजयी- बी.यू. एन.रायसोनी विद्यालय जळगाव. तृतीय- दि. एन. डी.अँड एम. वाय. सार्वजनिक विद्यालय नंदुरबार. १७ वयोगट मुली- प्रथम- दे.ना.पाटील विद्यालय गंगापूर, नाशिक. उपविजयी - जळगाव उर्वरित- सारजाई कुडे विद्यालय धरणगाव. तृतीय- बी.यू.एन. रायसोनी विद्यालय जळगाव. १९ वयोगट मुले- विजयी- जळगाव उर्वरित- इंदिराबाई ललवाणी ज्युनियर कॉलेज जामनेर. उपविजयी- नंदुरबार- दि.एन.डी अँड एम.वाय. सार्वजनिक विद्यालय नवापूर. तृतीय- नाशिक उर्वरित- वाजे विद्यालय व ज्युनियर कॉलेज सिन्नर. १९ वयोगट मुली- विजयी- जळगाव उर्वरित- इंदिराबाई ललवाणी ज्युनियर कॉलेज जामनेर. उपविजयी- नाशिक - दे.ना.पाटील ज्युनियर कॉलेज गंगापूर. तृतीय- महाराणा प्रताप विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय जळगाव.

### लांबउडीत वासुदेव पावराची राज्यस्तरीय झेप



**अमळनेर** : तालुक्यातील पिंपळे बुद्रूक येथील अनुदानित आश्रमशाळेचा विद्यार्थी वासुदेव भीमसिंग पावरा याने आपल्या क्रीडा प्रतिभेची उज्ज्वल झलक सादर करत विभागीय पातळीवर सुवर्ण कामगिरी केली आहे. नाशिक येथे ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या विभागस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये १९ वर्षांखालील मुलांच्या गटात लांबउडी प्रकारात तब्बल ६.१५ मीटर झेप घेत प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची राज्यस्तरावर निवड निश्चित झाली आहे. वासुदेवच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा विद्या पाटील, सचिव युवराज पाटील, प्रकल्प अधिकारी अरुण पवार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पवन पाटील, विस्तार अधिकारी विश्वास गायकवाड, तसेच प्राथमिक-माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले. वासुदेवच्या मार्गदर्शक शिक्षकांचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला.



## रोटरी क्लब पाचोरा-भडगावचा अनोखा उपक्रम

### बालपण जगूया चला खेळूया - हॅप्पी स्ट्रीट खेळ महोत्सव उत्साहात

**पाचोरा** : रोटरी क्लब पाचोरा-भडगावतर्फे हॅप्पी स्ट्रीट खेळ महोत्सव घेण्यात आला. यात बालपणी खेळले जाणारे पारंपरिक खेळ लगोरी, गोट्या, रस्सीखेच, टायर खेळणे, मानवी सापसिडी, भवरा, विट्टी-दांडू, मामाचे पत्र हरवले, महारांगोळी असे खेळप्रकार पाचोरा-भडगाव पंचक्रोशीतील विद्यार्थी विद्यार्थिनी सर्व स्त्री पुरुष वर्ग जसे बचपनसे लेके पचपन तक असे खेळ घेण्यात आले. हे अनोखे नियोजन रोटरी क्लब पाचोरा-भडगावचे अध्यक्ष डॉ. मुकेश तेली यांनी केले.

त्यासाठी पाचोरा डॉक्टर्स असोसिएशन, पाचोरा पोलीस स्टेशन, जेसीआय पाचोरा, अनेक शिक्षक संघटना यांचे सहकार्य लाभले. प्रमुख अतिथी पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार, पाचोरा रोटरी क्लबचे सचिव डॉ. अजयसिंग परदेशी, रोटरी क्लब पाचोरा-भडगाव सदस्य डॉ. अमोल जाधव, डॉ. गोरख महाजन, डॉ. अतुल पाटील, डॉ. प्रशांत सांगडे, डॉ.कुणाल पाटील, डॉ. राहुल काटकर, डॉ. सिद्धांत तेली, रावसाहेब पाटील, डॉ. घनश्याम चौधरी, संजय कोतकर, डॉ. अंकुर झवर, डॉ. विशाल पाटील, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. पंकज शिंदे, डॉ.शिवाजी शिंदे, चिंतामण पाटील, नितीन जमदाडे, नितीन तायडे, शैलेश कुळकर्णी, पिंकी जिनोदिया, ज्ञानेश्वर पाचोळे यासोबत पाचोरा डॉक्टर्स असोसिएशन चेअरमन डॉ. जीवन पाटील, उपाध्यक्ष डॉ. विजय जाधव,सदस्य डॉ. नंदकिशोर पिंगळे, डॉ. प्रवीण माळी, डॉ. दीपक चौधरी, डॉ. दिनेश माळी, डॉ. वैभव सूर्यवंशी, डॉ. भूषण महाजन, डॉ. पंकज जाधव, डॉ. विजय पाटील, डॉ. गेडाम, डॉ.अनुप महालपुरे, डॉ. प्रतिभा तेली, चारू तेली, निर्मल इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य गणेश राजपूत, प्रा. माणिक पाटील आदी मान्यवर शिक्षक उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रताप पांडे, विजय ठाकूर, योगेश वाणी यांनी तर स्पर्धा समन्वयक म्हणून गिरीश पाटील, राजेंद्र पाटील, भावेश अहिरराव, सुशांत जाधव, कृष्णा साळुंखे, वाल्मिक पाटील, निवृत्ती तांदळे, स्वप्नील बागुल, अभिषेक भावसार, महेश रोकडे, समाधान पाटील, स्वप्नील माने, वासुदेव चव्हाण, राजेंद्र पिंपळसे यांनी काम पाहिले. कलाछंद आर्ट टीम यांनी रोटरीची या वर्षीची थीम यांची रांगोळी काढून वर्ल्ड रेकॉर्डसाठी पाठवली आहे. यातील मुख्य कलाकार शैलेश कुळकर्णी, सहकलाकार उन्नती पाटील, देवश्री कासार, स्वरा रानडे, वैष्णवी पाटील, श्रुती सोनकुळे, सत्यजीत पाटील, साई कोळी, ओमकार केंदळे, किर्तीकुमार सोनवणे, नीरज जोशी, ओम सोनकुळे, देवांगिनी मोकाशी, अमन कुमार शाह, विद्या कोतकर, डॉ. प्रतिभा तेली, पिंकी जिनोदिया, निधी नैनाव या सर्वांनी मिळून रांगोळी काढली. या रांगोळीभवती मानवी साखळी बनवून सर्वांनी युनाईट फॉर गुड असा एकतेचा संदेश यातून दिला.



### मुक्ताईनगरात क्रीडा स्पर्धा उत्साहात; ३१० शिक्षकांनी घेतला सहभाग

**मुक्ताईनगर** : तालुक्यात निमखेडी खुर्द येथे मैदानी स्पर्धा, संत मुक्ताई विद्यालयात बॅडमिंटन, डॉ. जगदीश पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन शिक्षण विभागामार्फत ७ नोव्हेंबर रोजी तालुक्यातील जिल्हा परिषद, खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये तालुक्यातील शिक्षक व महिला शिक्षकांनी अशा ३१० शिक्षकांनी सहभाग नोंदविला. तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी वसंत मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. नवीन माध्यमिक विद्यालय निमखेडी खुर्द येथे खो-खो, लांब उडी, गोळा फेक थाळीफेक, भालाफेक, १०० मीटर धावणे, संत मुक्ताबाई विद्यालयात बॅडमिंटन स्पर्धा तसेच डॉ. जगदीश पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये हॉलीबॉल या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये सर्व जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक अनुदानित शाळा व प्राथमिक शाळांमधील ३१० महिला व पुरुष शिक्षकांनी व अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी वि.अ.सुनील कोंगे ग. दी. पाटील, संजय ठोसर, केंद्र प्रमुख इरफान तडवी व विषय साधन व्यक्ती महेंद्र मालवेकर यांनी सहकार्य केले.




**काउंटडाउन**
**उरले फक्त २१ दिवस**

**गुद्दे नि गुदगुल्या**

नेते

निवडणूक एकत्रच लढवून म्हणे स्वबळही आजमाविणार आहेत

आणि वारंवार रंग बदलताना ते सरड्यालाही लाजविणार आहेत...

-भिला महाजन
९९२२४८४७११

## पावणे नऊ लाख मतदार ठरवणार ४६४ सदस्यांचे भाग्य

**जळगाव :** जिल्ह्यातील १६ नगरपरिषद आणि २ नगरपंचायती अशा १८ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज नामांकन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या नगरपालिका नगरपंचायतीच्या सुमारे पावणे नऊ लाखाहून अधिक मतदारांमधून ४६४ नगरसेवक, आणि १८ लोकनियुक्त नगराध्यक्ष निवडून दिले जाणार आहेत. जिल्ह्यात सार्वत्रिक निवडणूक होत असलेल्या भुसावळ, अमळनेर, चाळीसगाव, चोपडा, जामनेर, पाचोरा, यावल, नशिराबाद, वरणगाव, पारोळा, भडगाव, धरणगाव, सावदा, रावेर, एरंडोल, फैजपूर, शेंदूर्णी आणि मुक्ताईनगर अशा १८ नगरपरिषद नगरपंचायत क्षेत्रात ४ लाख ३८ हजार ९४८ महिला, ४ लाख ५० हजार ८९३८ पुरूष तसेच ८३ अन्य असे ८ लाख ८९ हजार ९१४ मतदार आहेत. यात अ वर्ग १, ब वर्ग गटात ५, क वर्ग गटात १० आणि २ नगर पंचायती आहेत.

जिल्ह्यात नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी ९७७ मतदान केंद्र आहेत. जिल्ह्यातील सर्वात जास्त १९१ मतदान केंद्र भुसावळ आणि चाळीसगाव येथे १०० आणि त्याखालोखाल अमळनेर येथे ९७ केंद्र आहेत. अन्य ठिकाणी ७४ ते सर्वात कमी २३ शेंदूर्णी नगरपंचायत परिसरात आहेत. एक सदस्य असलेल्या प्रभागातून ३४, व्दिसदस्यीय प्रभागातून २०६ आणि तीन सदस्यीय प्रभागातून ६ अशा २४६ प्रभागातून ४६४ सदस्य निवडून दिले जाणार आहेत.

## जातपडताळणी टोकन घेण्यासाठी धावपळ

**भुसावळ :** येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. राखीव जागेवर निवडणूक लढविणारे उमेदवार आज जातपडताळणी समितीकडे अर्ज दाखल करून टोकन प्राप्त करून घेण्यासाठी धावपळ करीत होते. यासाठी कागदपत्रे जमवाजमव करीत होते. परंतु प्रांत कार्यालयाते एकही अधिकारी संध्याकाळी चार वाजता हजर नव्हते.

## रावेर येथे मतदान केंद्रांची अधिकाऱ्यांकडून पाहणी

**रावेर :** येथील नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांची उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर, निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार बंडू कापसे यांनी संयुक्तपणे पाहणी केली. उमेदवारांना निवडणुकीविषयी सविस्तर माहिती मिळावी यासाठी नगरपालिका सभागृहात यंत्रणा उभारण्यात आली आहे. १२ प्रभागासाठी ३६ मतदान केंद्रे आहेत. यावेळी पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल, सहाय्यक निवडणूक अधिकारी सतीश पुडके उपस्थित होते. दरम्यान, पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. नगरपालिका सभागृहात उमेदवारांसाठी योग्य ती माहिती मिळावी यासाठी तसेच उमेदवारी अर्ज स्वीकारण्यासाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी सतीश पुडके यांच्यासह शासकीय कर्मचारी सज्ज होते. निवडणूक प्रक्रियेत कुठेही गोंधळ होऊ नये यासाठी पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# नशिराबादकरांच्या अपेक्षांचे ओझे; प्रथम नगराध्यक्षांपुढे आव्हान!

**सायसिंग पाडवी**
**नशिराबाद (जळगाव), १० नोव्हेंबर**

नव्याने स्थापन झालेल्या नशिराबाद नगरपरिषदेच्या पहिल्याच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. या ऐतिहासिक निवडणुकीकडे नागरिकांचे, तसेच राजकीय गटांचे सर्वांचेच लक्ष लागले असून, मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे.

नगरपरिषद स्थापनेनंतर होणाऱ्या या पहिल्या निवडणुकीत प्रत्येक राजकीय गटात उमेदवारीसाठी हालचालींना वेग आला आहे. उमेदवारी मिळविण्यासाठी स्थानिक नेत्यांमध्ये चढाओढ सुरू असून, प्रचाराची तयारीही जोमात सुरू आहे. मात्र, दुसरीकडे मतदार आपल्या पहिल्या नगराध्यक्षांकडून ठोस आणि दिसणारी कामगिरी होण्याची अपेक्षा बाळगून आहेत.




'निवडणूक रणधुमाळ-२०२५ तरुण भारत लाइव्ह आपल्या परिसरात' या उपक्रमांतर्गत रविवारी (९ नोव्हेंबर) नागरिकांच्या भावना जाणून घेण्यात आल्या. या वेळी पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, सामाजिक सुरक्षा आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांवर नागरिकांनी विशेष भर दिला.

या सर्व क्षेत्रांत ठोस बदल आणि विकासाची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे नशिराबादच्या पहिल्या नगराध्यक्षांवर नागरिकांच्या अपेक्षांचे मोठे ओझे आहे. त्या अपेक्षा प्रत्यक्षात कितपत पूर्ण होतात आणि नव्या नगरपरिषदेची दिशा नेमकी कोणती ठरणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राजकीय स्पर्धेला वेग

दरम्यान, विविध राजकीय पक्षांचे स्थानिक पदाधिकारी प्रचारासाठी रणनीती आखत आहेत. या पहिल्याच नगरपरिषद निवडणुकीत कोणता गट आपला ठसा उमटवतो आणि नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी कोणते पाऊल उचलले जाते, हे पाहणे आता उत्सुकतेचे ठरणार आहे.

# पती मंत्री; पत्नी नगराध्यक्ष; जोडप्यांची जोरदार दावेदारी

## भुसावळात चाचपणी सुरू : पत्नीला तिकीट देण्याची पक्षश्रेष्ठींकडे मागणी

**उत्तम काळे**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

नगर पालिका निवडणुकीचे नगारे वाजू लागल्याने शहरात राजकीय चर्चांना चांगलाच ऊत आला आहे. यंदाच्या निवडणुकीत केवळ वैयक्तिक नव्हे, तर 'जोडीने सत्ता मिळविण्याचा' काही इच्छुकांचा निर्धार दिसत आहे. 'बायको नगराध्यक्ष आणि मी नगरसेवक' अशी घोषणा देत जोडपी मतदारांमध्ये आपली ताकद अजमावणार आहेत.

काही जोडप्यांनी पक्षश्रेष्ठींकडेच दोघांना तिकीट मिळण्याची शक्यता तपासण्यास सुरुवात केली आहे. नगराध्यक्षपद मिळाले नाही तरी निदान नगरसेवकपदाचे तिकीट हातातून जाऊ नये, अशी तयारी सुरू आहे. या नव्या समीकरणांमुळे निवडणुकीचा रंग अधिकच गडद झाला आहे. मागील काही वर्षात महिला आरक्षणामुळे स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले; मात्र यावेळी काही जोडपी सरळपणे रणांगणात उतरून 'दोघे मिळून शहर घडवू' असा संदेश देत आहेत.

**मतदारांच्या भेटीगाठी सुरू**

नगरपरिषदेमध्ये महिला मतदारांची लक्षणीय संख्या असल्याने महिलांना राजकारणात सक्रिय संधी मिळावी, शहर आणि प्रभाग विकासाला गती मिळावी, असे सांगत इच्छुक महिला उमेदवार मतदारांशी संवाद साधत आहेत. दरम्यान, मतदारांमध्ये ही 'दोन माणसे एकाच घरातून' दावेदारीबाबत उत्सुकता व संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.



**भुसावळ वार्तापत्र**

**नगराध्यक्ष पद एससी महिलेसाठी राखीव**

भुसावळ नगराध्यक्षपद अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव असल्याने वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी अद्याप त्यांच्या पत्नीला निवडणूक रिंगणात उतरण्यासंदर्भात कोणतेही वक्तव्य केले नाही. मात्र त्यांच्या पत्नीचे नाव नगराध्यक्षपदाच्या दावेदार म्हणून भाजपकडून पुढे आले आहे. सावकारे मंत्री तर नगराध्यक्षपदासाठी पत्नी असे समीकरण समोर आले आहे. दरम्यान या विषयावर माजी मंत्री एकनाथराव खडसे व माजी आमदार संतोष चौधरी यांनी टीका केल्यानंतर ना. सावकारे यांनी या उमेदवारीला नकार न देता त्यांच्यावर टीका करून उत्तर दिले आहे.

**पत्नी नगराध्यक्ष तर पती नगरसेवक पदाचे उमेदवार हे समीकरणही प्रचारात दिसणार**

दरम्यान, 'सावकारे मंत्री तर, पत्नी नगराध्यक्ष' या समीकरणानंतर शहरात आर.पी.आय.चे ज्येष्ठ कार्यकर्ते राजू सूर्यवंशी यांनीही त्यांच्या पत्नी पूजा राजू सूर्यवंशी यांना नगराध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून रिंगणात उतरवण्याची घोषणा केली आहे. या समीकरणांमध्येही सूर्यवंशी यांच्या पत्नी 'पूजा सूर्यवंशी नगराध्यक्ष तर राजू सूर्यवंशी नगरसेवक' असे दुसरे समीकरण समोर येणार आहे. त्याचप्रमाणे आरपीआय (आठवले गट) उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रमेश मकासरे यांच्या परिवारातही पुन्हा दोन उमेदवार निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यांची पत्नी लक्ष्मी रमेश मकासरे या एका वार्डातून तर मकासरे यांची मुलगी सविता प्रशांत अहिरे (सविता रमेश मकासरे) असे दोन्ही उमेदवार पुन्हा वेगवेगळ्या वार्डातून आरपीआय - भाजप युतीकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीतही हे दोन्ही उमेदवार निवडून आले होते.

**वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांची भूमिका ठळकपणे दिसणार?**

नगराध्यक्षपद हे महिला अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित असल्यामुळे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे ह्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार म्हणून रिंगणात उतरणार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी सावकारे यांना मंत्री म्हणूनच नव्हे तर पती म्हणूनही प्रचारात उतरावे लागणार आहे. तर त्यांना आव्हान देण्यासाठी राज्याचे माजी ज्येष्ठ मंत्री आमदार खडसे व माजी आमदार चौधरी हेही काय भूमिका बजावतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### पहिल्या रविवारी शिवसेनेत प्रवेश, तर दुसऱ्या रविवारी भाजप उमेदवारीसाठी रांगेत

■ येथील माजी नगराध्यक्षा माधुरी फालक यांनी गेल्या रविवारी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी त्यांचे स्वागत करून आगामी निवडणुकीसाठी त्यांना उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते. मात्र दुसऱ्याच रविवारी माजी नगराध्यक्षा माधुरी फालक यांनी शिवसेना (शिंदे गटाचा) राजीनामा न देताच व भाजपात प्रवेश न करताच सरळ भाजपची उमेदवारी दाखल करण्यासाठी भाजपकडे मुलाखतीसाठी दाखल झाल्या व त्यांनी शिवसेना (शिंदे गटाला) चांगलाच धक्का दिला. भाजपकडून त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. शिवसेना (शिंदे गट) भाजपवर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतानाच भाजपने त्यांना जोरदार धक्का दिला आहे. त्यामुळे याचा युतीवर परिणाम होणार का? याकडे आता नागरिकांचे लक्ष लागून आहे.

# यादवराया राणी रूसून बसली कैसी...!

**विक्रम वेताळ**



नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले आहे. कोठे काय चालले, कुणाची काय तयारी हे पहाण्यासाठी राजा विक्रमाने फेरफटका मारण्याचा निर्णय घेतला... विविध ठिकाणी जाताना वेताळ त्याच्या मानगुटीवर होताच...

फिरता, फिरता ही जोडी चाळीसगावी पोहोचली... आमदार मंगेशदादांची भव्य-दिव्य कामे पाहून राजा विक्रमही अवाक झाला.. छत्रपती शिवाजी महाराज चौक मैदान परिसरात ही जोडगोळी आली आणि सुरू झाल्या प्रश्नांच्या फैरी...

**वेताळ :** राजन काय भव्य कामे आहेत हो येथे... आमदार साहेब यावेळी कुणाला संधी देतील नगराध्यक्षपदासाठी... काय वाटते तुम्हाला...?

**विक्रम :** बघ भो तळं राखणार तोच पाणी.. अशी एक म्हण आहे.. जर कामे मंगेशदादांनी केली असतील तर तर तेच ठरवतील ना उमेदवारी कुणाला द्यायची... आणि येथे भाजपचाच बोलबाला दिसतो आहे.

**वेताळ :** अरे पण कोण असू शकतो उमेदवार काय वाटते तुम्हाला?

विक्रम : मला तर वाटतंय भो की प्रतिभाताईंनाच मिळेल उमेदवारी.. कारण त्याही सवाई आहेत हं... शिवनेरी फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी एक विकास पर्व सुरू केलेलं दिसतंय... महिला बचत गट असो की मंडळे यासह अडचणीतील व्यक्तीला याच माध्यमातून मदत होत असते. त्यामुळे मला तरी वाटते त्यांना उमेदवारी मिळेल...

**वेताळ :** अन् नाही मिळाली तर काय होईल?

**विक्रम :** बघ विजयाची गणिते, स्पर्धेत कोण असू शकेल... कोणत्या घराण्याचा प्रभाव आहे काय? या सर्व गोष्टींचा विचार येथे होईलच होईल. अन् नाही मिळाले तरी दादांचा विकास रथ हा चालूच राहील असेच वाटते. तू ना काही तरी खुस्पट सुरू ठेवतो भो...!

**वेताळ :** विरोधात कोण असेल असे वाटते तुला?

**विक्रम :** पद्मजा राजीव देशमुख, संपदा उन्मेष पाटील यांच्यापैकी कोणी तरी एक असेल असे वाटते. बघू घोडा मैदान आहेच समोर... या आठवड्यात सारे चित्र स्पष्ट होईल असे वाटते.

**वेताळ :** उन्मेषरावांची खुमखुमी आहेच अद्याप... मागे जोरदार धोबिपछाड मिळाला तरी?

**विक्रम :** अरे म्हणतात ना... राजकारण्यांना खुमखुमी असतेच आणि त्या ताईंचीही खूप इच्छा आहे असे म्हणतात.. तुला ते भुलाबाईचे गाणे आठवते काय? 'यादव राया, राणी रूसून बसली कैसी' (यावर दोघे जोरात हसतात) घरचा रूसवा शांत करावाच लागतो.. उन्मेषराव करणार काय? आजमावून बघू अशा विचारात दिसताय ते.

दोघे नंतर पाचोऱ्याच्या दिशेने मार्गक्रमण सुरू करतात आणि तेथे पोहोचल्यावर परत प्रश्नोत्तरे सुरू होतात.

**वेताळ :** राजन येथेही आमदार कुटुंब जोरात दिसतंय.. पण काही जणांचा विरोध आहे म्हणे?

**विक्रम :** येथे सुनीताताईंची तयारी सुरू झाली आहे.. आमदार किशोरआप्पाकडून फिल्डिंग लावली जात आहे म्हणे... भाजपाकडून सुचेताताई दिलीप वाघ यांचीही तयारी दिसते आहे. माजी व विद्यमान आमदारांची लढत दिसेल असे वाटते येथे..

**वेताळ :** थोडक्यात आपला गड कायम ठेवायचा असेच प्रयत्न दिसतात या परिसरात खरंय ना?

**विक्रम :** हो तुला मघाच 'तळ्याची' म्हण सांगितली... आणि 'सौ' पण खूश राहायला पाहिजे ना... सर्वत्र हीच परंपरा आहे भो... तुला ते उदाहरण माहीत आहे ना... काका-पुतण्याचे... शरदरावांनी निवृत्ती घ्यावी असे पुतण्या अजितदादांनी सांगितले पण त्यांच्या पदरी काय आले? शेवटी बाहेर पडावे लागले ना...! हाव मोठी वाईट असते... परिणामी काका-पुतण्याचे वाद तू पहातोच.. 'काका मला वाचवा' म्हणायचीही सोय राहिली नाही आता...चल पुढे जाऊ बाबा...असे म्हणच दोघांचा पुढील प्रवास सुरू होतो...!

**- चंद्रशेखर जे.**

# नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात ३ हजार मतदान यंत्रे

## ९७७ केंद्रांवर पाच हजाराहून अधिक कर्मचारी तैनात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

जिल्ह्यात १८ नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात ९७७ मतदान केंद्रांवर प्रत्येकी ५ याप्रमाणे ४ हजार ८८५ अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त आहेत. नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रात ९७७ मतदान केंद्रांवर १२९० मतदान मशिन बॅलट युनिट आणि नियंत्रण मशिन कंट्रोल युनिट राखीव मशिनसह उपयोगात येणार आहेत.

सार्वत्रिक निवडणूकीसाठी पोलीस महसूल, तसेच अन्य ७८ चिभाग यात कार्यरत आहेत. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हिजीलन्स,



एमसीएमसी, आदि समिती गठीत आहेत. सार्वत्रिक निवडणूकीसाठी नियुक्त करण्यात आलेले ४८८५ अधिकारी आणि कर्मचारी तसेच याव्यतिरिक्त २० टक्के म्हणजेच ९७७ मनुष्यबळ राखीव ठेवण्यात आले आहेत.

| नगरपरिषद | मतदान केंद्र | मतदान मशीन | नियंत्रण मशीन |
|---|---|---|---|
| भुसावळ | १९१ | २२५ | ४५० |
| यावल | ३७ | ५० | १३० |
| रावेर | ३६ | ४२ | ११८ |
| सावदा | २४ | ३३ | ७५ |
| फैजपूर | ३० | ४५ | १२० |
| चोपडा | ७४ | ८४ | १७० |
| अमळनेर | ९७ | १२५ | २५० |
| एरंडोल | ३८ | ५० | १०० |
| धरणगाव | ३५ | ५० | १०० |
| पारोळा | ४२ | ६० | ११० |
| चाळीसगाव | १०० | १४० | ३६० |
| भडगाव | ४३ | ५५ | ११० |
| पाचोरा | ६३ | ८० | २४० |
| जामनेर | ५३ | ७५ | १५० |
| मुक्ताईनगर | २८ | ६५ | ६५ |
| शेदूर्णी | २३ | ३० | ३० |
| वरणगाव | ३१ | ३५ | ७५ |
| नशिराबाद | ३२ | ४५ | ९० |
| एकूण | ९७७ | १२९० | २७४३ |

# जिल्ह्यातील १८ पालिकांसाठी ३६ अधिकारी नियुक्त

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीची प्रशासनाकडून पूर्वतयारी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

जळगाव जिल्ह्यात १४ नगरपरिषदांसह ४ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक अधिकारी अशा ३६ अधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी तसेच तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांच्या नियुक्त्या झाल्या आहेत.

जिल्ह्यात १९ नगरपरिषद आणि ५ नगरपंचायती कार्यरत आहेत. त्यापैकी बोदवड नगरपंचायत वगळता १४ नगरपरिषद व ४ नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहिर झाला आहे. नगरपरिषद नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी मंगळवार २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ रोजी मतमोजणी केली जाणार असून या सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर ३६ निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यात नियुक्त अधिकारी निवडणुकीदरम्यान शासकीय मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत फलन करण्याचे आदेशात नमूद केले आहे.

जिल्ह्यात नगरपरिषद नगरपंचायतींसाठी सोमवार १० नोव्हेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू होत आहे. यात १० ते १७ उमेदवारी अर्ज दाखल करणे, मंगळवार १८ नोव्हेंबर दाखल उमेदवारी अर्जांची छाननी, तर मंगळवार २५ नोव्हेंबर रोजी उमेदवारी माघारी अंतिम मुदत व त्यानंतर मंगळवार २ डिसेंबर रोजी मतदान आणि बुधवार ३ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

नगरपरिषद नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक मतदान मंगळवार २ डिसेंबर रोजी असून आचारसंहितेनुसार मतदान प्रचार रविवार ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळनंतर बंद करावा लागणार आहे. परंतु सभा आणि मोर्चासाठी मात्र रात्री १० वाजेपर्यंतच परवानगी राहणार आहे.

**नगरपरिषदनिहाय नियुक्त अधिकारी**

| नगरपरिषद | निवडणूक निर्णय अधिकारी | सहाय्यक निवडणूक अधिकारी |
|---|---|---|
| भुसावळ | प्रांताधिकारी जितेंद्र पाटील | मुख्याधिकारी राजेंद्र फातले |
| यावल | तहसीलदार मोहनमाला नाझिरकर | मुख्याधिकारी निशिकांत गवई |
| रावेर | तहसीलदार बंडू कापसे | मुख्याधिकारी संदीप पुदाके |
| सावदा | प्रांत बबन काकडे | मुख्याधिकारी भूषण वर्मा |
| फैजपूर | तहसीलदार नीता लबडे | मुख्याधिकारी अविनाश गांगोडे |
| चोपडा | प्रांत मनीषकुमार गायकवाड | मुख्याधिकारी रामनिवास झंवर |
| अमळनेर | उपजिल्हाधिकारी निवृत्ती गायकवाड | मुख्याधिकारी गणेश शिंदे |
| एरंडोल | तहसीलदार प्रदीप पाटील | मुख्याधिकारी अमोल बागुल |
| धरणगाव | तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी | नायब तहसीलदार लक्ष्मण सातपूते |
| पारोळा | तहसीलदार उल्हास देवरे | नायब तहसीलदार अमोल पाटील |
| चाळीसगाव | प्रांत प्रमोद हिले | मुख्याधिकारी राजेंद्र फातले |
| भडगाव | तहसीलदार शितल सोलट | नायब तहसीलदार अनिल भामरे |
| पाचोरा | उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे | मुख्याधिकारी मंगेश देवरे |
| जामनेर | प्रांत विनय गोसावी | मुख्याधिकारी विनय बागुल |
| मुक्ताईनगर | तहसीलदार गिरीश वखारे | मुख्याधिकारी सुभाष जानोरे |
| शेदूर्णी | तहसीलदार नानासाहेब आगळे | मुख्याधिकारी विवेक धांडे |
| वरणगाव | तहसीलदार अनिल पुरे | मुख्याधिकारी सचिन राऊत |
| नशिराबाद | तहसीलदार डॉ. शीतल राजपूत | नायब तहसीलदार डॉ.राहूल वाघ |



# 'राजकारणात अंधश्रद्धेचा मुहूर्त!

## नशिराबादेत उमेदवार शुभवेळा शोधत असताना मतदार म्हणतात 'काम हाच खरा शुभमुहूर्त!'

**सुनील महाजन**
**नशिराबाद (ता. जळगाव), १० नोव्हेंबर**

नशिराबाद नगरपरिषदेच्या निवडणुकीचा जल्लोष रंगात आला आहे. गल्लीबोळात प्रचाराचे डोल, ढोल आणि गारुड सुरू झाले आहे. पण या सगळ्या राजकीय गडबडीत काही उमेदवारांनी वेगळाच मार्ग धरला आहे विकासाचा नव्हे, तर अंधश्रद्धेचा!



कोणी उमेदवार सकाळी सूर्योदयाच्या वेळीच घराबाहेर पडतो, तर कोणी खास जप करून मगच प्रचारात उतरतो. काहींनी तर हातात लाल-पिवळे धागे बांधले आहेत, कुणी गळ्यात ताईत घातलेत, तर कुणी मतदारसंघाच्या चारही दिशांना नारळ फोडून 'शुभ' सुरुवात केली आहे. काही उमेदवार तर ज्योतिषांकडून 'विजयाचा मुहूर्त' शोधण्यातच व्यस्त आहेत.

दरम्यान, या अंधश्रद्धाळू राजकीय कसरतींकडे मतदार मात्र हसत आहेत. बाजारात, चहाच्या टपऱ्यांवर आणि वाडी-गावात चर्चा सुरू आहे ''धागे-दोरे बांधून काय फायदा? लोकांना काम दाखवा, विकास दाखवा, हाच खरा शुभमुहूर्त आहे!''

स्थानिक युवक म्हणतात, 'रस्ते गचाळ, पाणी अनियमित आणि दिवे बंद या सगळ्या समस्या सोडवण्याचा मुहूर्त अजून आला नाही का?' तर काही ज्येष्ठ नागरिकांचं मत, 'पूर्वीचे लोक काम करून आशीर्वाद मिळवायचे, आजचे उमेदवार तारखा आणि ताईत शोधतात.'

मतदारांच्या या प्रतिक्रियांमुळे एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली आहे. जनता आता अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकणारी नाही. त्यांना विकास हवा, स्वच्छता हवी, रस्ते-पाणी आणि शिक्षण हवं. ज्याने हे दिलं, तोच खरा भाग्यवान उमेदवार ठरणार.

निवडणुकीचं मैदान गरम झालं असलं तरी मतदारांनी आता आपला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे 'काम करा, जनतेचं मन जिंका... बाकी ताईत, मुहूर्त आणि धागे-दोरे निवडणुकीनंतर काढून टाका!'






## महत्त्वाचे

### विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा विद्यापीठातर्फे सुरू

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या हिवाळी - २०२५ च्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना दिलेल्या वेळापत्रकानुसार आणि निश्चित केलेल्या विविध परीक्षा केंद्रात सोमवारपासून (१० नोव्हेंबर) सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर प्रविष्ट होण्याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी आवाहन केले आहे.

### रोटरी जळगाव इलाइटतर्फे अभय उजागरेंचे व्याख्यान

**जळगाव** : येथील रोटरी क्लब जळगाव इलाइटतर्फे गणपतीनगर भागातील रोटरी सभागृहात वन अभ्यासक अभय उजागरे यांचे 'भारताचा वन्य वारसा' या विषयावर व्याख्यान झाले. व्यासपीठावर अध्यक्ष संदीप झंवर, मानद सचिव हरगोविंद मणियार यांची प्रमुख उपस्थिती होती. उजागरे यांनी भारतातल्या विविध प्रांतातील प्राणी जगताची माहिती दिली. त्यांचा परिचय एम. बी. झंवर यांनी करून दिला. संजय तपारिया यांनी आभार मानले. कार्यक्रमास रोटरी इलाइटच्या ४० सदस्यांची उपस्थिती होती.

### द्वारकाधीश जोशी याचां शोधनिबंध सादर



**जळगाव** : येथील रावसाहेब रूपचंद विद्यालयातील शिक्षक द्वारकाधीश दिगंबर जोशी यांनी एमजीएम विद्यापीठातर्फे छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केला आहे. 'पाली: जन-जन की बोली' या विषयावर नुकतेच परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. द्वारकाधीश जोशी यांनी या परिषदेत 'पाली एक पवित्र भाषा' या विषयावर शोधनिबंध सादर केला. ते चिमुकले राम मंदिराचे गादीपती दादा महाराज जोशी यांचे सुपुत्र आहेत.

### रस्ता अपघातात सात जण जखमी

**जळगाव** : रस्ता अपघाताच्या वेगवेगळ्या घटनेत सोमवारी (१० नोव्हेबर) सात जण जखमी झाले. त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोनु दीपक मोरे (वय १६) सिध्दार्थ विलास सपकाळे (वय १७,रा.चिंचोली), किशोर आनंदा चंदणसे (वय २६,रा.भारुडखेडा), भावेश संदीप साळुंखे (वय १६,रा.यावल), पुनम देविदास गोपाळ (वय ३०,रा.जळगाव), राजाराम रामदास विश्वकर्मा (वय ५६,रा. दत्तकॉलनी),मिलिंद संतोष सोनवणे (वय ३०,रा.जळगाव) यांचा जखमीमध्ये समावेश आहे. जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

### सर्पदंश होऊन चार जण अत्यवस्थ

**जळगाव** : वेगवेगळ्या ठिकाणी सर्पदंश होऊन चार जण अत्यवस्थ झाले. सोमवारी ( १० नोव्हेबर) रोजी बाधितांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मिराबाई गुलाब भिल (वय ३४,रा.बाम्हणे), मनोहर रघुनाथ पाटील (वय ५५ रा.भोद), सुभाष दशरथ कोळी (वय ४५,रा.नशिराबाद) तसेच पूनम ललीत बाविस्कर (वय ३०,रा. नाचणखेडा) यांचा बाधितांमध्ये समावेश आहे.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७)
२२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५०
९६२३६०४७१२

# जिल्ह्यात थंडीची जोरदार लाट

## तापमानाचा पारा पहाटे ८, दुपारनंतर १५ अंशावर



**जळगाव** : राज्यासह जिल्ह्यात विशेषत: उत्तर महाराष्ट्रात तापमानात बरीच घसरण झाली आहे. गेल्या दोन तीन दिवसापासून तापमान कमाल २८ तर किमान ८ ते १० अंश पर्यंत नोंद झाली आहे. जळगाव जिल्हावासियांना पहाटेच्या सुमारास थंडीच्या गारठ्यासह धुक्याचा थर जाणवत आहे.

जिल्ह्यात यंदा परतीच्या पावसाचा मुक्काम बराच वेळ लांबला होता. आक्टोबर अखेर पावसाने काढता पाय घेतल्यानंतर उत्तर महाराष्ट्रामध्ये नोव्हेंबरच्या पहिल्या सप्ताहापासून गुलाबी थंडीचे हळूवारपणे आगमन झाले आहे. दोन दिवसापासून अचानक वातावरणात गारठा वाढण्यासह पहाटेच्या वेळी धुकेयुक्त वातावरण असून किमान तापमानात घट झाली आहे. सोमवारी पहाटे ८ ते दहा अंश तर दुपारच्या वेळी कमाल तापमान १२ ते १४ अंश तर किमान तापमान २४ ते २९ अंशावर असल्याने दिवसभरात गारठा जाणवत असल्याचे दिसून आले आहे.

वातावरणात झालेल्या बदलामुळे नागरिकांच्या आरोग्यावर देखील परिणाम झाला असून सर्दि डोकेदुखीसारख्या व्हायरल फिव्हरचे रूग्णांच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. यात लहान मुलांची प्रतिकारक्षमता कमी असल्याने वरचेवर आजारी पडण्याचे प्रमाण देखील वाढत आहे.

एकीकडे नेहमी दिवाळीदरम्यान जाणवणारा वातावरणातील गारवा उशीराने दाखल होत पहाटेपासूनच जिल्हा परिसरात गारठा जाणवू लागला आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमुळे तापमान वाढत आहे. आगामी २४ तासांमध्ये वातावरणात गारठा वाढण्याची शक्यता असली, तरी तापमान कमाल ३० तर किमान १२ ते १५ अंशादरम्यान तर वातावरणात आर्द्रतेचे प्रमाण ३४ टक्के असल्याचे हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे. यासोबतच आगामी सप्ताहाच्या सुरुवातीपासूनच गारठायुक्त वातावरण राहणार असल्याचेही हवामान अभ्यासकांचे मत आहे.



# जामनेरातील राजकुमार कावडिया यांच्या अकस्मात मृत्यूने खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेबर**

जामनेर येथील प्रतिष्ठित व्यापारी तसेच प्रकाशचंद्र जैन बहुउद्देशीय संस्थेचे चेअरमन राजकुमार प्रकाशचंद कावडिया (वय ५७) यांचा सोमवारी (१० नोव्हेंबर ) जळगावात मृत्यू झाल्याने खळबळ उडाली. त्यांनी विष घेतल्याची चर्चा होती. मात्र त्यास कुटुंब,नातेवाईक यांच्याकडून दुजोरा मिळाला नाही. विषप्राशनातून त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांकडून कळाले, त्यानुसार तपास सुरु असल्याचे पोनि. बबन आव्हाड यांच्याकडून सांगण्यात आले. त्यांच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे.

मेहरुण तलाव परिसरात मॉर्निंग वॉकला गेले असता ते आज सकाळी अस्वस्थ झाले होते. ह्रदयविकारच्या धक्क्यात त्यांचा मृत्यू झाला,असे नातेवाईकांडून सांगण्यात आले. ही वार्ता कळताच जामनेर तसेच जळगाव येथील नातेवाईकांसह व्यापाऱ्यांनी आर्किड हॉस्पिटलमध्ये धाव घेतली.



कुटुंबियांच्या माहितीनुसार, त्यांची विवाहित मुलगी तसेच जावई मेहरुण तलाव परिसरात वास्तव्याला आहेत. राजकुमार कावडिया हे या मुलीच्या घरी आलेले होते. रात्री ते अस्वस्थ दिसले होते. आज सकाळी मेहरुण तलाव परिसरात मॉर्निंग वॉकला गेले. तेव्हा त्यांना घाम आला.व अस्वस्थ वाटु लागले. हा प्रकार राजकुमार कावडिया यांच्या मित्राच्या लक्षात येताच त्यांनी त्यांच्या मुलीला फोन करुन घटनास्थळी बोलविले. मुलीने तिच्या वडिलांना आर्किड हॉस्पिटलमध्ये नेले. अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू होते. दरम्यान ही घटना कळताच जामनेर व जळगाव येथील नातेवाईकांसह स्नेहीजनांनी धाव घेत त्यांच्या प्रकृतीची माहिती जाणुन घेण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्यावर डॉक्टरांनी उपचार सुरु केले मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळु शकला नाही. त्यांच्या मृत्यूची वार्ता कळताच हॉस्पिटलमध्ये असलेल्या त्यांच्या पत्नी, मुलगा, मुलगी आणि नातेवाईकांना जबर धक्का बसुन रडु कोसळले. पतीविरहातून त्यांच्या पत्नीची हॉस्पिटलमध्येच प्रकृती अत्यवस्थ झाली. नातेवाईक महिलांनी त्यांना धीर देत त्यांचे सात्वंन केले. त्यांच्या अकस्मात मृत्यूच्या घटनेचा अनेकांना शॉक बसला. त्यांचे सर्वांशी स्नेहाचे संबंध होते. त्यांचा जनसंपर्कही मोठा होता. त्यामुळे त्यांचा सर्वदुर परिचय होता. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावई असा परिवार आहे.

दरम्यान, पळासखेडा बुद्रुक (ता. जामनेर) शिवारात प्रकाशचंद जैन संस्थेचे आयुर्वेदिक फिजिओथेरपी व होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची परवानगी रद्द करण्यात आली होती. अतिक्रमण जागेवर महाविद्यालयाची इमारत असल्याचा प्रशासनाचे आक्षेप घेत ती मंगळवारी पाडण्यात येणार होती.

> राजकुमार कावडिया हे सकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास आर्किड हॉस्पिटलमध्ये आले. त्यांच्या सोबतच्या व्यक्तीने त्यांनी विषप्राशन केले,असे सांगितले. त्यांना डॉ.पोटे यांनी तपासले. त्यानंतर अतिदक्षता विभागात ॲडमिट करुन त्यांच्यावर उपचार सुरु केले. मी विष घेतले,असे कोणाला काही सांगणार नाही, असे ते बोलले. त्यांना व्हेटींलेटरवर ठेवले होते. त्यानंतर सीपीआर सुरु केला. त्यांच्यावर उपचारार्थ शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मात्र ८.५७ वाजेच्या सुमारास त्यांचे ह्रदय बंद पडले.
>
> **-डॉ.प्रशांत बोरोले, ऑर्किड हॉस्पिटल**

> **विषप्राशन वाटत नाही**
>
> रात्री ते अस्वस्थ दिसले. म्हणून आज सकाळी त्यांना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. रात्री त्यांना घाम वाटला. तसेच त्यांच्यात बैचेनी होती. शैक्षणिक संस्थेच्या संचालक मंडळावर ते होते. संस्थेचा थोडा विषय आहे. त्या टेन्शनचा भाग आहे. मात्र लोकांकडून घेणे पैशांचा परतावा येत नव्हत. म्हणून ते तणावात होते. विषप्राशन या म्हणण्यात तथ्य वाटत नाही. त्यांना स्ट्रोक आला होता. त्यांनुसार त्यांच्यावर आर्किडमध्ये उपचार सुरू होते. मृत्यूचे नमके कारण वैद्यकीय रिपोर्टमधुन येईल.
>
> **-तन्मय भंडारी (राजकुमार कावडिया यांचे जावई)**

# दगडफेक प्रकरणी दोन्ही गटातील लोकांवर दंगलीचा गुन्हा

**जळगाव** : क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन तांबापुरात दोन गटात हाणामारी होऊन तुफान दगडफेक केली होती. याप्रकरणी दोन्ही गटातील ३० हून अधिक लोकांवर दंगा केल्याचा गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.

कॉन्स्टेबल किरण पाटील यांच्या तक्रारीनुसार क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन दोन गटातील संशयितांसह अन्य लोकांनी रविवारी ( ९ नोव्हेबर ) दुपारी तांबापुऱ्यातील गवळीवाडा परिसरात एकमेकांमध्ये लाकडी दांडके हातात घेत मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर दगडफेक करत मारामारी केली. मोठमोठ्या दगड-विटा एकमेकांवर फेकुन दुखापत केली. तसेच सार्वजनिक शांतता भंग करुन बेकायदेशीर जमाव केला. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

याप्रकरणी राकेश हटकर, युवराज गवळी, गोलु हटकर, डोळ्या राकेश हटकरचा भाऊ, दादा हटकर यांचे दोन मुले, सोबत सद्दाम खाटीक, बाबा काल्या, इम्रान भुऱ्या लेपटी, गोल्या उर्फ मुतरा सद्दाम, जावेद , शेख जुनेद शेख, शाहीद, अशपाक बॅटरीवाल्याचा मुलगा तसेच अनोळखी इसम (सर्व रा. तांबापुरा परिसर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या गटातील शेख अशपाक शेख अमीर (वय ३०,रा. तांबापुरा) याच्या तक्रारीनुसार क्रिकेट खेळण्याच्या कारणातून रविवारी (९ नोव्हेबर) दुपारी तांबापुरातील टिपु सुलतान चौक याठिकाणी आठ ते नऊ जणांनी गैरमंडळी शस्त्रासह सज्ज झाली. सिध्दीकी शेख यांच्या सोबत क्रिकेट खेळण्यातून भांडण करुन वाद घातला. हा वाद सोडविण्यासाठी खालीद बागवान गेला असता त्याच्या डोक्यात हातातील कडे मारुन जखमी केले. त्यानंतर टिपु सुलतान चौकात दगडफेक करत दहशत निर्माण केली. शेख अशपाक याच्या घरात जबरदस्तीने घुसुन त्यांना रॉड मारुन दुखापत केली.

या तक्रारीनुसार टोम्या गवळी, गोल्या हटकर, वास्तव हटकर, राणा यांचा मुलगा, राहुल गवळी, नाना गवळी, रितीक गवळी, कमल्या गवळी, दीपक हटकर (रा.मोहाडी) व इतर चार ते पाच जणांवर दंगा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अशोक काळे हे तपास करीत आहेत.

# महापालिकेची आज प्रभागनिहाय आरक्षण सोडत

## ७५ पैकी २९ जागांचे प्रारूप आरक्षण निघणार

> **एकूण सदस्य संख्या व आरक्षण असे (कंसात महिला आरक्षित जागा)**
>
> - **एकूण सदस्य :- ७५**
> - **अनुसूचित जाती :- ५ (महिला आरक्षण- ३)**
> - **अनुसूचित जमाती :- ४ (महिला - २)**
> - **नागरिकांचा मागास प्रवर्ग :- २० (महिला - १)**
> - **खुला प्रवर्ग :- ४६ (महिला - २३)**





आरक्षण सोडतीची रंगीत तालीम करतांना आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे.

**जळगाव** : महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण सोडत मंगळवारी ११ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाणार आहे. या प्रारूप आरक्षण सोडतीवर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती घेता येणार आहे. त्यानंतर अंतीम आरक्षण जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

नगरपालिकांपाठोपाठ महापालिकेच्याही सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. प्रभाग रचना अंतीम झाल्यानंतर आता प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार मंगळवारी ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर प्रारूप आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीसाठी आयुक्त तथा प्रशासक ज्ञानेश्वर ढेरे, अतिरीक्त आयुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त निर्मला पेखळे, धनश्री शिंदे यांच्यासह अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

**अशी राहिली प्रक्रिया**

प्रारूप प्रभागनिहाय आरक्षण सोडतीला ११ वाजता सुरूवात होणार आहे. महापालिकेच्या १९ प्रभागांमधील ७५ सदस्यांपैकी २९ जागांची आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. उर्वरीत ४६ जागा ह्या खुल्या प्रवर्गासाठी निश्चीत करण्यात आल्या आहे. तसेच यामध्ये ७५ पैकी ३८ जागा ह्या महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या ३८ महिला राखीव जागांमध्येही आरक्षण काढण्यात येणार आहे.

> **आरक्षण सोडतीतील ठळक मुद्दे**
>
> - तीन सदस्यांच्या प्रभाग क्र. १८ मध्ये दोन महिला द्यावयाच्या आहेत व अनुसूचित जमातीची जागा महिला आरक्षित न झाल्यास, नामाप्रची जागा थेट महिलांकरीता आरक्षित होईल.
> - अनुसूचित जातीच्या महिलांची सोडत अनुसूचित जातीकरीता आरक्षित जागांमधून काढण्यात येईल.
> - अनुसूचित जमातीच्या महिलांची सोडत अनुसूचित जमातीकरीता आरक्षित जागांमधून काढण्यात येईल.
> - नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या एकूण २० जागांपैकी १९ जागांचे प्रभागनिहाय वाटप करण्यात आले असून उर्वरित १ जागा सोडतीने देताना 'डी' असे नमूद केलेल्या प्रभागामधून कोणत्याही एका प्रभागाकरीता देय होईल.
> - ज्या प्रभागात ना.मा.प्र. च्या दोन जागा राखीव होतील त्या प्रभागामधील एक जागा ना.मा.प्र. महिलांकरीता थेट राखून ठेवण्यात येईल.
> - ज्या प्रभागात अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीची जागा आहे, मात्र ती जागा महिलांकरीता आरक्षित झालेली नाही अशा प्रभागातील ना.मा.प्र. ची जागा थेट ना.मा.प्र. महिला होईल.
> - ना.मा.प्र. महिलांकरीता राखून ठेवावयाच्या उर्वरित जागा सोडतीने नियम ६ मधील तरतुदी विचारात घेऊन निश्चित करण्यात येतील.
> - सर्वसाधारण महिलांच्या जागा निश्चित करण्याकरीता सोडत काढण्याची आवश्यकता नाही, या जागा केवळ नियम क्र. ६ (१) मध्ये नमूद केलेले महिलांचे प्रमाण पूर्ण करण्याकरीता आवश्यक असलेल्या संख्येइतक्या जागा त्या त्या प्रभागात वाटप करून देण्यात येतील.

# गॅंगवारने शहरात काढले डोके वर; वर्दीचा संपला धाक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१० नोव्हेबर**

गावठी कट्टा, कोयत्याच्या जोरावर गॅंगवारने शहरात डोके वर काढले आहे. रविवारी रात्री गोळीबारातून आकाश उर्फ टपऱ्या युवराज बाविस्कर याचा मृत्यू झाला. तिघे गंभीररित्या जखमी झाले आहेत. तिघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हद्दपार केलेल्या संशयित सराईतपणे शहरात वावरत असुन त्यामुळे टोळींमध्ये कुठे चकमकी तर कुठे शस्त्राने वार केला जात आहे. पोलिसांचा धाक संपल्याने गुन्हेगारांना रान मोकळे, अशी भावना सुज्ञ नागरिकांमध्ये उमटली आहे.

किरकोळ कारण, जुना वाद, काहीतरी भांडणाला निमित्त अशा वेगवेगळ्या कारणांमधून घटनेला मोठे स्वरुप देण्याचे प्रकार वारंवार शहरात घडत आहे. गुन्हेगारांच्या टोळ्या आमनेसामने येत जीवघेणा हल्ला करु लागलेत. काही घटनांमध्ये निरपराध व्यक्तींना इजा अथवा प्राणावर संकट कोसळत आहे. शहरातील सुव्यवस्थेवर प्रभावी अंमलबजावणी केव्हा होईल,अशी भयभीत झालेल्या समाजमनात व्यथा निर्माण झाली आहे.

दोन दिवसांपूर्वी पोलीस दलाने कोंम्बिग ऑपरेशन राबविल्यानंतर शहरात गोळीबारात एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाला. गोळीबाराच्या घटना एमआयडीसी, कुसुंबा येथे यापूर्वी घडल्या आहेत. गुन्हेगारांवर दरारा निर्माण करण्याची वेळ आली आहे,असेही नागरिकांमधुन बोलले जावु लागले आहे.

**पार्टीला येण्याचा निरोप**

रविवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास आकाश याच्या घराबाहेर गणेश उर्फ काल्या हा आला. आकाश आहे का? असा आवाज देत तो कुटुंबियांना उद्देशुन म्हणाला, आकाश यांस मामा सागर याच्याकडे पार्टीला ये,असे सांगुन निघुन गेला. त्यानंतर रात्री ८.३० वाजेच्या सुमारास आकाश हा गणेश याचा मामा सागर याच्याकडे पार्टीला जातो,असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडला. रात्री १०.३० वाजेच्या सुमारास दोन लहान अनोळखी मुले घरी आले. आकाश याला गोळी लागली. त्याला रुग्णालयात घेऊन गेले, असे सांगितले. त्यानंतर आकाश याच्या कुटुंबातील सदस्यांनी रुग्णालयात धाव घेतली. आकाश याचे वडील युवराज सोनवणे यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात आकाश उर्फ डोया मुरलीधर सपकाळे, गणेश उर्फ काल्या रवींद्र सोनवणे, सागर सुधाकर पाटील, तुषार उर्फ साबू रामसिंग सोनवणे, विक्की अरुण चौधरी, करण पाटील यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी तीन संशयिताना ताब्यात घेतले आहे.

> **गणेशवर नेम; गोळी लागली आकाशला**
>
> 
>
> रविवारी (९ नोव्हेंबर) रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास कांचननगर परिसरातील प्रशांत चौकात आकाश उर्फ डोया मुरलीधर सपकाळे, गणेश उर्फ काल्या रवींद्र सोनवणे, सागर सुधाकर पाटील, तुषार उर्फ साबू रामसिंग सोनवणे, विक्की अरुण चौधरी, करण पाटील तसेच आकाश उर्फ टपऱ्या युवराज बाविस्कर यांच्यामध्ये भांडण झाले. या वादातून आकाश उर्फ डोया सपकाळे याने गणेश उर्फ काल्या रवींद्र सोनवणे याच्या हाताला बंदुकीने गोळी मारली. त्यानंतर पुन्हा त्याला बंदुकीने दुसरी गोळी मारली असता ती गोळी गणेश याला न लागता आकाश बाविस्कर याच्या डाव्या छातीचे वरील भागात लागुन त्याचा मृत्यू झाला.

# बहिणाबाई उद्यानाजवळ मनपाचे ई-वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन सुरू

## ३० किलोवॅटचे दोन मशिन उपलब्ध ; सुरक्षारक्षकाची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

महापालिकेने बहिणाबाई उद्यानात उभारलेले चार्जिंग स्टेशन अखेर ई-कार चार्जिंगसाठी सुरू झाले आहे. मंगळवारपासून येथे सुरक्षारक्षक सुध्दा नियुक्त केले जाणार आहे. त्यामुळे आता ई-कार वाहनधारकांना ५० रूपयांपासून कार चार्जिंग करता येईल. परंतू कार चार्जिंग करण्यापूर्वी एक ॲप डाउनलोड करावे लागणार आहे. बहिणाबाई उद्यानात प्रत्येकी ३० किलोव्हॅटचे दोन मशिन उभारण्यात आले आहे. वाहन चार्जिंग कसे करावे याचे माहिती पत्रक सुध्दा चार्जिंग स्टेशनमध्ये चिटकविले आहे. दरम्यान, घरी एखादी कार संपूर्ण चार्ज होण्यास सुमारे ६ ते १२ तासांचा कालावधी लागतो, येथे दीड तासात संपूर्ण कार चार्जिंग होईल. प्रतियुनिट २२ रूपये यासाठी खर्च येणार आहे. कार चार्जिंगला असताना, अचानक कुठे जायचे असल्यास ही चार्जिंग स्टॉप सुध्दा करता येणार आहे. ॲपवर स्टॉप ऑप्शन सुध्दा आहे. तो क्लिक केल्यास चार्जिंग बंद होईल. जर १०० रुपयांचे चार्जिंग लावले असेल आणि काही कारणास्तव ५० रुपयांचे चार्जिंग झाल्यावर वाहन घेऊन जावे लागले, तर ॲपवरील स्टॉप ऑप्शन क्लिक करताच उर्वरित ५० रुपयांची रक्कम तत्काळ रिफंड (परत) मिळणार आहे.

असे करा वाहन चार्जींग

**स्टेप १** : ई-कार मालकाला सुरूवातीला हे ॲप डाउनलोड करायचे आहे. या ॲपवर नाव आणि मोबाईल क्रमांक टाकून रजिस्टेशन करावे लागेल. त्यानंतर व्हीकल डिटेल्स ऑप्शवर क्लिक करून वाहनाची संपूर्ण माहिती भरावी लागणार आहे. त्यानंतर या ॲपच्या व्हॉयलेटमध्ये रक्कम टाकावी लागेल. एकदा ॲप डाउनलोड करून माहिती भरल्यानंतर पुन्हा ती प्रक्रिया करण्याची गरज नाही.

**स्टेप २** : मशिनमधून चार्जर काढून वाहनाला लावावे. त्यानंतर चार्जिंग मशिनजवळ ठेवलेले क्यूआर कोड स्कॅन करावे लागणार आहे. स्कॅन करताच ॲप उघडेल, त्यानंतर व्हॉयलेटवर क्लिक करताच किती रूपयांची किंवा किती युनिट किंवा



कितीवेळ चार्जिंग करायची आहे, तसे ऑप्शन दिसेल. रक्कम निवडल्यास ५० रूपयांपासून चार्जिंग करता येईल. रक्कम निवडल्यावर ती रक्कम डेबिट होवून चार्जिंगला सुरूवात होईल. मशिनच्या डिस्प्लेवर वाहन किती चार्ज आहे, वाहन किती होत आहे याची माहिती येईल. यानंतर जेवढ्या पैशांची नोंद केली आहे, तेवढ्या रक्कमेची चार्जिंग झाल्यावर चार्जिंग बंद होईल, मग चार्जर बाहेर काढता येईल.

# किरकोळ कारणावरुन तरुणासह मित्राला मारहाण

**जळगाव** : व्हीडीओ काढत असताना तरुण येत असल्याने एका बाजुला व्हा,असे तरुण बोलला. याचा राग येत चौघांनी तरुणासह त्याच्या मित्राला लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. शुक्रवारी (७ नोव्हेबर) दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास ही घटना मेहरुण तलाव परिसरात सुबोनिया चिडीया घराजवळ घडली. याप्रकरणी रविवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रियांशुसिंग विद्यासागर सिंग राजपूत (वय २७, रा.हरिविठ्ठलनगर) याच्या तक्रारीनुसार त्याच्यासह त्याचा मित्र असे दोघे जण मेहरुण तलाव परिसरात गेले होते. याठिकाणी प्रियांशुसिंग हा चिडीयाघर येथे त्याच्या मोबाईलमध्ये व्हीडीओ काढत होता. तेव्हा त्या व्हीडीओमध्ये संशयित तरुण आला असता तु एका बाजुला हो,असे म्हणाला. या बोलण्याचा राग आल्याने अभय गुजर (पुर्ण नाव माहित नाही) तसेच त्याच्या सोबतच्या तीन साथीदारांनी प्रियांशुसिंग याच्यासह त्याच्या मित्राला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर चौघांनी दोघांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच एकाने तरुणाच्या डोक्यात दगड टाकत जखमी केले. याप्रकरणी चौघांवर दाखल गुन्ह्याचा तपास हवालदार मनोज घुले हे करीत आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे....



### सार्वजनिक विद्यालयात विद्यार्थी दिन उत्साहात

**जळगाव** : असोदा (ता. जळगाव) येथील सार्वजनिक विद्यालयात 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीतास १५० वर्षे झाल्यानिमित्त आणि विद्यार्थी दिनानिमित्त कार्यक्रम झाला. डिगंबर महाजन, गंगाराम भुगवड्या व चारुलता टोके उपस्थित होते. याप्रसंगी 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. संस्थाध्यक्ष अनिल महाजन यांनी कष्ट व जिद्दीने विद्यार्थी आपले ध्येय प्राप्त करू शकतो, असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव विलास चौधरी, पर्यवेक्षक लालसिंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी धनश्री कैलास वाणी हिने विद्यार्थी दिनाची माहिती दिली. गंगाराम भुगवड्या यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाविषयी माहिती दिली. चारुलता टोके यांनी विद्यार्थ्यांनी कसे आपले ध्येय निश्चित करावे व ते कसे संपादित करावे, याबद्दल मार्गदर्शन केले. ज्येष्ठ शिक्षक डिगंबर महाजन यांनी ७ नोव्हेंबर कर्करोग जागरूकता दिनाबद्दल माहिती दिली. उपशिक्षिका कविता भोळे यांनी सूत्रसंचालन केले. उपशिक्षिका वृषाली चौधरी यांनी आभार मानले.

### नूतन मराठा महाविद्यालयाचा विद्यार्थी सुमेध गाढे यांची एमपीएससीमार्फत एसटीआयपदी निवड

**जळगाव** : नूतन मराठा महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी सुमेध गाढे यांची



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्य कर निरीक्षक या पदावर निवड झाली आहे. सुमेध गाढे यांनी या यशाचे श्रेय सातत्य, स्वअनुशासन आणि कठोर परिश्रम यांच्या योग्य समन्वयाला दिले आहे. त्यांच्या या यशातून महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली आहे. या यशाबद्दल नूतन मराठा महाविद्यालयातर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांनी सुमेध यांचा सत्कार केला आणि त्यांच्या भावी प्रशासकीय वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील आणि प्रा. घनश्याम पाटील यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते.

### बालकल्याण सुधारगृहात वहदत इस्लामीतर्फे फळे वाटप

**जळगाव** : येथील बालकल्याण सुधारगृहात येथील वहदत इस्लामीतर्फे मुलांना व मुलींना फळे वाटप शुक्रवारी (७ नोव्हेंबर) करण्यात आली. वहदत इस्लामी तर्फे प्रत्येक महिन्यात विविध समाजसेवा उपक्रम राबविले जातात. यावेळी इस्लामी जिल्हा अध्यक्ष अतिक अहमद, शहर अध्यक्ष फारुक उस्मान शेख यांच्या हस्ते फळे वाटप करण्यात आली. याप्रसंगी बालकल्याण सुधार विभागाचे कर्मचारी, शिक्षक उपस्थित होते.

# मतदानासाठी एक लाखाहून अधिक दुबार चेहरे

## पडताळणी दरम्यान मतदान केंद्राधिकाऱ्यांना घाम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. यात पहिल्या टप्प्यात नगरपरिषद नगरपंचायतीच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या याद्यांमध्ये तब्बल १ लाख १८ हजार १३२ दुबार मतदार असल्याची शक्यता आहे.

त्यादृष्टीने जिल्ह्यात या दुबार मतदारांची पडताळणी बीएलओ अर्थात मतदान केंद्र अधिकाऱ्यांकडून केली जात असून ऐन हिवाळ्यात प्रशासन कर्मचाऱ्यांला घाम फुटायला लागला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद निवडणुकांची शक्यता लक्षात घेता अंतिम मतदार याद्यांचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने लांबविला आहे. यात दुबार मतदारांच्या पडताळणीसाठी आयोगाने ही भूमिका घेतली आहे. त्यात जिल्ह्यात असणाऱ्या संभाव्य दुबार मतदारांच्या पडताळणीचे काम गट व गणनिहाय बूथ पातळीवरील अधिकाऱ्यांनी (बीएलओ) सुरु केले आहे.

**दुबारांसाठी दारोदार भटकंती**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत त्यांच्या प्रत्येकाच्या घरी जा, दोनपैकी कोणत्या ठिकाणी त्यांना मतदार म्हणून नाव हवे आहे ते विचारा आणि उर्वरित पर्यायाच्या नावावर फुली मारा, जेणेकरून ते अन्यत्र मतदान करू शकणार नाहीत. इतके करूनही कुठे दुबार नाव राहिलेच असेल तर मतदार एकाच ठिकाणी मतदान करतील, असे त्यांच्याकडून लिहून घेतले जाणार आहे. त्यानुसार गट व गणनिहाय दुबार चेहऱ्यांच्या शोधात बीएलओ लागलेले आहेत.

**चार तालुके टॉप टेनच्या गटात**

दुबार चेहरे असलेल्या संभाव्य मतदारांच्या पडताळणीत अमळनेर, पारोळा, भडगाव व धरणगाव तालुक्यातील 'टॉप टेन' जिल्हा परिषदेतील गट- गणांचा समावेश आहे. त्यामुळे या गट-गणांमधील दुबार चेहऱ्यांची पडताळणी करताना नाकेनऊ येत असल्याचेच दिसून येत आहे. या पडताळणीचा सर्वाधिक ताण अमळनेर, पारोळा, भडगाव व धरणगाव तालुक्यात आहे. या तालुक्यांत सर्वाधिक संभाव्य दुबार मतदारांची नावे असून गटनिहाय संबंधित बीएलओंना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

**'टॉप टेन' दुबार मतदारांचे गट**

जानवे, मांडळ, दहिवद (अमळनेर), गिरड (भडगाव), शिरसमणी (पारोळा) पिंप्री खुर्द (धरणगाव), तामसवाडी, म्हसवे, शिरसोदे (पारोळा), कळमसरे (अमळनेर).

**गटनिहाय संभाव्य दुबार मतदार**

**चोपडा** - विरवाडे (६१४), धानोरा (१५४२), अडावद (१२८७), लासूर (१८९६), घोडगाव (२२५९), चहार्डी (२६६६).

**यावल** - हिंगोणे (१०९६), न्हावी (४६८), किनगाव (१८७३), साकळी (९३०), भालोद (८८३)

**रावेर** - केऱ्हाळे (१७१२), वाघोड (१७४६), निंभोरा (१२२५), चिनावल (१०३८), वाघोदा (१३७६), ऐनपूर (१९११)

**मुक्ताईनगर** - अंतुर्ली (१८१६), कुऱ्हे (७९८), हरताळे (११०५).

**बोदवड** - नाडगाव (८८३), शेलवड (६०१).

**भुसावळ** - कंडारी (१०४१), निंभोरा (१९८६), कुऱ्हे (८६८).

**जळगाव** - कानळदा (१५६९), आसोदा (१५१५), कुसुंबे खुर्द (१२३१), म्हसावद (८९३), शिरसोली (१५७१).

**धरणगाव** - साळवा (२३५८), पिंप्रीखुर्द (३४१२), पाळधी खुर्द (१९१९).

**अमळनेर** - कळमसरे (२७८२), पातोंडा (२०६८), दहिवद (३७४३), मांडळ (४०९२), जानवे (५२२६).

**पारोळा** - शिरसोदे (२९०३), म्हसवे (३३३९), तामसवाडी (३३६४), शिरसमणी (३४२०).

**एरंडोल** - विखरण (१३९२), तळई (२१६८), कासोदा (१२५१).

**जामनेर** - नेरीदिगर (१२९५), बेटावद (४८५), शहापूर (६४०), पाळधी (९५१), लिहे (१३०१), पहूरपेठ (७१०), तोंडापूर (५४४).

**भडगाव** - गिरड (३४९६), गुढे (२२६०), कजगाव (२३६४).

**चाळीसगाव** - बहाळ (१०६६), पातोंडा (१८९९), रांजणगाव (११६७), टाकळी प्र.चा.(१०८७), मेहुणबारे (८३३), सायगाव (१३२३), उंबरखेड (२०३९), घोडेगाव (११४९).

# शेतकऱ्यांची भरपाई बँकांनी कर्जात 'वळती' करू नये - पालकमंत्री

## भरपाई वळवणाऱ्या बँकांवर कारवाईचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

शेतकऱ्यांची भरपाई ही त्यांचा हक्क आहे. ती त्यांच्या उपजीविकेसाठी आहे- कर्ज फेडीसाठी नव्हे. कोणत्याही बँकेने ही रक्कम परस्परपणे कर्ज खात्यात



वळवू नये. शासनाची याबाबत ठाम भूमिका असून, अशा प्रकारच्या तक्रारी गंभीरतेने तपासल्या जातील. मंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हा प्रशासनास निर्देश देऊन सर्व सहकारी, राष्ट्रीयकृत आणि खासगी बँकांना लेखी आदेश काढण्यास सांगितले आहे, ज्यात अशा वसुली पद्धती थांबविण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येणार आहेत.

खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्ती व हवामान बदलामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा म्हणून हवामान आधारित फळपीक विमा आणि आपत्ती भरपाईची रक्कम डीबीटी तत्त्वावर थेट त्यांच्या आधार-निगडित बँक खात्यांमध्ये जमा करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या रकमेच्या वितरणानंतर काही बँकांकडून शेतकऱ्यांना माहिती न देता भरपाईची रक्कम परस्पर त्यांच्या कर्ज खात्यात 'वरती' करण्यात येत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे मोठ्या प्रमाणावर येऊ लागल्या आहेत. यामुळे अनेक शेतकरी संतप्त असून, त्यांनी या प्रकारांविरोधात पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे तक्रार केली आहे.

या तक्रारींची गंभीर दखल घेत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी बँकांना स्पष्ट इशारा दिला आहे. राज्य शासनाने यापूर्वीच "पीक विमा व नुकसानभरपाईची रक्कम कर्ज खात्यातून परस्पर वळवू नये" असा शासन निर्णय जाहीर केला आहे. मात्र काही बँका या निर्णयाकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांचा दिलासा हिरावून घेत असल्याचे दिसून येत आहे.

**शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी**

या संदर्भात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. हवामान बदल आणि आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणे हा शासनाचा उद्देश आहे. कोणतीही संस्था या प्रक्रियेत अडथळा आणणार नाही. बँकांनी मानवतेचा विचार करून शासनाच्या आदेशांचा सन्मान करावा. त्यांनी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत की शेतकऱ्यांना मिळालेली भरपाई थेट त्यांच्या हाती पोहोचावी आणि ती त्यांच्या वैयक्तिक शेती उपयोगी कामासाठी व उपजीविकेसाठीच उपयोगात आणण्यात यावी दक्षता घ्यावी. अशा सूचना बँकांना देण्यात आल्या आहे.

# केसीई अभियांत्रिकीच्या इको कॅम्पस संघाची स्मार्ट इंडिया हॅकेथॉनसाठी निवड

**जळगाव** : केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालय आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बहुप्रतिक्षित स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२५ मध्ये के.सी.ई.एस. अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन स्वायत्त् महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे.

के.सी.ई.एस. च्या संगणक अभियांत्रिकी विभागाच्या इको कॅम्पस या संघाने स्वच्छ आणि हरित तंत्रज्ञान या महत्त्वाकांक्षी थीम अंतर्गत आपला प्रकल्प सादर केला आहे. त्यांच्या प्रकल्पाचे शीर्षक "संकरित नवीकरणीय ऊर्जा निर्मिती उपाययोजना" असे आहे. या निवड प्रक्रियेतून संघाला राष्ट्रीय स्तरावर आपली नाविन्यता सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे. इको कॅम्पस संघात अंतिम आणि तृतीय वर्षातील संगणक अभियांत्रिकीचे एकूण सहा विद्यार्थी कार्यरत आहेत. त्यात गौरव धनंजय महाजन, लोकेश त्र्यंबक कापडे, निखिल धनराज भोई, पल्लवी विजय पाटील, आदित्य गजानन दुटे, सिद्धेश अशोक माळी यांचा समावेश आहे. प्राचार्य डॉ. संजय सुगंधी, संगणक अभियांत्रिकी विभाग प्रमुख अविनाश सूर्यवंशी, मार्गदर्शक अश्विनी त्रिलोकसिंग देवराळे यांचे मार्गदर्शन लाभले.



# दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेत जे.जे. स्पोर्ट्स विजयी

## जैन स्पोर्टस ॲकेडमीचा संघ ठरला उपविजेता

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**



४थ्या स्व. किरण दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना अनुभूती निवासी स्कूलच्या क्रीडांगणावर खेळविण्यात आला. त्यात जे. जे. स्पोर्ट्स हा अंतिम विजयी होऊन त्यांनी ४था किरण दहाड चषक उंचावला. स्वर्गीय किरण दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे ३० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले होते.

स्व. किरण दहाड स्मृती टी-२० स्पर्धेचे चौथ्या वर्षी १६ संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. अंतिम सामना जैन स्पोर्ट्स अकादमी ब्ल्यू विरुद्ध जे जे स्पोर्ट्स क्लब दरम्यान झाला. या अंतिम सामन्याची नाणेफेक जे जे स्पोर्ट्स क्लब ने जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला जे जे स्पोर्ट्स क्लब नये आपल्या निर्धारित २० षटकांमध्ये सात गडींच्या मोबदल्यात एकूण १३३ धावा केल्यात. जे जे स्पोर्ट्स तर्फे संदेश सुरवाडे याने ३४ (२६) कैलास पाटील यांनी ३२ (१८) अशा वैयक्तिक धावा करून आपल्या संघाला १३३ धावसंख्या उभारण्यास मदत केली. जैन स्पोर्टसतर्फे राज बेलदार याने चार षटकात २१ धावा देत ३ महत्त्वपूर्ण बळी मिळविले. १३४ धावांचे लक्ष्य घेऊन उतरलेल्या जैन स्पोर्ट्स अकॅडमी ला आपल्या निर्धारित २० षटकात केवळ १३१ धावा करत्या आल्यात. त्यामुळे त्यांनी हा अंतिम सामना केवळ दोन धावांनी गमावला त्यांच्यातर्फे मोहम्मद नुमान याने ४४ (४०) धावा केला तर पवन पाटील यांनी ३४ (२०) धावा करून आपल्या संघाला स्पर्धेत ठेवले होते. परंतु जे जे स्पोर्ट्स तर्फे मिलिंद सपकाळे याने ४ षटकार २३ धावा देत ३ बळी मिळविले तर कर्णधार रोहित पारधी याने ४ षटकात १९ धावा देत २ महत्त्वपूर्ण बळी मिळवून अटीतटीच्या सामन्यात आपल्या संघाला निसटता विजय मिळवून दिला. अंतिम सामन्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारोहाचे आयोजन केले होते. यासाठी जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष युसूफ मकरा, सचिव अरविंद देशपांडे तर जिल्हा निवड समितीचे प्रमुख अमळनेरचे संजय पवार व निवड समिती सदस्य प्रशांत विरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्वप्रथम अंतिम सामन्यात फलंदाजी करताना २३ (३१) धावा व गोलंदाजीत २ बळी मिळविणारा कर्णधार रोहित पारधी याला सामनाविराचा चषक देण्यात आला. वैयक्तिक बक्षीसांमध्ये उत्कृष्ट फलंदाज म्हणून आर टी स्पोर्ट्सचा रोहित तलरेजा ज्याने तीन डावात एका शतकासह एकूण १६८ धावा केल्या याला ट्रॉफी व रोख १ हजार बक्षीस देण्यात आले. तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जेंट्स स्पोर्ट्स अकॅडमीचा राज बेलदार याने चार सामन्यात सात बळी घेतले. त्याला ट्रॉफी व १००० रोख असे बक्षीस देऊन गौरवण्यात आले. मालिकावीर हे पारितोषक जे जे स्पोर्टचा कर्णधार रोहित पारधी ज्याने चार डावात ६० धावा केल्या व ९ बळी मिळविले याला ट्रॉफी व ३ हजार देऊन गौरविण्यात आले. उपविजेता जैन स्पोर्ट्स अकॅडमीच्या ब्ल्यू संघाला चषक व रोख ₹ १५००० असे बक्षीस देण्यात आले. तर जे.जे. स्पोर्ट्स क्लब यांना विजेते पदाची ट्रॉफी व रोख ₹ २५००० असे बक्षीस देण्यात आले. मोहम्मद फजल यांनी सूत्रसंचालन केले. मुस्ताक अली यांनी आभार मानले.

### ऑनलाईन फसवणूकीपासून सावध रहा - सीईओ करणवाल

**जळगाव** : जिल्ह्यात उमेद अंतर्गत २२५० कार्यरत समुदाय संसाधन व्यक्ती अर्थात सीआरपी कार्यरत आहेत. यात महिलांचे बचत गट मोठ्या प्रमाणावर असून आर्थीक उलाढाल देखील त्यानुसार बरीच आहे. यात ऑनलाइन फसवणुकीचे विविध प्रकार उघडकीस येत असून महिलांनी ऑनलाईन महिलांनी ऑनलाइन फसवणुकीपासून सुरक्षित रहावे व सतर्क रहावे. तसेच कुठल्याही अनोळखी व्यक्तींनी पाठवलेले संदेश, लिंक याला प्रतिसाद देऊ नये असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी केले. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्ह्यातील कार्यरत महिला केडर सर्व समुदाय संसाधन व्यक्ती यांचे ऑनलाइन कार्यशाळा जामनेर तालुक्यात पार पडली. यावेळी उमेद अभियानातील कार्यरत महिला बचत गटांच्या समुदाय संसाधन व्यक्ती यांच्याशी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी संवाद साधला.या महिला बचत गटांसाठी ऑनलाईन सतर्कता पंधरवाडा जनजागृती उपक्रम जिल्हास्तरावर घेण्यात आला.

# गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## नि:स्वार्थ प्रतिष्ठानतर्फे मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**



शहरात अनेक वर्षांपासून गरीब वस्तीभागातील शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असलेल्या निःस्वार्थ जनसेवा प्रतिष्ठानतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळेचा पहिला दिवस म्हणून साजरा करण्यात येणाऱ्या विद्यार्थी दिवसानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला व्यासपीठावर अध्यक्षस्थानी शनिपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून हाऊस ऑफ ज्वेलर्स बाय बाफना संचालक कस्तुरचंदजी बाफना, शहर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक सागर शिंपी, भैय्यासाहेब ढडोरे, दीपक परदेशी, बाबू सर, प्रणेश ठाकूर, वंदना पाटील, उर्मिला ठाकूर, किरण जावळे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कार डायरीच०या माध्यमातून संस्कारक्षम सवयी लावले जात असल्याने एक शिस्तप्रिय विद्यार्थी बरोबरच संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य संस्थेच्या वतीने होत असल्याचा आनंद यावेळी कस्तुरचंद बाफना यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. यावेळी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदत करणारे जळगाव पोलीस प्रणेश ठाकूर यांचा सहपत्नी आणि १० वी, १२ वी तसेच शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्याचे वाटप यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी हाऊस ऑफ ज्वेलर्स बाय बाफना चे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रतिष्ठानचे सचिव धीरज जावळे, बब्बू जावळे, पूनम ताडे, सागर गोयर, विजया पांडे, अध्यक्षा शारदा सोनवणे, सुलतान पटेल, दिशा ताडे, वेदांत ताडे आदींनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे संस्थापक अविनाश जावळे यांनी केले. आभार पूनम ताडे यांनी मानले.



### जैन स्पोर्टस् अकॅडमीच्या आठ खेळाडूंची राज्य कॅडेट स्पर्धेसाठी निवड

**जळगाव** : जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशन व जैन स्पोर्टस् अकॅडमी यांच्या वतीने अनुभूती निवासी स्कूल येथे कॅडेट (१२ ते १४ वयोगटातील) मुले आणि मुली निवड चाचणी घेण्यात आली होती.

या स्पर्धेत रावेर, बोदवड, जळगाव येथील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये जैन स्पोर्टस् अकॅडमीचे ८ खेळाडूंची १३ ते १५ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथे होणार असलेल्या ८ व्या महाराष्ट्र राज्य कॅडेट तायक्वांडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. साधना देशमुख, समीक्षा पवार, भाविका पाटील, दिया देशपांडे, शिनय जैन, गुरु कारंडे, मयूर पाटील, अबिर चौबे या जैन स्पोर्टस अॅकडमीच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. प्रशिक्षक म्हणून जयेश कासार, निकेतन खोडके तर मॅनेजर म्हणून स्नेहल अट्रावलकर यांची निवड करण्यात आली आहे. या यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक जयेश बाविस्कर, जयेश कासार, निकेतन खोडके, गिरीश खोडके यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी पंच म्हणून श्रेयांग खेकारे, स्मिता बाविस्कर, जयेश बाविस्कर, आशुतोष सोळंकी, राहुल चव्हाण, दानीश तडवी यांनी सहकार्य केले.

**यांनी केले कौतुक**

यशस्वी खेळाडूंचे जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष ललित पाटील, खजिनदार सुरेश खैरनार, सचिव अजित घारगे, सहसचिव रवींद्र धर्माधिकारी, सदस्य नरेंद्र महाजन, कृष्णकुमार तायडे, महेश घारगे, सौरभ चौबे तसेच जैन स्पोर्टस् अकॅडमीचे अरविंद देशपांडे यांनी कौतुक करून या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारत देश संविधानाप्रति कृतज्ञ राहीन - सपकाळे

## जळगावातील बैठकीत संविधान सन्मान संमेलनासाठी विविध समित्या जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० नोव्हेंबर**

भारतीय लोकशाहीची परंपरा गेल्या वर्षानुवर्षांपासून टिकून राहण्यासाठी भारतीय संविधानाने सर्व जाती-धर्माच्या लोकांना, स्त्रियांना जी न्याय्य हक्काची वागणूक प्राप्त करून दिली आहे, जगाच्या पाठीवर लोकशाहीची मूल्ये आणि अनेक जाती-धर्माच्या लोकांना सामावून घेणारे हे संविधान आहे. यामुळे देशातील जनता आणि पुढच्या अनेक पिढ्या या संविधानाप्रति कायम कृतज्ञ राहीन, असे मत मुख्य संयोजक मुकुंद सपकाळे यांनी व्यक्त केले.

शहरात संविधान संमेलन सन्मान संमेलनानिमित्त आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. बैठकीत संमेलन यशस्वितेसाठी विविध समित्या जाहीर करण्यात आल्या. डॉ. सत्यजित साळवे यांनी प्रास्ताविक केले. संमेलन नियोजनासंदर्भात डॉ. मिलिंद बागूल यांनी भूमिका विशद केली. जयसिंग वाघ यांनी राज्यभरातील येणाऱ्या मान्यवरांच्या व्यवस्थापनाविषयी माहिती दिली.

भारती रंधे, पुष्पा साळवे, दीपमाला सुरवाडे, संध्या तायडे, दिलीप सपकाळे, आनंद कोचुरे, मनोहर गाडे, चंद्रगुप्त सुरवाडे, महेंद्र केदारे, भारत सोनवणे, दतू सोनवणे यांनी नियोजनासंदर्भात सूचना केल्या. कवी राजेंद्र पारे, अशोक सोनवणे, पितांबर अहिरे, संतोष गायकवाड, दिलीप सपकाळे, अजय बिऱ्हाडे, अजमल शहा, मनीष साबळे, किशोर भालेराव, यशवंत घोडेस्वार, आनंदा तायडे यांनी संमेलन यशस्वितेच्या दृष्टीने सूचना केल्या. बापूराव पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुभाष सपकाळे यांनी आभार मानले.

**अशा आहेत संमेलनाच्या विविध समित्या**

**स्वागत समिती** : स्वागताध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, मुख्य संयोजक मुकुंद सपकाळे, धनंजय चौधरी, अ‍ॅड. राजेश झाल्टे, उद्योजक संजय इंगळे, सुरेश सोनवणे (सुरत), डॉ. पी. आर. सपकाळे, खलिल देशमुख, मुकुंद नन्नवरे, भारती रंधे, लीना पवार, प्राचार्य डॉ. लीलाधर पाटील, गौतम खंडारे, सुरेंद्र पाटील, डॉ. राजेश मानवतकर, सरोजिनी लभाणे, पुष्पा साळवे, विजयकुमार मौर्य, अशोक सोनवणे, प्रा. डॉ. अनिल हिवाळे.

**अर्थ समिती** : श्रीकांत बाविस्कर (प्रमुख), मिलिंद पवार, सुरेश सोनवणे, शालिक गायकवाड, राम पवार, भारती रंधे, निलू इंगळे, रणजित शिंदे, जे. पी. सपकाळे, राजू मोरे, सिद्धार्थ नेतकर, एस. एस. राणे, सलीम खान, फईम पटेल, प्रा. डॉ. के. के. अहिरे, सुरेश चांगरे, आधार सपकाळे, दत्तू सोनवणे.

**स्मरणिका समिती** : डॉ. मिलिंद बागूल (संपादक), जयसिंग वाघ (कार्यकारी संपादक), सत्यजित साळवे (सहसंपादक), प्रा. डॉ. के. के. अहिरे, डॉ. बापू शिरसाठ, पुष्पा साळवे, शिवराम शिरसाठ, प्रा. किसन हिरोळे, विवेक सैंदाणे.

**भोजन समिती** : महेंद्र केदारे, गणेश सुरवाडे (प्रमुख), चंद्रगुप्त सुरवाडे, भारत सोनवणे, दिलीप सपकाळे, संजय बागूल, संजय सोनवणे, ज्योती भालेराव, आयुष्यमान निकम, भगवान बाविस्कर. व्यासपीठ

**जावट समिती** : चेतन नन्नवरे (प्रमुख), आशुतोष तायडे, विजय लुल्ले, सुनील दाभाडे, सुष्मिता भालेराव, अजय पाटील, चेतन नन्नवरे, चंद्रशेखर अहिरराव, जगदीश सपकाळे.

**निवास समिती** : अनिल सुरडकर, विनोद रंधे (प्रमुख), सुनील सोनवणे, आर.टी. सोनवणे, इंदिरा जाधव, प्रतिभा शिरसाठ, बापू सोनवणे, चेतन नन्नवरे, सुरेश सोनवणे, दिलीप जाधव, आधार सपकाळे, किशोर भालेराव, मनीष साबळे, यशवंत घोडेस्वार, आनंदा तायडे, पितांबर, अहिरे.

**ग्रंथप्रदर्शन समिती** : युवराज माळी (प्रमुख), प्रा. डॉ. गौतम निकम, सुनील पाटील, प्रदीप पाटील, अयाज अली नियाज अली, शेख शफी आयुब, प्रभाकर खर्चे, अ‍ॅड. मुकेश कुरील.

**प्रचार व प्रसार समिती** : मंगल बी. पाटील (प्रमुख), शिवराम शिरसाट, डॉ. बापू शिरसाठ, जय वाघ, मुश्ताक करिमी, राजेंद्र पारे, विवेक सैंदाणे, बी. जे. बोदडे, दत्तू सोनवणे, अशोक बिऱ्हाडे, प्रा. संजीव साळवे, संजय निकम, उमेश गाढे, निसार तडवी, आनंद सपकाळे, अरुण मन्सुरी, सुभाष मोरे, कल्पतेश देशमुख, जावेद कुरेशी, सुनील जाधव, डॉ. अनिल शिरसाळे, शिरीष चौधरी, साहेबराव बागूल, अजय बिऱ्हाडे, संतोष गायकवाड.




**जाहिरात संकलन समिती** : मनोहर गाढे (प्रमुख), विनोद रंधे, मनोहर लोखंडे, भीमराव तायडे, अनिल मेढे, जगदीश सपकाळे, भारत सोनवणे, शिरीष चौधरी, हरिश्चंद्र सोनवणे, सुभाष सपकाळे, प्रा. किसन हिरोळे, गणेश सुरवाडे, साहेबराव बागूल, अ‍ॅड. राजेश गोयर, अशोक सोनवणे, सुभाष सपकाळे, अ‍ॅड. आनंद कोचुरे, शिरीष अडकमोल, ललित महिरे, डी. एम. भालेराव, श्रीकांत बाविस्कर.

**परिवहन समिती** : अशोक सोनवणे (प्रमुख), विजयकुमार मौर्य, अनिल सुरडकर, संजय महिरे, आकाश सपकाळे, दिलीप सपकाळे, जगदीश सपकाळे, गोकुळ पोहेकर, डी. आर. वानखेडे, राजू सोनवणे.

**विद्यार्थी समन्वय समिती** : महाविद्यालयीन गट हभप माई पाटील (प्रमुख), प्रा. गणपत धुमाळे, सुष्मिता भालेराव, अजय पाटील, तुषार रंधे, अ‍ॅड. आकाश सपकाळे.

**महिला समिती** : भारती रंधे (प्रमुख), निलू इंगळे, पुष्पा साळवे, जया सोनवणे, दीपमाला सुरवाडे, संध्या तायडे, आम्रपाली जाधव, पुष्पा तळेले, अ‍ॅड. स्वाती शिंदे, इंदिरा नेतकर. आठवणी

**संमेलन समिती** : शिवराम शिरसाट (प्रमुख), डॉ. मिलिंद बागूल, जयसिंग वाघ, डॉ. बापू शिरसाट, मंगल बी. पाटील.

**कार्यक्रम संचालन समिती** : बापूराव पानपाटील (प्रमुख), वकार शेख, हरिश्चंद्र सोनवणे, डॉ. बी. डी. शिरसाट, प्रा. अमृता नेतकर, लक्ष्मण पाटील, ज्योती वाघ, शरद भालेराव, प्रा. पडलवार, प्रा. दिनेश पाटील.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### कळमसरे विद्यालयात अशोक महाजनांचा सत्कार

**शिरपूर** : येथील आदर्श माध्यमिक विद्यालयातील ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अशोक धुडकू महाजन यांचा रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोडतर्फे नेशन बिल्डर ॲवॉर्ड- २०२५ देऊन जिल्हास्तरावर सन्मान करण्यात आला. त्यानिमित्त उद्यानपंडित बापूसाहेब ग. द. माळी गुरुजी शिक्षण प्रसारक संस्था व आदर्श माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे श्री. महाजन यांचा सत्कार व अभिनंदन सोहळा कळमसरे येथील विद्यालयात झाला. संस्थेचे अध्यक्ष शरद दयाराम सोनवणे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून तऱ्हाडी येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब चव्हाण, संस्थेचे संचालक गौरव मोहन सोनवणे व मांडळ विकास कार्यकारी सोसायटीच्या संचालिका वैशाली गौरव सोनवणे उपस्थित होते. अशोक महाजन यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन शरद सोनवणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना श्री. महाजन यांनी सांगितले की, या विद्यालयातून मी अनेक खेळाडू घडवले. ते घडवत असताना सहकाऱ्यांचे व संस्थेचे सहकार्य लाभले. याप्रसंगी रावसाहेब चव्हाण, वैशाली गौरव सोनवणे, मुख्याध्यापक आर. जे. सोनवणे यांनी मनोगतातून श्री. महाजन यांच्या कार्याचा गौरव केला. उपशिक्षिका ज्योती निकवाडे यांनी सूत्रसंचालन केले. वाय. पी. माळी यांनी आभार मानले.



### पटेल महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची इंटर्नशिपसाठी निवड

**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बीएमएस, बीएस्सी (संगणक) आणि बीसीए या वर्गातील किरण ॲकॅडमीतर्फे (पुणे) घेण्यात आलेल्या इंटर्नशिप ड्राइव्हमध्ये १३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यात मीनाक्षी देवरे, माहेश्वरी महाजन, अक्षयगीर गोसावी, प्रांजल चौधरी, सुवर्णा माळी, सोहम पाटील, जयेश बोरसे, आयुषी सोनार, वैष्णवी चाकोर, सुचिता पाटील, हर्षदा लोहार, ज्योती कुंभार व मौलापाटील इरफान यांची निवड झाली. या ड्राइव्हसाठी २५४ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या इंटरव्यूसाठी दोन जणांची एचआर टीम उपस्थित होती. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सहा महिने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रक्रियेत टेक्निकल टेस्ट, ऑपरेशनल, मॅनेजेरिअल राउंड आणि एचआर राउंड अशा तीन टप्प्यांतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यशस्वी विद्यार्थ्यांचा माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, भूपेशभाई पटेल, चिंतनभाई पटेल, राजगोपाल भंडारी, माजी प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव, प्रा. बी. एस. पंचभाई, कार्यालयीन अधीक्षक संजय मोरे, गणेश सोनार, संदेश राजपूत आदींनी गौरव केला. ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर हर्षल बडगुजर यांनी प्रयत्न केले.



### एड्स आरोग्य जागरूकतेसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार

**शिरपूर** : येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात रेड रिबन क्लब आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने 'एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाय : सुरक्षित पद्धती व एड्स जागरूकता शिक्षण' या विषयावर अतिथी व्याख्यान घेण्यात आले. प्रमुख वक्त्या म्हणून अमळनेर येथील आधार संस्था, विहान प्रकल्पाच्या अरुणा पाटील यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय, सुरक्षित आरोग्यविषयक सवयी तसेच समाजातील गैरसमजांविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी एड्सविषयी जागरूकतेचा अभाव हा संसर्ग वाढविणारा मुख्य घटक असल्याचे सांगत, प्रतिबंध हाच उपचारापेक्षा अधिक प्रभावी उपाय आहे, असा महत्त्वपूर्ण संदेश दिला. सध्या एड्सवर पूर्णपणे मात करण्यासाठी कोणतेही औषध किंवा लस उपलब्ध नसल्याने प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृती हेच सर्वात प्रभावी शस्त्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांच्या मार्गदर्शनात डॉ. झेड. जी. खान, डी. एम. पाटील यांनी प्रयत्न केले.



### महाराष्ट्र बॉक्सिंग संघटना उपाध्यक्षपदी डॉ. तुषार रंधे

**शिरपूर** : महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेची निवडणूक मुंबईत उत्साहात पार पडली. निवडणुकीत आमदार प्रवीण दरेकर अध्यक्षपदी निवडून आले. त्यांना ४३ मते मिळाली. धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे यांनी महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग संघटना उपाध्यक्षपदावर ४३ मते मिळवत विजयी नेतृत्व सिद्ध केले. धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मयूर बोरसे विभागीय सचिवपदी बिनविरोध निवडून आले. त्यांच्या निवडीबद्दल क्रीडा वर्तुळात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. निवडणुकीत प्रामाणिकपणा, कष्ट आणि संघटनेप्रति असलेली निष्ठा यांचे वर्चस्व दिसून आले. स्पर्धा चुरशीची असली, तरी अखेरीस संघटनात्मक एकतेचा आणि स्वच्छ कारभाराचा विजय झाला. राज्यभरातून संघटनेचे माजी अध्यक्ष जय कवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला असून, बॉक्सिंग खेळ नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला आहे.

### धनुर्विद्या स्पर्धेत हर्षल बिरारेने साधला अचूक निशाणा

**नंदुरबार** : येथील एकलव्य विद्यालयात आठवीत शिकणारा व जिल्हा धनुर्विद्या



असोसिएशनचा खेळाडू हर्षल गोरख बिरारे याने राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात कांस्यपदक पटकाविले. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद (यवतमाळ) यांच्यातर्फे दिग्रस येथे नुकतीच राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत हर्षलने नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करत सांघिक धनुर्विद्या प्रकारात कांस्यपदकाचा मान मिळवला. त्याला प्रशिक्षक राजेश्वर चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचा जिल्हा धनुर्विद्या संघटनेच्या मार्गदर्शक नूतनवर्षा वळवी, अध्यक्ष डॉ. मयूर ठाकरे, उपाध्यक्ष मीनल वळवी, जितेंद्र पगारे, भागूराव जाधव, मनीष सनेर आदींनी गौरव केला. हर्षल बिरारे हा जिल्ह्यातून राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत तब्बल १५ वर्षांनंतर पदक मिळवणारा खेळाडू ठरला असून, या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात अभिमानास्पद नोंद झाली आहे.

# बोराडीतील बाजारपेठेत टवाळखोरांची दहशत!

## मुलींची छेड काढण्याचा जाब विचारल्याने ग्रामसुरक्षा दल पदाधिकाऱ्यास मारहाण

तभा वृत्तसेवा
**शिरपूर, १० नोव्हेंबर**

बोराडी गावात एक-दोन दिवसांत शेतीकामाला किंवा शाळेत जाणाऱ्या मुलींची छेड काढणाऱ्या टवाळखोरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

आठवडे बाजारात चार-पाच टवाळखोर मुलांनी मद्यप्राशन करून दुकानदारांसह कामाला जाणाऱ्या मुलींची छेड काढली. यावरून ग्रामस्थांनी त्यांना चांगला चोप दिला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले; पण अद्याप गुन्हा दाखल न झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत बोराडी गावकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, टवाळखोरांवर तालुका पोलीस ठाण्याने व दामिनी पथकाने त्वरित लक्ष देऊन आळा घालण्याची मागणी होत आहे.

बोराडी हे बाजारपेठेचे मोठे गाव असून, गावात बाजार करण्यासाठी आदिवासी भागातील ग्रामस्थांसह महिलांची गर्दी होते. आठवडे बाजारात काही टवाळखोर तरुण बाजारात दुकानदारांना, आइस्क्रीमच्या दुकानदारांना, कापड दुकानदारांना व भाजीपाला विक्रेत्यांना विनाकारण मारहाण करून पैसे न देता वस्तू घेऊन जातात. त्यातच बाहेरगावाहून काम करणाऱ्या मुली बाजार करण्यासाठी गेल्या असता, त्या मुलींची छेड काढण्यास टवाळखोरांनी सुरुवात केली. याबाबत माहिती मिळताच ग्रामसुरक्षा दलाचे सदस्य घटनास्थळी जाऊन मुलांची समजूत काढून तुम्ही घरी जा, मुलींची नावे घेऊ नका, असे सांगितले; पण मुलांनी ग्रामसुरक्षा दलाच्या सदस्यांवरच हल्ला करून त्यांना जखमी केले व गावातील बाजारपेठेत दहशत माजविली. हे सर्व पाहताच काही ग्रामस्थांनी त्यांना पकडून पोलिसांना बोलाविले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल न करता त्यांना सोडून दिले. यामुळे बोराडीसह परिसरात टवाळखोरांचे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यास पोलिसांनीच खत-पाणी घातले आहे. याबाबत अनेक वेळा वरिष्ठांकडे तक्रार करूनही या टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यात येत नाही. त्यांच्यावर वरिष्ठांनी कारवाई करण्याची मागणी बोराडीकरांनी केली आहे.

दरम्यान, आठवडे बाजारात बाहेरगावाहून व्यापारी येत असतात. यातील कापड विक्रेत्यास टवाळखोरांनी फायटर व लोखंडी रॉडचा दणका मारल्याने डोक्याला दुखापत झाली होती. तसेच काही भाजी विक्रेत्यांसह आइस्क्रीमच्या दुकानात आइस्क्रीम खाऊन पैसे न देता खुर्च्या फेकून शिवीगाळ केली व बाजारात घरी जाणाऱ्या मुलींची छेड काढल्याची घटनाही यापूर्वी घडल्या आहेत.

**ग्रामसुरक्षा दलाची भूमिका**

ग्रामसुरक्षा दल गावातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी सक्रिय असते. मात्र, छेड काढणाऱ्यांनी थेट पदाधिकाऱ्यांवरच हल्ला केल्यामुळे गावातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सदस्यांवर हल्ला होऊनही पोलिसांत गुन्हा दाखल न झाल्यामुळे यापुढे ग्रामसुरक्षा दलासाठी युवक काम करणार नसल्याचे सांगितले जात आहे.

**पोलिसांत गुन्ह्याची नोंद नाही**

मारहाण झालेल्या पदाधिकाऱ्याने तत्काळ शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात संबंधित तरुणांविरुद्ध तक्रार करण्यास गेले असता, पोलीस कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



**छेडछाड काढण्याच्या प्रकारात वाढ**

बोराडी येथील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर परिसरातील लोक व महिला जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी येत असतात. शाळा भरण्याची वेळ व सुटण्याच्या वेळी बाजारपेठेत व शाळेच्या रस्त्यावर टवाळखोरांची गर्दी झालेली दिसून येते. यातूनच काही टवाळखोर मुलींची छेड काढण्यास माहीर झाल्यामुळे त्यांचा वेळीच बंदोबस्त न केल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता आहे. याबाबत पालकांनी चिंता व्यक्त केली आहे.

# शिंदखेड्यात इच्छुकांकडून थकबाकीपोटी साडेतीन लाखांची रक्कम तिजोरीत जमा

तभा वृत्तसेवा
**शिंदखेडा, १० नोव्हेंबर**

शिंदखेडा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारपासून (१० नोव्हेंबर) उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला. दुसरीकडे थकबाकी नसल्याचा दाखला उमेदवारी अर्ज भरताना आवश्यक असल्याने, १३ ते १६ इच्छुकांकडून ६ ते १० नोव्हेंबरदरम्यान थकबाकीपोटी सुमारे तीन लाख ६३ हजारांची वसुली झाल्याचे प्रशासनाने म्हटले. अजून चार ते पाच दिवसांत दोन ते तीन लाख रुपये वसूल होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी स्वतंत्र कक्ष**

सध्या जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. शिंदखेडा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारपासून (१० नोव्हेंबर) नगरपंचायतीच्या मंगल कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला असून, कक्षाबाहेर दोन पथके नियुक्त केली आहेत. या पथकांकडून उमेदवारी अर्जांची तपासणी करून दालनात ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

सोमवारी (१० नोव्हेंबर) पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नसल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. इच्छुक उमेदवार नगरपंचायतीची थकबाकी, विविध दाखले मिळविण्यासाठी कार्यकर्त्यांसह शासकीय कार्यालयात दिसून येत आहेत. निवडणुकीत सर्वसाधारण जागेसाठी एक हजार रुपये अनामत असून, राखीव जागेसाठी ५०० रुपये आहे. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची दमछाक होत असून, जातीचा दाखला मिळवणे त्यानंतर दाखला जातपडताळणीकामी ऑनलाइन अर्ज करणे, त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांचे शिफारसपत्र घेणे, प्रतिज्ञापत्र करणे, अशी वेगवेगळी प्रशासकीय कामे करीत प्रभागातील कार्यकर्ते सांभाळणे अशी तारेवरची कसरत इच्छुकांना करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. या सर्व कामांत यशस्वी झाल्याशिवाय उमेदवारी अर्ज वैध ठरण्याची पहिली लढाई यशस्वी होऊ शकत नसल्यामुळे, पहिली लढाई जिंकण्यासाठी इच्छुकांकडून जोरदार तयारी करण्यात आली असून, त्यासाठी तज्ज्ञांचाही कायदेशीर सल्ला घेताना दिसत आहे.

**जातपडताळणी समितीच्या टोकनसाठी इच्छुकांना मनस्ताप**

**शिंदखेडा** : सध्या जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. राखीव जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्यांना जातपडताळणी समितीचे टोकन उमेदवारी अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. मात्र, ते मिळविण्यासाठी मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी इच्छुकांकडून होत आहेत.

जातवैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज भरावा लागतो व त्याची प्रत जातपडताळणी समितीकडे दाखल करावी लागते. संबंधित अर्जासोबत स्थानिक स्वराज्य संस्थेचे शिफारसपत्र विहित नमुन्यात दिलेले असताना, जातपडताळणी समिती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे शिफारसपत्र मागत असल्याचे समोर आले आहे. वास्तविक पाहता, उमेदवाराने स्वतः ऑनलाइन अर्ज केलेला असताना, अर्जाची प्रत जमा करण्याचा विषय असताना, जातपडताळणी समिती मुद्दामहून एकेखोरपणा करीत प्रत्यक्ष उमेदवाराला बोलाविल्याशिवाय जातपडताळणी समिती अर्ज स्वीकारण्यास असमर्थता व्यक्त करीत आहे. यामुळे अनेकांना मनस्ताप सहन करीत माघारी फिरावे लागत असून, अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना जावे लागत आहे. निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, उमेदवारांची कागदपत्रे जमवाजमवसाठी धावपळ सुरू आहे. याबाबत वरिष्ठ स्तरावरून निर्णय होऊन अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांच्या नात्यातील व्यक्तीकडून अर्ज स्वीकारण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे. याबाबत अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही.

> शिंदखेडा नगरपंचायत निवडणुकीसाठी नामाप्र जागेवर निवडणूक लढवणार असून, यासाठी जातपडताळणी समितीचे टोकन आवश्यक आहे. अर्ज ऑनलाइन भरलेला असताना तो जमा करण्यासाठी समिती प्रत्यक्ष उमेदवाराला बोलावत आहेत. यामुळे आमचा अमूल्य असा वेळ जात आहे. आम्ही जातपडताळणी दाखल्यासाठी अर्ज दाखल करण्यासाठी यायचे का, प्रभागात प्रचार करायचा? याबाबतीत वरिष्ठ स्तरावर तक्रार करणार आहे.
> **- सुनीता अरुण देसले (उमेदवार)**

# 'अन्नम.एआय हॅकाथॉन'मध्ये यशोदीप मोरे, कोमल कुमावत तृतीय

## पटेल अभियांत्रिकीचे विद्यार्थी; आयआयटी-रोपरतर्फे स्पर्धा

**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या तंत्रज्ञातील कौशल्य बुद्धिमत्तेच्या क्षमतेची झलक दाखवत राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे.

यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांनी 'अन्नम.एआय हॅकाथॉन २०२५' स्पर्धेत रोपर येथील भारतीय प्रौद्योगिक संस्थेत आयोजित राष्ट्रीय उपक्रमात तिसरे स्थान पटकाविले. यशोदीप मोरे व कोमल कुमावत यांनी विकसित केलेला 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' हा प्रकल्प शेतीतील अवशेषांचा उपयोग करून हरित ऊर्जानिर्मिती करण्याच्या दृष्टीने अभिनव आणि उपयुक्त प्रयत्न आहे. प्रकल्पाचे शैक्षणिक मार्गदर्शन डॉ. निरंजन देशपांडे यांनी केले असून, त्यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी संशोधन, प्रयोग आणि तांत्रिक डिझाइन यांची उल्लेखनीय सांगड घालून एक उत्कृष्ट उदाहरण सादर केले.

प्रकल्पासाठी यशोदीप आणि कोमल यांनी तीन लाखांचे पारितोषिक जिंकले असून, त्यांची निवड आता 'दुसरा टप्पा मार्गदर्शित



कोमल कुमावत



यशोदीप मोरे

संशोधन व निधी सहकार्य'साठी झाली आहे. या टप्प्यात त्यांना आयआयटी-रोपरमधील संशोधकांचे मार्गदर्शन तसेच प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आर्थिक सहाय्य मिळणार आहे. यामुळे 'ॲग्रीवेस्ट टू फ्युएल' या प्रकल्पाचे व्यावहारिक आणि औद्योगिक रूपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, विश्वस्त जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक चिंतनभाई पटेल, सचिव रेषा पटेल, संचालक, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक प्रा. सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन, विभागप्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गौरव केला.

# रोटरी क्लब क्रॉस रोडतर्फे डिसेंबरमध्ये धुळे फेस्टिव्हल

**धुळे** : रोटरी क्लब धुळे क्रॉस रोड व रोटरॅक्ट क्लबतर्फे २५ ते २९ डिसेंबरदरम्यान धुळे फेस्टिव्हल २०२५ हे व्यावसायिक व औद्योगिक प्रदर्शन शहरातील मालेगाव रस्त्यावरील डी-मार्टजवळील खान्देश गोशाळा मैदानावर भरविण्यात येणार आहे.

यावर्षी प्रथमच धुळे फेस्टिव्हल बंदिस्त डोममध्ये होत असून, प्रदर्शनास भेट देण्याची वेळ सकाळी दहा ते रात्री दहा अशी असेल. प्रदर्शनात दीडशेहून अधिक स्टॉल्स, पाच दिवसांचे प्रदर्शन व एक लाखाहून अधिक धुळेकरांची प्रदर्शनास भेट हे मुख्य वैशिष्ट्य आहे. शॉपिंग, खानाखजाना, गेम झोन असे सर्वांसाठी सर्वकाही धुळे फेस्टिव्हलची विशेषतः मानली जाते, असे अध्यक्ष दिनेश कुवर, सचिव हेरंब दाते, प्रोजेक्ट चेअरमन संतोष बिरारी, को-चेअरमन सचिन बोरसे, नीलेश गोटी, गिरीश बहाळकर, संजय देवरे, प्रोजेक्ट कॉर्डिनेटर नितेश सराफ यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी निखिल माने, स्वप्नील गौड, हर्शित शहा, पराग श्रॉफ, महेश शिंदे, पवन खानकरी, अमित ठक्कर, चेतन गांधी, रोटरॅक्ट क्लब पदाधिकारी शुभम बरडिया, अथर्व बिरारी, धनंजय शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रोटरी क्लब क्रॉस रोडच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# नवापूरच्या जयेश गोसावीची राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड

**नवापूर** : दि नवापूर एज्युकेशन सोसायटी संचलित दि एन. डी. अँड एम. वाय. सार्वजनिक हायस्कूल व शेठ एच. जे. शाह कनिष्ठ महाविद्यालयाचा दहावीतील खेळाडू जयेश गोसावी याची पाटन (गुजरात) येथे होणाऱ्या दहाव्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशन व पिंपरी-चिंचवड डॉजबॉल असोसिएशन यांच्यातर्फे पिंपरी-चिंचवड येथील हिंदुस्तान अँटिबायोटिक स्कूलमध्ये १५ वी सब-ज्युनिअर मुले व मुली राज्यस्तरीय डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्याचा संघ सहभागी होता. नवापूर येथील दि



एन. डी. अँड एम. वाय. सार्वजनिक हायस्कूलचे १२ खेळाडू संघात होते. स्पर्धेत जयेश गोसावीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावरच त्याची १४ ते १७ नोव्हेंबरदरम्यान पाटन (गुजरात) येथे होणाऱ्या दहाव्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. जयेशला क्रीडाशिक्षक नीलेश गावंडे व श्रीकांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचा दि नवापूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विपिनभाई चोखावाला, उपाध्यक्ष शिरीषभाई शाह, कार्याध्यक्षा शीतलबेन वाणी, सचिव राजेंद्रभाई अग्रवाल, सहसचिव शोएबभाई मांदा, कोषाध्यक्ष सतीशभाई शाह तसेच व्यवस्थापन मंडळातील सदस्यांसह महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे महासचिव हनुमंत लुंगे, मुख्याध्यापक संजयकुमार जाधव, उपमुख्याध्यापिका कमलबेन परिख, उपप्राचार्य नरेंद्र पाटील, पर्यवेक्षिका निर्जलाबेन सोनवणे व पर्यवेक्षक जाहीद खान पठाण यांनी गौरव केला.

जयेशने शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्याकडून राष्ट्रीय स्तरावरही उत्तम कामगिरीची अपेक्षा आहे, असे मुख्याध्यापक संजयकुमार जाधव यांनी सांगितले.

# शिरपूर मर्चंट बँकेतील घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार पोलिसांच्या ताब्यात

## आर्थिक अपहाराचा ४६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**शिरपूर** : शहरातील एकेकाळच्या प्रख्यात शिरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील तत्कालीन कर्ज वितरण विभागाचा अधिकारी व तब्बल १३.७५ कोटींच्या आर्थिक घोटाळ्याचा प्रमुख सूत्रधार महेश ऊर्फ गोपाल पंडितलाल गुजराथी अखेर शिरपूर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. तब्बल काही महिन्यांपासून फरार संशयित महेश गुजराथीला पकडण्यात पोलिसांना मिळालेले यश या बहुचर्चित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाच्या तपासातील मोठे पाऊल मानले जात आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात शिरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांच्या नेतृत्वात सुरू आहे. पोलिसांनी काटेकोरपणे तपास करत, संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवले आणि अखेर मुख सूत्रधाराला अटक करण्यात यश मिळवले. सध्या तो पोलीस कोठडीत असून, त्याच्याकडून पुढील तपास सुरू आहे.

या घोटाळ्याचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यात उमटले आहेत. शिरपूर मर्चंट बँकेत ठेवी ठेवणाऱ्या शेकडो ठेवीदारांचे आयुष्यभराचे कष्टाचे पैसे गमावण्याची वेळ आली होती. बँकेच्या लेखापरीक्षकांनी केलेल्या फिर्यादीनुसार, २५ मे २०२५ रोजी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा (क्र. २८५/२०२५) दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात भारतीय दंडसंहिता कलम ४०३, ४०९, ४२०, १२० (च) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात बँकेचे काही अधिकारी, कर्मचारी, माजी चेअरमन आणि कर्जदार, अशा ४६ जणांनी संगनमत करून तब्बल १३ कोटी ७५ लाख ८६ हजार २५३ रुपयांचा अपहार केल्याची धक्कादायक माहिती अहवालांतून समोर आली आहे. या संशयितांनी बनावट कर्जे, नियमबाह्य वितरण आणि खात्यांत फेरफार करून बँकेच्या ठेवीदारांची फसवणूक केली. गुन्हा दाखल होताच संबंधित संशयित फरार झाले होते. तथापि, तपासाधिकाऱ्यांनी संशयितांच्या ठिकाणांचा शोध घेत न्यायालयात त्यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले जाण्यासाठी ठोस पुरावे सादर केले.

शासकीय वरिष्ठ अधिवक्ता ॲड. देवेंद्रसिंह तंवर, ॲड. नितीन चोरडिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संशयितांनी कशा प्रकारे बँकेत भ्रष्टाचार केला आहे, हे उदाहरण देऊन स्पष्ट केले. परिणामी, विशेष न्यायालयाचे न्यायाधीश तापकिरे यांनी सुमारे ८० टक्के संशयितांना न्यायालयाने जामीन नाकारला. या कारवाईनंतर काही संशयितांनी न्यायालयीन कोठडीत प्रवेश केला असून, मुख्य संशयित महेश ऊर्फ गोपाल गुजराथी पोलिसांच्या हाती लागल्यामुळे या प्रकरणातील चौकशीचा वेग अधिक वाढला आहे. पोलिस तपासात अजूनही काही नव्या प्रकरणांची उकल होण्याची शक्यता आहे.

**कायदेशीर प्रक्रिया सुरू : पोलीस अधीक्षक धिवरे**

या प्रकरणाबाबत पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे म्हणाले की, ''आर्थिक गुन्हे हे समाजघातक असून, ठेवीदारांचा विश्वास तोडणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही. पोलीस पूर्ण दक्षतेने काम करत आहेत. ठेवीदारांचा पैसा परत मिळवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.''

**पूर्वी अटक झालेले संशयित न्यायालयीन कोठडीत!**

यापूर्वी या प्रकरणातील संशयित कर्जदार जयपाल विजयसिंग गिरासे, भूषण अरुण चौधरी आणि निखिल अशोक अग्रवाल यांना पोलिसांनी अटक केली होती. ते तिघेही सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या संशयितांनी नियमबाह्य पद्धतीने कर्ज घेतले असून, परतफेड न करता बँकेची फसवणूक केली असल्याचे उघड झाले आहे.

**कारवाईनंतर ठेवीदारांमध्ये दिलासा : डॉ. देवरे**

अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी सांगितले की, हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून, आर्थिक फसवणूक प्रकरणात सहभागी सर्वांना अटक करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून या घोटाळ्यामुळे बँकेच्या ठेवीदारांमध्ये निर्माण झालेली अविश्वासाची भावना आणि आर्थिक असुरक्षितता मोठ्या प्रमाणावर होती. मात्र, पोलिसांनी केलेल्या निर्णायक कारवाईनंतर ठेवीदारांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे.

**इतरांनाही अटकेची ठेवीदार, सभासदांची मागणी**

शिरपूर तालुक्यात या प्रकरणाची चर्चा असून, बँकेच्या व्यवस्थापनातील भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. अनेक ठेवीदारांनी न्याय मिळेल आणि जबाबदारांना शिक्षा होईल, अशी आशा व्यक्त केली आहे. या प्रकरणातील अद्याप प्रमुख संशयित तत्कालीन चेअरमन प्रसन्ना जयराज जैन आणि व्यवस्थापक संजय केशव कुळकर्णी यांच्यासह बँकेचे अधिकारी कापडी हेसुद्धा सुमारे पाच महिन्यांपासून फरार आहेत, त्यांनाही लवकर अटक करावी अशी मागणी बँकेचे ठेवीदार आणि सर्वसामान्य सभासदांनी केली आहे.

## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : ११/११/२०२५ **वार** : मंगळवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **ऋतू** : हेमंत **मास** : कार्तिक **पक्ष** : शुक्ल **महिना** : नोव्हेंबर
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-०८ **तिथी** : सप्तमी **नक्षत्र** : पुष्य
**योग** : शुभ/शुक्ल **करण** : विष्टी/बव **सूर्योदय** : ६-४५ **सूर्यास्त** : १८-००
**चंद्रराशी प्रवेश** : कर्क **शुभाशुभ** : १२ नंतर शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आईकडे लक्ष लागेल.
**वृषभ** : आजचा दिवस कर्तव्याचा असेल.
**मिथून** : आर्थिक समस्या कमी होतील.
**कर्क** : मनातील इच्छेप्रमाणे सर्व काही होईल.
**सिंह** : आपल्या बुध्दीचा वापर करून वागा.
**कन्या** : विद्यार्थी वर्गास उतम दिवस.
**तुला** : सर्व काही आनंदात कार्य संपन्न होतील.
**वृश्चिक** : बहारो फूल बरसाओ असा दिवस असेल.
**धनू** : आजार आरोग्याकडे लक्ष द्यावे.
**मकर** : घरातील वातावरण मंगलमय राहील.
**कुंभ** : शत्रुजवळ असताना ओळखता येणार नाही.
**मीन** : संतती इच्छुकांना संततीचा लाभ होईल.
**विशेष** : ज्वारीचे दाणे पक्षांना द्या.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

# रावेर लोकसभेत कार्यकर्त्यांचा स्वबळावर लढण्याचा आग्रह

## मात्र जिल्हाध्यक्षांशी चर्चेनंतर योग्य निर्णय घेणार -मंत्री माणिकराव कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

रावेर लोकसभा क्षेत्रातील निवडणुकांची पक्षाकडून चाचपणी सुरू असून सर्वच ठिकाणी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नगराध्यक्ष व नगरसेवक पदाची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्धार केला असलातरी आम्ही याबाबत चाचपणी करीत असून जिल्हाध्यक्ष व स्थानिक पातळीवर अंतिम चर्चा करून योग्य तो निर्णय घेवू, असे सुतोवाच मंत्री माणिकराव कोकाटे यांनी भुसावळात माध्यमांशी बोलताना सांगितले.

पुणे जमीन घोटाळ्यामुळे अडचणीत आलेल्या अजित पवार यांची पाठराखण त्यांनी करीत अजित पवार यांचा चुकीच्या कामांना पाठिंबा कदापि नसतो मात्र चौकशीत सत्य समोर येईल, असे सूचक सुतोवाचही त्यांनी केले.



**भुसावळात इच्छुकांच्या मुलाखती**

भुसावळातील संतोषी माता सभागृहात १० नोव्हेंबर रोजी रावेर लोकसभा क्षेत्रातील आठ नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती मंत्री कोकाटे यांच्या उपस्थितीत घेण्यात आल्या.

मुलाखती आटोपल्यानंतर मंत्री कोकाटे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, सर्वच ठिकाणी उमेदवारांनी स्वबळावर लढण्याचा नारा दिला असलातरी याबाबत आपण उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या असून अंतीम निर्णय जिल्हाध्यक्षांशी चर्चा करून घेवू, असेही त्यांनी सांगितले.

### अजित पवारांची केली पाठराखण

पुणे जमीन घोटाळ्यात पार्थ पवार यांचे नाव आल्यानंतर अजित पवारांच्या अडचणी वाढल्या असून याकडे कसे पाहता? या प्रश्नावर मंत्री कोकाटे म्हणाले की, हे सर्व विरोधकांचे बेछूट आरोप आहे. मतदारांना अजित पवारांचा स्वभाव माहीत आहे. ते कुठलेही चुकीचे काम नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती गठित केली असून त्यात सत्य समोर येईल, असे सांगून त्यांनी अजित पवारांसह पार्थ पवारांची पाठराखण केली.

**यांची पत्रकार परिषदेला उपस्थिती**

अमळनेर आमदार अनिल भाईदास पाटील, प्रदेश प्रवक्ता प्रतिभा शिंदे, जिल्हाध्यक्ष उमेश नेमाडे, माजी शिक्षक आमदार दिलीप सोनवणे, विवेक ठाकरे आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात महत्त्वाचे....



### रावेर लोकसभा क्षेत्राचे जिल्हाप्रमुख योगीराज पाटील यांचा सावदा येथे सत्कार

**सावदा (ता. रावेर)** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे रावेर लोकसभा क्षेत्र, जळगाव पूर्वचे नवीन जिल्हाप्रमुख योगीराज पाटील यांची नुकतीच नियुक्ती झाल्याने सावदा येथे त्यांचा शिवसैनिकांतर्फे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक चर्चा करण्यात आली. यावेळी शहरप्रमुख भरत नेहते, मिलिंद पाटील, माजी नगरसेवक धनंजय चौधरी, शरद भारंबे, नीरज सोनवणे, गौरव भेरवा, स्वप्निल महाजन, गोलू जैन, डिगा महाजन, नितीन महाजन यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

### सावदा येथील डॉ. उल्हास पाटील स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन १३-१४ रोजी

**फैजपूर (ता. यावल)** : शहरातील शिक्षण क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या डॉ. उल्हास पाटील इंग्रजी माध्यम सीबीएसई स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन १३ रोजी सुरू होईल. वार्षिक मेळाव्याच्या २०२५-२६ च्या उत्सवानिमित्त 'आरोहन उत्कृष्टतेचा उदय' सोहळा कुसुमताई वसंतराव पाटील शैक्षणिक परिसर डॉ. उल्हास पाटील इंग्रजी माध्यम शाळेत १३ व १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होईल. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार अमोल जावळे, फैजपूर उपविभागीय अधिकारी बबनराव काकडे, फैजपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर, कार्यकारी निर्माता मुंबई हेमेंद्र कुळकर्णी, गोदावरी फाउंडेशन अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, गोदावरी फाउंडेशन सचिव डॉ. वर्षा पाटील, संचालक डॉ. वैभव पाटील, डॉ. केतकी पाटील, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. अक्षता पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे.



### फैजपुरात आगग्रस्त दुकानांच्या ठिकाणी मंत्री सावकारे अन् आमदार जावळे यांची भेट

**फैजपूर (ता. यावल)** : येथे घडलेल्या सावदा रोडवरील राज लॉजिंग व फर्निचर दुकानास आग लागण्याच्या घटनेनंतर त्या ठिकाणी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे व आमदार अमोल जावळे प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांशी तसेच नुकसानग्रस्त दुकानदांशी चर्चा केली. स्थानिकांच्या अडचणी जाणून घेत मदत आणि पुनर्वसनासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्याबाबत चर्चा केली. तसेच प्रशासनास तत्काळ मदतकार्य सुरू करून पीडितांना दिलासा देण्याच्या सूचना दिल्या. यावेळी माजी नगरसेवक शेख कुर्बान, शेख जलील, शेख इरफान, मुद्दसर नजर यांच्यासह दुकानदार, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



### उचंदा उपसरपंचपदी शिवसेनेच्या पंचफुलाबाई बेलदार यांची बिनविरोध निवड

**मुक्ताईनगर** : तालुक्यातील उचंदा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवसेनेच्या पंचफुलाबाई सोपान बेलदार यांची बिनविरोध निवड झाली. सविता भागवत इंगळे यांनी ठरल्यानुसार आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर झालेल्या निवडीमध्ये पंचफुलाबाई बेलदार यांचा एकमेव अर्ज आल्याने आज त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच वंदना दीपक भोलाणे, सदस्य सुनील धनगर प्रतिज्ञा इंगळे, सविता इंगळे, वसंताबाई हिवरे प्रकाश पाटील, किरण तायडे आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. पंचफुलाबाई बेलदार यांची निवड झाल्यानंतर फटाक्यांच्या आतिषबाजी करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे शांताराम पाटील, सरपंच पती दीपक महाराज भोलाणे, अनिल पाटील, योगेश पाटील, देवानंद पाटील, अरुण पाटील, भागवत भोलाणे,दीपक इंगळे संतोष भोलाणे, गणेश पाटील, रामदास भोलाणे, धीरज धनगर, अर्जुन बेलदार, चेतन श्रीखंडे, शांताराम बेलदार, संदीप इंगळे राहुल इंगळे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. निवडीचे कामकाज ग्रामसेवक एकनाथ कोळी, हर्षल पाटील रवींद्र पाटील यांनी पूर्ण केले.

### मुक्ताईनगर नगरपंचायतमध्ये पहिल्या दिवशी एकही अर्ज नाही

**मुक्ताईनगर** : सर्वच राजकीय पक्षासाठी अस्तित्वाची लढाई असलेल्या मुक्ताईनगर नगरपंचायतच्या पंचवार्षिक निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झालेली असून १० नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन पत्र भरण्याच्या पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. या निवडणुकीमध्ये राष्ट्रीय पक्ष तसेच इतर राजकीय पक्षांची चांगलीच कसोटी लागणार आहे.



## माजी प्रभारी नगराध्यक्ष राकेश कोलते यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १० नोव्हेंबर**

यावल शहरातील माजी प्रभारी नगराध्यक्ष राकेश कोलते यांनी आपल्या समर्थकांसह शेकडो कार्यकर्त्यांसह सोमवारी भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला. फैजपूर रोडवरील आर. जी. नाना पाटील यांच्या कार्यालयात आयोजित प्रवेश कार्यक्रमात हा ऐतिहासिक क्षण साक्षीदार ठरला.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे अन्न, वस्त्र व ग्राहक संरक्षण मंत्री संजय सावकारे, भाजपचे पूर्व जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानाचे राष्ट्रीय संयोजक डॉ. राजेंद्र फडके, यावल-रावेर मतदारसंघाचे आमदार अमोल जावळे, रावेर लोकसभा निवडणूकप्रमुख तथा जिल्हा उपप्रमुख नंदकिशोर महाजन, यावल नगरपालिका निवडणुकीचे प्रभारी व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य हर्षल पाटील, प्रभाकर आप्पा सोनवणे, उज्जैनसिंग राजपूत, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सविता भालेराव तसेच माजी बाजार समिती सभापती राकेश फेगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भाजप यावल शहराध्यक्ष राहुल बारी व ज्ञानेश्वर तायडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये राकेश कोलते यांच्यासोबत गणेश महाजन, प्रदीप फालक, प्रगतीशील शेतकरी धनराज फालक, हेमंत फेगडे, ज्ञानदेव फेगडे, भूषण फेगडे, विकी चौधरी, करणी सेनेचे समाधान राजपूत, रमेश जोगी, प्रभाकर बारी, सागर कांबळे, प्रकाश बिरारी, सूर्यकांत दुसाणे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपमध्ये प्रवेशानंतर उपस्थित मान्यवरांनी राकेश कोलते आणि सर्व नूतन कार्यकर्त्यांचे स्वागत करीत आगामी यावल नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## २००१ नंतर तिसरे अपत्य असल्यास होणार अर्ज बाद

### नामनिर्देशनाची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

भुसावळ नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना प्रशासनाकडून महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या असून, १२ सप्टेंबर २००१ नंतर जन्मलेल्या तिसऱ्या अपत्याच्या प्रकरणात उमेदवाराचा अर्ज अमान्य ठरणार आहे. या अटीसंदर्भात उमेदवाराने आवश्यक प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पाटील यांनी स्पष्ट केले.

अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रांची यादी- नामनिर्देशन पत्र सादर करताना उमेदवाराचे आणि सूचकाचे नाव संबंधित मतदार यादीशी तंतोतंत जुळले पाहिजे. तसेच अर्जासोबत निर्धारित रकमेची पावती जोडणे आवश्यक आहे. 'एकदा दाखल केलेले नामनिर्देशन पत्र परत मिळणार नाही,' असा इशाराही पाटील यांनी दिला.

नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. पक्षांकडून सादर होणारे 'ए' आणि 'बी' फॉर्म सादर करण्याचीही हीच शेवटची तारीख आहे.

**थकबाकी नको**

प्रत्येक उमेदवाराने अर्जासोबत शासकीय थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र आणि शौचालय असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र न दिल्यास उमेदवारी अर्ज बाद करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

**इतर राज्यातील जात प्रमाणपत्र ग्राह्य नाही**

आरक्षित जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र राज्यातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. वैधता प्रमाणपत्र अद्याप प्राप्त न झाल्यास, वैधता पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पावती जोडणे आवश्यक आहे. इतर राज्यातील जात प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही,''असेही पाटील यांनी स्पष्ट केले.

**प्रभागातीलच सूचक असणे बंधनकारक**

उमेदवाराने ज्या प्रभागातून निवडणूक लढवायची आहे, त्या प्रभागातीलच सूचक असावा, अशी अट घालण्यात आली आहे. अन्यथा अर्ज नामंजूर केला जाईल.

### आचारसंहितेचे पालन काटेकोरपणे करावे

शनिवारी झालेल्या बैठकीत निवडणूक नियमावली, आवश्यक कागदपत्रे, नामनिर्देशन प्रक्रिया आणि आदर्श आचारसंहितेचे पालन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. 'निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्ण सज्ज आहे,' असेही पाटील यांनी सांगितले.



## भुसावळातील तरुण सायकलने राजस्थानातील श्याम मंदिर दरबाराकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

भुसावळ शहरातील तरुण श्यामभक्त सागर शिंदे यांनी ८ नोव्हेंबर रोजी अत्यंत भक्तिभाव आणि उत्साहाने राजस्थानमधील ख्यातनाम श्री श्याम मंदिर दरबाराकडे सायकल यात्रेला प्रारंभ केला. श्रद्धा, समर्पण आणि भक्तीभाव यांचा अनोखा संगम असलेल्या या यात्रेची सुरुवात धार्मिक वातावरणात झाली.

या प्रसंगी सागर शिंदे याच्या पालकांनी त्यांना तिलक लावून शुभेच्छा दिल्या. सायकलची विधिवत पूजा करून सुरक्षित आणि यशस्वी प्रवासासाठी आशीर्वाद दिला. कुटुंबीय व नातेवाईकांच्या उपस्थितीत त्यांनी विठ्ठल मंदिर, हनुमान मंदिर आणि तुळजा भवानी मंदिर येथे दर्शन घेऊन देवांचे आशीर्वाद घेतले.

या शुभप्रसंगी उमाकांत शर्मा, माजी नगरसेवक अजय पाटील, मिलिंद कापडे, माजी नगरसेवक अजय नागराणी, अमोल सोनार तसेच अनेक श्यामप्रेमी भक्तगण आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. सर्वांनी 'श्याम बाबा की जय'च्या घोषात सागर शिंदे यांचा सत्कार करून त्यांना शाल, श्रीफळ व हार अर्पण करत आनंदाने निरोप दिला.

सागर शिंदे हे भुसावळ बऱ्हाणपूर, खंडवा, इंदूर, कोटारिंग रोडमार्गे सायकलने प्रवास करीत श्याम बाबांच्या दरबारात पोहोचणार आहेत.

## एलटीटी-छपरा मार्गावर मध्य रेल्वेच्या विशेष गाड्या धावणार

### भुसावळ विभागातील प्रवाशांसाठी आनंदाची बातमी

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

वाढत्या प्रवासी गर्दीचा ताण कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी), मुंबई ते छपरा दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नोव्हेंबर महिन्यात या विशेष गाड्या ठराविक दिवसांवर धावणार असून, भुसावळ विभागातील प्रवाशांना लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

एलटीटी छपरा एलटीटी या मार्गावर दोन जोडी विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. या गाड्या क्रमांक ०५५८८, ०५५८७ आणि ०५५९०, ०५५८९ अशा असतील. या सर्व विशेष गाड्या कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, खंडवा, इटारसी, राणी कमलापती, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई (झाशी), उरई, कानपूर सेंट्रल, ऐशबाग, बादशाहनगर, गोमतीनगर, बाराबंकी, गोंडा, बस्ती, गोरखपूर, देवरिया सदर आणि सिवान येथे थांबतील. भुसावळ विभागातील प्रवाशांना या विशेष गाड्यांमुळे उत्तर प्रदेशकडे जाण्यासाठी अधिक सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना या गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.




## सुकळी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिवस म्हणून साजरा

**मुक्ताईनगर** : शिक्षण हेच अज्ञानातून ज्ञानाकडे व प्रगतीची दारे उघडणारे एकमेव महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणाच्या सहाय्यानेच बाबासाहेबांनी देशात क्रांती घडवून आणली आणि एक आदर्श विद्यार्थी कसा असतो हे जगाला दाखवून दिले. म्हणून विद्यार्थ्यांनी महामानव डॉ.बाबासाहेबांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन उपशिक्षक शरद बोदडे यांनी केले. मुक्ताईनगर तालुक्यातील सुकळी येथील नवीन माध्यमिक विद्यालयात आयोजित भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन 'विद्यार्थी दिवस' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानावरून उपशिक्षक शरद बोदडे हे बोलत होते. प्रास्ताविक उपशिक्षिका वैशाली सोनवणे यांनी केले. शिक्षकांनी 'शिक्षण हेच खरे शस्त्र' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'मी ही डॉक्टर आंबेडकरांसारखा शिकेन' अशी शपथ घेतली. सूत्रसंचालन उपशिक्षक शरद चौधरी यांनी केले. आभार लिपीक नवल कोळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपशिक्षिका कोसोदे, दुट्टे, लिपिक भूषण पानपाटील, शिक्षकेतर विजया सोनवणे आणि स्वप्नील पाटील यांनी परिश्रम घेतले.

## सांगवी बुद्रूक गावात नागरिकांनी नदीपात्रात उतरून केली स्वच्छता

### ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेमुळे जनतेत संताप

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १० नोव्हेंबर**

येथील नदीपात्रात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात कचरा आणि घाण साचलेली असून, ग्राम पंचायतीकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन स्वच्छता मोहीम राबवली.

नदीपात्रात साचलेल्या घाणीमुळे डेंगू, मलेरिया आणि इतर साथीचे आजार पसरू शकतात, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीकडे कचराकुंड्यांची योग्य व्यवस्था नसल्यामुळे तसेच स्वच्छतेसाठी असलेला ट्रॅक्टर वापरात न आणल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरातील तरुणांनी एकत्र येऊन नदी पात्र स्वच्छ करण्याचा निर्धार केला. या स्वच्छता मोहिमेत चंदू तायडे (मिस्त्री), सागर मेघे, अजय मेघे, विकास तायडे, समा तायडे, दीपक भालेराव, अजय सोनवणे, राहुल जयकर तसेच अनेक समाजसेवक आणि ग्रामस्थ उत्साहाने सहभागी झाले.



स्वच्छता मोहिमेनंतर नागरिकांनी ग्रामपंचायतीला इशारा दिला की, जर तत्काळ कारवाई करून नियमित स्वच्छतेची व्यवस्था केली नाही, तर नदीपात्रातील कचरा थेट ग्रामपंचायतीच्या दालनात टाकण्यात येईल.

नागरिकांनी शासनाकडेही मागणी केली आहे की स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मिळणारा निधी योग्य पद्धतीने वापरला जावा आणि सांगवी बुद्रूक ग्रामपंचायतीकडून नियमित स्वच्छता मोहीम राबवली जावी.

## 'वंदे मातरम्' सार्थ शताब्दी महोत्सवानिमित्त भोळे महाविद्यालयात निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १० नोव्हेंबर**

येथील देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात आज 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वंदे मातरम् ची भूमिका' या विषयावर निबंध स्पर्धा पार पडली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्रालयाच्या निर्देशानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रेरणेने या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या गीताला अद्वितीय स्थान प्राप्त झाले. नुसत्या 'वंदे मातरम्' या घोषणेने असंख्य क्रांतिकारकांना ब्रिटिशांशी लढण्याची प्रेरणा मिळत असे, हा इतिहास सर्वश्रुत आहे. हे गीतच राष्ट्रीय चळवळीचे प्रतीक मानले गेलेले होते, म्हणून संविधान स्वीकृतीच्या वेळी हे देशाचे 'राष्ट्रीय गीत' म्हणून स्वीकारले गेले.

७ नोव्हेंबर २०२५ रोजी या गीताच्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झालीत. त्याचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची प्रेरणा, इतिहासाची जाणीव आणि सांस्कृतिक अभिमान वृद्धिंगत व्हावा या हेतूने दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



कार्यक्रमाच्या आयोजनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. फालक यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करीत असताना भुसावळ परिसरातील क्रांतिकारकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाची माहिती देत असताना 'वंदे मातरम्' गीताचे महत्व स्पष्ट करून सांगितले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्याप्रमुख प्रा. श्रेया चौधरी तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जगदीश चव्हाण, प्रा. डॉ. अनिल सावळे यांनी परिश्रम घेतले.